साप्ताहिक
माणूस

८ ऑक्टोबर ८३ / दोन रुपये.

# पाकिस्तान-भारत दोघेही शस्त्रास्त्रसज्ज!

# युद्ध होणार का?





## रंगभूमी विषयक एक विस्तृत चर्चा



कोंबड्यानं बांग दिली. शिपायी मोहल्ल्यामधे
असलेल्या मशिदीच्या मुसाफिरखान्यात
झोपलेले बांगी बद्रुद्दीन जागे झाले. हाताच्या
आधारानं हळूहळू उठून बसले, 'या अल्ला....
रहम' म्हणत.

बाहेर मरणाचा गारठा पडला होता. रात्री
कधी तरी पाऊस सडसडून गेलेला असावा.
मुसाफिरखान्याचं जुनाट कुंभारी कौलांचं छत
एक-दोन ठिकाणी गळलं होतं. त्याचं थोडंसं
पाणी खालच्या फरशीवर साठलं होतं; पण
बांगींच्या बिछान्यापर्यंत आलं नव्हतं. तेवढा
त्याला उतार मिळाला नव्हता. उशाला ठेवलेल्या
कंदिलाची रात्री झोपताना बारीक केलेली वात
बांगींनी वर चढवली. खोलीत थोडासा प्रकाश
दाटला. दगडी भिंतींचं अस्तित्व थोडं स्पष्ट
झालं. फरशीवरचं गळलेलं पाणी चकाकलं.
बांगींच्या खोल डोळ्यांना ते पुसट जाणवलं.
ते स्वतःशीच पुटपुटले, 'शायद बारिश हो गया
हो ... आज काल नींद बहुत गहरी आती है.
रातमे क्या कुछ हो जाता है; समझमे नही
आता, ये कैसे असारे हैं पता नही. या खुदा ...'

**मशिदीत आजान-बांग देणाऱ्या एका
बांगीचं आणि मुस्लिम समाजधर्माचं
समर्थ चित्रण करणारी मनोवेधक कथा–
राजन खान यांची–**

# बांगी

**शिवाय
पद्मजा फाटक, सुधा नरवणे,
कर्नल जाधव, विनया खडपेकर, नारायण
धारप यांच्या उत्कृष्ट कथा–**

# माणूस दिवाळी अंकात

साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : तेविसावे

अंक : एकोणिसावा

¤

८ ऑक्टोबर १९८३

किमत : दोन रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

¤

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ

संजय पवार

नासिक–पुणे रस्त्यावरील

# चंदनापुरी

## कॉम्रेडी कारभाराचा नमुना

नासिक-पुणे राजरस्त्यावर संगमनेर सोडल्यावर दहा कि. मी. अंतरावर चंदनापुरी घाटाच्या पायथ्याशी चंदनापुरी हे छोटेखानी गाव लागतं.

'जनता शिक्षण प्रसारक मंडळ' या संस्थेच्या वतीने इथे एक विद्यालय चालवलं जातं. या विद्यालयात ऑगस्ट ७९ मध्ये श्री. रामनाथ गोविंद सोनुणे हे शिक्षक म्हणून दाखल झाले.

एस. एस. सी. डी. एड्. ही शैक्षणिक पात्रता. ८०–८१ या शैक्षणिक वर्षासाठी दोन दिवसांचा सेवाखंड – 'ब्रेक' देऊन १७।३।८० ला त्यांना पुन्हा नव्याने नेमणूकपत्र देण्यात आलं. 'नोकरी कायम आहे–हा फक्त केवळ कागदोपत्री उपचार आहे.' या भावनेनं आणि विश्वासानं श्री. सोनुणे यांनी हा सेवाखंड मान्य केला.

१७।३।८० पासून १ एप्रिल ८२ पर्यंत कोणताही कागदोपत्रीसुद्धा 'सेवाखंड' न होता सोनुणे यांची विद्यालयात सलग सेवा झालेली आहे.

दि. १।४।८२ ला त्यांना एक नोटीस मिळाली आणि आपला संस्थेवरचा विश्वास अनाठायी आहे याची खात्री त्यांना पटली.

८१–८२ चे शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर ८२–८३ या वर्षासाठी ९।३।८२ ला १७।३।८२ ते ३०।४।८३ या कालावधीपुरतीच नेमणुकीची ऑर्डर देऊन सोनुणे यांची आणखी वर्षभर सलग सेवा होणार नाही याची संस्थेनं काळजी घेतली.

चार वर्षे प्रामाणिकपणाने काम करणाऱ्या सोनुणे यांना ३०।४।८३ नंतर पुढील शैक्षणिक वर्षासाठी कामावर घेतलेले नाही.

त्यांच्या सेवाकाळात त्यांना कोणत्याही कारणासाठी कोणत्याही प्रकारची एक ओळीचीही नोटीस मिळालेली नाही किंवा त्यांचे काम असमाधानकारक असल्याचे त्यांना संस्थेने सांगितलेले नाही आणि अचानक २९।४।८३ ला त्यांना 'सेवामुक्त' केल्याची नोटीस धाडण्यात आली

दि. १।४।८२ ला सेवा खंडित केल्याची नोटीस आल्याने चार वर्षे सेवा होऊनही आपल्याला कायम करण्यात येत नाही– अनिश्चिततेची तलवार कायम टांगती आहे– हा आपल्यावर अन्याय होतो आहे म्हणून ५।८।८२ ला श्री. सोनुणे यांनी शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे तक्रार दाखल केली.

चंदनापुरी हे गाव छोटं– त्यामुळं गावात घडणारी प्रत्येक घडामोड हा गावकऱ्यांचा चर्चेचा विषय असतो. सोनुणे नावाच्या शिक्षकाला, त्याच्याबद्दल काहीही तक्रार नसताना अजूनपर्यंत कायम केलेले नाही, उलट त्यांना पुन्हा कमी कालावधीची नवीन ऑर्डर दिलेली आहे, हा विषय सर्वांपर्यंत पोहोचलेला होता.

३।८।८२ ला मारुतीच्या देवळासमोर गावकऱ्यांची एक सभा झाली. या सभेची पूर्वकल्पना असण्याचं सोनुणे यांना काहीच कारण नव्हतं. सभा हा गावाच्या नियमित रूटिनचा भाग होता. या सभेत हा विषय चर्चेला आला. ऐकीव माहितीवर चर्चा करण्यापेक्षा वस्तुस्थितीच जाणून घ्यावी या उद्देशाने गावकऱ्यांनी सोनुणे यांना स्टाफरूममधून बोलावून नेले आणि वस्तुस्थिती सांगायला लावली.

या घटनेनंतर संस्थाचालकांचा दिनांक ५।८।८२ ला तातडीनं 'कारणे दाखवा' सांगणारा खलिता आला– ३।८।८२ ला सभेत जाऊन लोकांना संस्थेबद्दल खोटी माहिती देऊन लोकांमध्ये संस्थेबद्दल गैरसमज निर्माण केला– बदनामी केली, ही कृती कारवाई करण्यास पुरेशी आहे. याबद्दल आपले म्हणणे सात दिवसांत द्यावे.'

या खलित्याला वस्तुस्थिती स्पष्ट करणारे उत्तर तातडीने धाडण्यात आले. यात सोनुणे यांनी आपली संस्थेवर निष्ठा असल्याचे आवर्जून सांगितलं आणि केलेल्या आरोपाचा इन्कार केला; पण संस्थेला वस्तुस्थिती जाणून घ्यायचीच नव्हती. त्यांना फक्त निमित्त हवं होतं. आरोपाची शहानिशा न करताच 'केसचा' निकाल ठरविण्यात आला होता. सोनुणे यांना पुढील शैक्षणिक वर्षापासून

सेवामुक्त करण्यात आले.

दरम्यान दि. २३।६।८२ ला सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर स्टाफ, स्वत: मुख्याध्यापक यांनी संस्था–सेक्रेटरींना एक पत्र पाठवून सोनुणे यांना कायम करण्याची विनंती केली होती.

मा. डेप्युटी डायरेक्टर, पुणे यांचे आदेशानुसार या प्रकरणाच्या चौकशीसाठी उपशिक्षणाधिकारी आले. त्यांच्या चौकशीनुसार दि. २४।१।८३ ला शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद यांचे एक पत्र आले. त्यांनी कळवलं 'चौकशी अभिप्राय पाहाता संस्थेने आपली नियुक्ती' हंगामी स्वरूपाची केली होती. त्यामुळे आपला तक्रारअर्ज नस्तीबद्ध करण्यात येत आहे, या संदर्भात पुन्हा पत्रव्यवहार करू नये.'

अधिकाऱ्यांनीही आपली दारं बंद करून टाकली. चौकशी अधिकाऱ्यांचे संस्थेने दाखविलेल्या शेवटच्या नेमणूकपत्राने 'समाधान' झाले होते. मग त्याआधीच्या सेवेचे काय ?

१७–३–८० ते १–४–८२ या चोवीस महिन्याच्या सलग सेवेचे काय ?

आधीची सेवा लक्षात घेतली नाही तरी या सलग तेवीस महिन्यांत पुरेसे दिवस भरले नाहीत काय ?

चौकशी अधिकारी खोलात गेले असते तर ही वस्तुस्थिती स्पष्ट झाली असती; पण संस्थाचालकांनी 'योग्य समाधान' केल्याने अधिकाऱ्यांनी जास्त खोलात जायची तसदी घेतली नाही.

पण मी खोलात गेलो. बरीच माहिती समजली.

श्री. सोनुणे यांनी आत्तापर्यंत आपल्या पगारातून संस्थेला १५०० रु. दिले आहेत. त्याची कोणतीही पावती संस्थाचालकांनी दिलेली नाही. अशी रक्कम देणारे सोनुणे एकटेच नाहीत. सौ. कुलकर्णी २००० रु. सौ. बाम १००० रु. कु. सानप १००० रु. श्री. शिंदे ५०० रु. श्री. कळे २००० रु. याप्रमाणे रकमा देणारे शिक्षकही आहेत– होते. यापैकी दिलेल्या रकमेची कोणालाच पावती दिलेली नाही; यासंबंधी ऑगस्ट ८२ मध्ये धर्मादाय आयुक्त यांचेकडे तक्रारअर्ज कला आहे; परंतु आजपर्यंत काहीच हालचाल झालेली नाही. उलट 'आम्ही तुम्हाला नोकऱ्या देतो– आणि तुम्ही आमच्या विरुद्ध अर्ज करता काय ?' असला सज्जड दमही मिळाला आहे.

महाराष्ट्र शिक्षणसंस्था, निमगावजाळी या संस्थेतर्फे १० जून ६८ ला या विद्यालयाची सुरुवात झाली. या संस्थेतील पदाधिकाऱ्यांच्या अनागोंदी कारभारामुळे संस्थेचा कारभार व्यवस्थित चालेना. विद्यालयाच्या कामाकडे कोणाचे नीटसे लक्ष नव्हते. या गावातील १३ लोकांनी हे विद्यालय या संस्थेपासून वेगळे काढले आणि १९७४–७५ पासून शिक्षण प्रसारक मंडळ, चंदनापुरी या संस्थेच्या नावाने या विद्यालयाचा कारभार सुरू झाला. आजपर्यंत हीच १३ माणसे पदाधिकारी सदस्य आहेत. ग्रामस्थांनी संस्थाचालकांकडे संस्थेचे सभासद वाढावे याविषयी अनेकदा आग्रह धरला. त्यामुळे संस्थेचा व्याप वाढविणे शक्य होईल, शाळेला मालकीची इमारत उभारता येईल. तरीही १३ च्या पुढे अजून सभासदसंख्या गेलेली नाही. सभासद वाढल्यावर कदाचित आपल्या 'खुर्च्या' अबाधित राहाणार नाहीत, ही भीती वाटत असावी. कॉम्रेड, जी. जी. रहाणे कॉ. पर्वत नाना रहाणे, कॉ. जगन्नाथ रहाणे, हीच तीन माणसे चेअरमन, अध्यक्ष, सेक्रेटरी या नात्याने संस्था चालवितात. तिघांशिवाय चौथा सभासद चौकशी केल्याशिवाय समजणारसुद्धा नाही, इतके बाकीचे दहा निष्प्रभ आहेत. या 'संस्थानिक' कॉम्रेड (?) चालकांचा कारभार 'रशिया' स्टाइलने चालतो.

यांच्या हाताखालच्या संस्थेतील प्रत्येकाने 'भारतीय कम्युनिस्ट पार्टी'चे सभासद असले पाहिजे असे अलिखित बंधन आहे.

आपल्या पगारातून त्याने पार्टीसाठी निधी दिला पाहिजे पार्टीच्या मीटिंगमध्ये आणि पार्टीच्या सर्व कार्यक्रमात सक्रिय सहभाग असला पाहिजे असाही तोंडी दंडक आहे.

प्रत्येक जण पार्टीचे काम किती, कसा करतो यावर त्याची पदोन्नती, कायम करणे, त्याची वेतनवाढ अवलंबून असते.

पार्टीच्या अधिवेशनाला स्वखर्चाने उपस्थिती अनिवार्य असते.

अशा सगळ्या 'सेवाशर्ती' मुळे जुलमाचा अमला तरी 'रामराम' करण्याशिवाय सेवकांना गत्यंतर नसते.

ॲक्टिव्ह कम्युनिस्ट असलेल्या एका शिक्षकाला सेवाज्येष्ठता डावलून पर्यवेक्षक नेमण्यात आले आहे.

अर्थात या कोणत्याच गोष्टी लेखी स्वरूपात नाहीत की, ज्याचे कागदोपत्री पुरावे सादर करता यावेत.

त्यामुळे संस्थाचालक कानावर हात ठेवण्यास मुक्त असले तरी दिसणारी वस्तुस्थिती लपणार थोडीच आहे !

इतके दिवस संस्थाचालकांच्या बिनबोभाट चाललेल्या मनमानी कारभाराबद्दल फारसं कुणी लक्ष घातलं नव्हतं; पण रामनाथ सोनुणेसारख्या प्रामाणिक तळमळीच्या, चांगल्या शिक्षकाला कमी केल्यावर गावच्या लोकांनी या चालकांविरुद्ध आघाडीच उघडली आहे.

१६–६–८२ ला एक निषेध–निवेदन शिक्षणसचीव, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी यांना देऊन गावकऱ्यांनी सर्वांचेच या संस्थेच्या कारभाराकडे लक्ष वेधले आहे.

११–६–'३ ला सर्व परिस्थिती सांगणारे एक वैयक्तिक पत्र श्री. सोनुणे यांनी जिल्हाधिकारी अनिलकुमार लखिना यांना धाडले आहे.

संबंधित अधिकाऱ्यांशी वेळोवेळी झालेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती शिक्षणमंत्री, शिक्षक आमदार तु. ना. माताडे, रा. ह. शिंदे, शिक्षणसचीव, शिक्षकसंघटना यांना पाठविण्यात आल्या आहेत.

दिलासा देण्यापलीकडे आमदार द्वयांनी या प्रकरणात फारसं गांभीर्यानं लक्ष घातलेलं नाही.

वृत्तपत्रांतून तीन–चार वेळा यासंबंधी वृत्त येऊन गेले आहे, स्थानिक गावकऱ्यांचं एक शिष्टमंडळ ११–७–८३ ला चंदनापुरीचे जावई, उपमुख्यमंत्री श्री. रामराव आदिक यांना भेटून आलं आहे. चौकशीच्या आश्वासनापलीकडे फारसं हाताशी लागलेलं नाही.

शाळेला वापरायला दिलेल्या आपल्या खोल्या गावकऱ्यांनी खाली करून घ्यायला सुरुवात केली असून सात खोल्यांना आपली कुलपे ठोकली आहेत. त्यामुळे वर्ग अपुरे पडू लागल्याने शाळा सकाळ–दुपार भरायला लागलीय.

दरम्यान ४ जून ८३ ला श्री. रामनाथ सोनुणे यांनी मा. स्कूल ट्राब्युनल–पुणे

यांच्याकडे अपील दाखल करून न्यायाची मागणी केली आहे.

अपिलाचा किंवा गावच्या दडपणाचा परिणाम असावा. व्यवस्थापनाने तडजोडीची तयारी शिक्षकसंघटनेकडे दाखविली होती; परंतु अद्याप कोणतीच तडजोड दृष्टिपथात नाही.

तुटं पडणाऱ्या तारखांना हेलपाटे घालत न्यायासाठी ताटकळत वाट पहाणं चालू आहे.

—विनय गुणे

# मुक्काम कोल्हापूर

### ◻ तरुणातील खळबळ

'ग्रंथाली'च्या कोल्हापूर शाखेनं इथं २४ सप्टेंबरला एक कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रम परिसंवाद आणि थोडी-फार पुस्तक-विक्री असा. परिसंवादाचा विषय: 'तरुणांतील खळबळ.' त्यात अरुण साधु, पार्थ पोळके, संजीव खांडेकर; प्रा. एस. के. देसाई आणि प्राचार्य एम. डी. देशपांडे यांनी भाग घेतला. ग्रंथालीनं प्रकाशित केलेल्या संजीव खांडेकर-संपादित 'संकल्प' या पुस्तकाची पब्लिसिटी आणि पार्थ पोळके यांनी मध्यमवर्गावर चढवलेला जबरदस्त हल्ला या दोन गोष्टी लक्षात राहिल्या.

सदर 'संकल्प' हा संपादित ग्रंथ तरुण मनांचे कानोसे घेणारा आहे असं सांगितलं गेलं. समाजकार्यात किंवा एकूणच परिस्थिती-कडे डोळसपणे पाहणाऱ्यांचे—कार्यकर्त्यांचे लेख त्यात आहेत. निरनिराळ्या संघटना आणि त्यात काम करणारे तरुण—तरुणी, त्यांचे अनुभव आणि मग त्यातून निर्माण झालेले विचार असे हे लेख, संघटना किंवा एखाद्या चळवळीत काम करणाऱ्याला उपयोगाचे होतील.

या पुस्तकाच्या निर्मितीत ज्यांचा मुख्य सहभाग आहे त्यातल्या दोघांनी या परि-संवादात व्यक्त केलेल्या विचारांमुळं हा परिसंवाद लक्षात राहिला. यात पहिले पार्थ पोळके आणि दुसरे अरुण साधु. पार्थ पोळकेंच्या भाषणानं श्रोते बेचैन झाले. त्यांना त्यांचा 'संकल्प'मधील लेख—हा विषय देण्यात आला आणि मला वाटतं ते त्याच अनुरोधानं बोलले. त्यांनी प्रथम सांगितलं की, 'संकल्प'मधले बरेच लेख त्यांना बोटचेपेपणाचे वाटतात. काही तरी हातचं राखून लिहायचं ही वृत्ती त्यात दिसते; पण तो विषय बाजूला ठेवून मग पोळके 'तरुणांवर' आले. तरुण कार्यकर्ते काम करताना त्यांना कोणत्या अडचणी येतात—स्वतः पोळकेंना आल्या—हे त्यांनी सांगितलं. आजचा कार्यकर्ता हा बऱ्याचदा 'वादात' अडकतो. निरनिराळ्या प्रकारचे isms त्याला अस्वस्थ करतात. मार्क्सवाद—डावा—उजवा—लेनिनवाद-राष्ट्रवाद-अस्तित्व-वाद अशा अनेक तत्त्वप्रणालींमुळे प्रत्यक्ष कार्यात खूप अडथळे येतात. त्यामुळं एका संघटनेतीलच दहा तोंडं दहाकडं असतात. आपापसात बोलणंही फार अवघड जातं. कोणतीही वैयक्तिक कृती संशयास्पद होऊन जाते, सगळं जगणं अवघड होऊन बसतं. त्याचं एक उदाहरण म्हणजे पोळकेंच्या मुलीनं हातात बांगड्या घातल्या तेव्हाही कुणी एकानं त्यांना त्यावरून हटकलंच. अशा गोष्टीमुळं कार्यकर्त्याला वाटतं की काय बरोबर आणि काय चूक? 'विचार जेव्हा तोंडात बोळा घालतात तेव्हा असं होतं' असं पोळके म्हणाले. तेव्हा त्यांची कैफियत बऱ्याचजणांना पटली असावी.

पोळकेंनी आणखी एक अडचण सांगितली आणि ती म्हणजे त्यांच्या कार्यातला मध्यम-वर्गाचा अडथळा. ते जेव्हा आदिवासींच्यात किंवा गरीब पीडितांच्यात काम करतात तेव्हा तो कष्टकरी—कामकरीवर्ग त्यांना विचारतो 'अरे, आम्ही का बदलावं?' देव मानणे किंवा अंधश्रद्धा पाळणे या गोष्टी आमच्यापेक्षा वरचे म्हणजे मध्यमवर्गीय लोक अगदी बिनदिक्कत करतात. मग आम्ही काय—तेच करतोय.' असं होऊ नये म्हणून मध्यमवर्गानं बदलावं—असं त्यांनी ठासून सांगितलं. या देशाचा खरा शत्रू कातडीबचावू मध्यमवर्गच असं ते म्हणाले. 'आमच्या कार्याकडं पाहून तुम्ही कोणता प्रतिसाद देता? की गप्पच बसता? क्रांती व्हावी; पण ती कुकरमधल्या भातासारखी आरामात शिजावी असं तुम्हाला वाटतं. आम्ही अस्वस्थ का आहोत तर तुम्हाला कळून—सवरूनही तुम्ही गेंड्याचं कातडं पांघरून बसलाहात म्हणून! मध्यमवर्गीय स्त्रियासुद्धा अगदी आपमतलबी आहेत. त्यांना त्यांच्या रोजच्या कामात रोजंदारी-वर राबणाऱ्या, मुलाबाळांना काखोटीस ठेवणाऱ्या स्त्रीची कधी आठवण होते?' असे एकामागोमाग एक प्रश्न पोळकेंनी विचारले; पण अर्थातच त्यांच्या भाषणा-नंतर त्यांचं भाषण 'फारच आवडलं' अशा 'मनात' नोंदी झाल्या.

अरुण साधूंनी आभार मानताना जे विचार मांडले ते मला अधिक आवडले. ते म्हणाले की संघटना चळवळीत काम करणाऱ्या तरुणांच्या मनातील निराशाही व्यर्थ आहे. आपल्या कार्यानं काहीच होत नाही ही समजूत खोटी. महात्मा फुलेंच्या कार्यानं काहीच फरक पडला नाही का? कै. र. धों. कर्व्यांच्या काळात ते एकाकीच होते; पण त्याच पायावर सुधारणा झाल्या ना? आणि म्हणूनच जंगल किंवा खेड्यात काम करणाऱ्यांनी अजिबात निराश व्हायचं कारण नाही.

या परिसंवादात आणखी तिघे बोलले. त्यात प्राचार्य एम. डी. देशपांडे (प्राचार्य नाइट कॉलेज कोल्हापूर व 'समाजप्रबो-धिनी'चे एक कार्यकर्ते) प्रा. एस. के. देसाई (सामाजिक कथा—कादंबऱ्या लिहिणारे कन्नड लेखक व इंग्रजी विभाग प्रमुख—शिवाजी विद्यापीठ) हेही होते. प्रा. देशपांडेंनी तरु-णांच्यातली 'Split personality (दुभंग-लेली व्यक्तित्वे) सांगितली तर प्रा. देसा-ईंनी भांडवलशाही व मार्क्सवाद या दोन जागतिक तत्त्वप्रणालींमध्ये तरुणांनी मार्क्स-वादाचा सांगोपांग विचार करावा व तो अपरिहार्य आहे असं प्रतिपादन केलं.

सारं झालं, तरीही 'मध्यमवर्गीयांनो, तुम्ही आमच्या कार्यातली धोंड आहात' हे पार्थ पोळकेंचे उद्गार श्रोते आठवत राहिले.

### ◻ फिल्म सोसायटी

कोल्हापुरातल्या TFT फिल्म सोसायटीला दीड वर्ष होत आलं. आठशे सभासदांची ही फिल्म सोसायटी प्रत्येक चित्रपटाचे दोन शोज् चार-चारशे जणांना शाहू स्मारक सभा-

गृहात दाखवते. आता ही TFT सोसायटी स्थिर झालीय त्यानिमित्त काही निरीक्षणं.

(१) ज्या ज्या वेळी एखादा गाजलेला किंवा थोडं ग्लॅमर असणारा चित्रपट असतो तेव्हा शो हाउसफुल्ल असतो. अशा वेळी मेंबर्स स्वतःबरोबर पाहुणेही आणतात. मात्र त्या पाहुण्यांना मेंबर व्हायचं नसतं तर तेवढाच एक चांगला चित्रपट पाहून परतायचं असतं. मेंबरव्यतिरिक्त कुणीही खरं तर फिल्म सोसायटीत येऊ नये.

(२) एखाद्या चित्रपटावर चर्चा करायची बहुधा कुणाची तयारी नसावी. अन्यथा आजपावेतो दोन–चार परिसंवाद किंवा Appreciation किंवा आस्वादासाठी तरी चर्चा झाल्या असत्या. प्रेक्षकांचाच दबाव असला तर संयोजक आपल्या उद्दिष्टात म्हणतात त्याप्रमाणे या चर्चा होऊ शकतील. अन्यथा न कळणारा चित्रपट शेवटपर्यंत अनाकलनीयच राहील व हीच परिस्थिती चालू राहील. 'पिक्चर कसा पहावा' हे फिल्म सोसायटीतून आपण शिकायला नको काय ?

(३) रशियन, जर्मन, पोलिश, फ्रेंच किंवा बंगाली, गुजराथी चित्रपटांना sub-tities नसतील तर चित्रपटांच्या आकलनात अडथळे येतात. म्हणून फिल्म सोसायटीजना पाठविण्यात येणाऱ्या चित्रपटांना शक्यतो sub-titles असावीत असं वाटतं. तसेच अधिकाधिक चांगले चित्रपट फिल्म सोसायटीजना उपलब्ध करून देण्यात यावेत. काही गाजलेले दर्जेदार चित्रपट (की जे व्हिडिओवर पाहण्यासही उपलब्ध नसतात.) खरं तर प्रथम फिल्म सोसायटीकडेच यायला पाहिजेत.

कोल्हापुरातील फिल्म सोसायटी मला वाटतं. संख्येनं आणि गुणानं बाकी शहरातल्या फिल्म सोसायट्यांची प्रतिनिधी म्हणून पाहायला हरकत नाही. तिच्या समस्या या बहुतेकांच्या असू शकतील.

—सुनील धोपेश्वरकर



## ह्या ना त्या निमित्ताने

# पहिला की दुसरा बाजीराव पेशवा ?

फिरोझ रानडे

'**ख**रं म्हणजे ह्या पुण्याच्या लोकांनी दुसऱ्या बाजीरावाचा पुतळा उभारण्याचा घाट घातला पाहिजे !'

श्यामचे हे वाक्य अगदी खडूसरसात बुचकळून काढलेले आहे हे कामतच्या लक्षात आले तसे कर्व्यांच्या पण आले व ते दोघे चमकले. अर्थात ते चमकले ते अगदी वेगवेगळ्या कारणांकरता.

कारणं वेगवेगळी असली तरी परिणाम एक होणे हे फक्त जीवनकारणातच नाही तर ते राजकारणात व समाजकारणातपण आजकाल फार होऊ लागलं आहे. परवा नाही, कोठे तरी छापून आले होते की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ इंदिराजींना पाठिंबा देणार आहे वा दिल्लीच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकात दिला सुद्धा होता म्हणे आणि आता इंदिराजींना पाठिंबा द्यावा असा आदेश मसकावतीहून साम्यवाद्यांना आला आहे म्हणे !

समाजातल्या अत्यंत चांगल्या, बुद्धिमान स्त्रिया स्वातंत्र्य मागतात तर अगदी दुसऱ्या टोकाच्या स्त्रिया तरी काय तेच तर मागत असतात. आता कारणे काही वेगळी, वेगळी असोत परिणाम एकच की नाही ?

तसेच कर्वे आणि कामत चमकण्याबाबत परिणामी एकच होते.

पहिल्या बाजीरावाचा पुण्याच्या शनिवारवाड्यापुढे पुतळा उभारण्याबाबत वर्तमानपत्रात काही मजकूर आला होता की, वाचकांच्या पत्रव्यवहारात काही छापून आले होते त्याबद्दल ही मंडळी बोलत होती.

कर्व्यांचा कोणी चुलतभाऊ ह्या पुतळ्यासंबंधाच्या कामात फार पुढाकार घेत होता. त्याने पहिला बाजीराव 'जानवेवाला' असल्यामुळे त्याच्या पुतळाउभारणीत कशा अडचणी येत आहेत हे कर्व्यांना सांगितले होते व ते सगळ्या अडचणी कर्वे आता श्यामला सांगून त्याची सहानुभूती मिळवावयाचा प्रयत्न करत होते.

मान्यवर लोकांचे पुतळे उभारण्याची टूम ही मुळात साहेबाची. साहेबाच्या गुलामगिरीबरोबर बाकी जशा बऱ्या–वाईट गोष्टी आल्या तशी ही पुतळा–टूम पण आली. ब्रिटिशांच्या कारकीर्दीत व्हिटोरिया राणीचे, पंचम जॉर्जचे, सातव्या एडवर्डचे, कर्झन, आर्यविन वगैरे लाटसाहेबांचे भव्य पुतळे मुंबई, मद्रास, कलकत्ता, दिल्ली येथे उभारले गेले होते. त्यातले काही तर अगदी अप्रतिम होते. त्यानंतर देशी पुढाऱ्यांचे पण पुतळे उभारले जाऊ लागले. नाना शंकरशेट, जमशेटजी जीजूभाई, न्यायमूर्ती रानडे, गोपाळ कृष्ण गोखले वगैरे थोर लोकांचे पुतळे उभारले गेले. त्या वेळी पुतळेकार मुख्यत्वे इंग्रजी असत. त्यामुळे त्या वेळचे बहुतेक पुतळे छान रुबाबदार असत.

स्वातंत्र्यानंतर तर काय पुतळ्यांचे पेवच फुटले. जागोजागी व चौको-चौकी 'मुंडी–पुतळे' म्हणजे फक्त मस्तकाचे पुतळे उभारण्याची प्रथा निघाली. खरं म्हणजे असे मुंडी पुतळे इमारतीत, प्रवेशकक्षात उभारावयाचे

असतात, असे चौकात नाही; पण उत्साहाचे भरात तसा विचार करायला वेळ कोणाला होता ?

काही ठिकाणी पूर्णाकृती पुतळेही उभारले गेले.

पुतळे मुंडीछाप असोत वा पूर्णाकृती असोत, स्वातंत्र्यानंतर बाकी गोष्टींचा जसा दर्जा घसरला तसा पुतळ्यांचा पण घसरला. चौपाटीवरचा टिळकांचा, गेट-वे ऑफ इंडिया जवळचा शिवाजीमहाराजांचा वा पुण्याचा सेनापती बापटांचा पुतळा असे काही मोजके पुतळे सोडून दिले तर बहुतेक पुतळे ओबड-धोबड, निर्जीव वाटावेत असेच आहेत.

एके काळी शिल्पशास्त्रात इतक्या प्रगत असलेल्या आपल्या देशात चांगले पुतळे का बनू नयेत ह्याचे श्यामला वैषम्य वाटे व प्रश्न पण पडे.

आपली प्रथा पुतळ्यांची नाही, मूर्तींची आहे. राम, कृष्ण वगैरे देवादिकांच्या मूर्ती असतात, पुतळे नसतात. भगवान बुद्धाचे पुतळे वा मूर्तीसुद्धा त्याच्या निर्वाणानंतर चांगल्या पाच–सहाशे वर्षांनी बनू लागल्या. त्या व्यक्तीत व पुतळ्यात नाकी–डोळी साम्य असण्याची अपेक्षा नसे. त्या त्या देवा-दिकांच्या वर्णनाप्रमाणे मूर्तिकार मूर्ती बनवत असे. बरे, पंढरीच्या विठोबासारखी मूर्ती ओबड-धोबड झाली तरी फारसे बिघडत नसे. भक्तगण त्या मूर्तीकडे फक्त भक्तिभावाने पहात असे व त्यांना ती सुंदर वाटे.

आताच्या पुतळ्यात फक्त ओबड–धोबड-पणाच असतो. बरे, भक्तिभावाने पहावे अशा ह्या व्यक्ती पण नसतात. त्यामुळे ओबड-धोबडपणा जास्तच जाणवतो.

'खरं म्हणजे तुम्ही ह्या पुण्याच्या लोकांनी दुसऱ्या बाजीरावाचा पुतळा उभारला पाहिजे' असे श्यामने म्हणताच कर्वे चमकले होते व तसे चमकता–चमकताच म्हणाले, 'काय बोलता श्यामराव ? दुसऱ्या बाजीरावाचा पुतळा काय म्हणून ?'

'काय म्हणून काय विचारता ? दुसऱ्या बाजीरावाने कधी अभक्ष्य भक्षण केले नाही, यवनबाईशी संबंध ठेवला नाही. ज्या काही पाच–पन्नास बायकांशी संबंध ठेवला त्या चांगल्या ब्राह्मण होत्या, जास्तीत जास्त देशस्थ असतील, पण ब्राह्मण !'

'काय बोलता आहात श्यामराव ?' चमकण्याचे भरात कर्वे मघाचाच प्रश्न परत विचारते झाले.

'खरं तेच बोलतो आहे!' श्याम ठामपणे म्हणाला, 'अहो, कोणा 'जानवेवाल्या'चा पुतळा उभारावयाचा तर तो योग्य माणूस नको ?' हजारो ब्राह्मण–भिक्षुकांच्या जेवणा-वळी, शेकडो भटजींना हजारो रुपये दक्षणा कोणी वाटली ? पहिल्या बाजीरावाने की दुसऱ्या ?'

आता मात्र कामतलाही रहावेना. तो म्हणाला, 'तुमची पण कमाल आहे श्याम-काका !'

'माझी कसली कमाल ?'

'तुमच्या नेहमीच्या चालण्या-बोलण्या-वरून, तुमचा वेगवेगळ्या विषयांवरच्या मतावरून तुम्ही अगदी कर्मठ जरी नाही तरी जुन्या विचाराचे आहात असे आम्ही समजून चाललो होतो; पण आता पहिल्या बाजी-रावाच्या पुतळ्याच्या कल्पनेची रेवडी उडवता आहात हे बघून काही वेगळेच वाटायला लागले आहे.'

'पण मी कर्मठ ब्राह्मणच आहे. पहिल्या बाजीरावाच्या वेळी जे पुण्याच्या कर्मठ ब्राह्मणांनी केले तेच करावे असे मी म्हणतो आहे. पहिल्या बाजीरावाने धर्माचे वा राज्याचे रक्षण असे केले असेल; पण पालन केले ते दुसऱ्या बाजीरावाने ! तेव्हा त्या धर्म-परायण पेशव्याचा पुतळा उभारावा असेच मी म्हणतो आहे !'

श्यामच्या ह्या सगळ्या बोलण्याला चेष्टेचा भरपूर वास येत होता. तो कर्व्यांच्या मस्तकात जाऊन पोहोचला.

अशी चांगल्या गोष्टींची टिंगल, टवाळी, चेष्टा करणे योग्य नाही हा श्यामराव, सांगून ठेवतो तुम्हाला !'– कर्वे रागाने लालेलालच झाले नव्हते तर रागाने त्यांचे त-त्, प-प् होऊ लागले होते.

कर्व्यांना संतापलेले पहाताच श्यामने आपला पवित्रा बदलला.

'कामत, कर्वे शांतपणे विचार करा. अहो, ज्या पेशव्याने दिल्लीपर्यंत धडक मारली, ज्याने राजपुतांशी सख्य जोडले, जो योद्धा कोणतेही युद्ध हरला नाही त्या पेशव्याला पुण्याच्या भटा–भिक्षुकांनी कसे वागवले ? त्याला बाजूला करून नानासाहेबाला गादी-वर बसवण्याचे कारस्थान केले !

'मस्तानीपासून दोन मुलगे झाले होते, त्यांच्या मुंजी लावाव्यात म्हणून बाजीरावाने जंग जंग पछाडले; पण त्यांच्या मुंजी होऊ दिल्या नाहीत. ती ब्राह्मणाची मुले मुसल-मान राहिली ! ती पानिपतात मराठ्यांच्या बाजूने लढली; प्राणपणाने लढली; पण त्यांच्या मुंजी काही होऊ शकल्या नाहीत !

'पुढे तर मस्तानीला कैद केले. तिची व बाजीरावाची गाठ–भेट होणार नाही अशी व्यवस्था केली.

आणि असे म्हणतात की, बाजीरावाने अंगात ज्वर असता नर्मदेत स्नान केले ती आत्महत्याच होती !

'आता आपण कोणत्या तोंडाने त्या थोर माणसाचा पुतळा उभा करावयाचा ? तुम्हीच सांगा !'

कर्वे गंभीर झाले तसाच कामतही झाला. कर्व्यांना काय बोलावे ते सुचेना. मग कामतच म्हणाला,

'काका, त्या इतिहासकाळच्या गोष्टी, त्या वेळी रूढिग्रस्त–जुन्या विचारांची ब्राह्मण मंडळी असतील; पण आता तरी परिस्थिती बदलली आहे ना ?'

'काही बदलली नाही. बाजीरावाच्या त्या दोन यवनी मुलांचे पुढे काय झाले ? ते कोण आहेत ? कोठे आहेत ? ह्याची माहिती आहे कुणाला ? त्यांना कधी पुण्याला मानाने बोलावले आहे कुणी ? दिल्लीच्या बहादूरशहा जफर बादशहाच्या नातेवाइ-कांना पेन्शन मिळावी म्हणून वर्तमानपत्रात रकानेच्या रकाने; पण ह्या मुलांच्या नाते-वाइकांबद्दल काय ?

'म्हणजे बाजीरावाच्या मुसलमान मुलांचे नातेवाइक अजून आहेत ?' कर्व्यांनी मोठ्या आश्चर्याने विचारले.

अहो, मध्यभारतातल्या बुंदी संस्थानचे नबाब म्हणजे आपल्या थोरल्या बाजीरावांचे मुलगे ! बाकी संस्थाने खालसा झाली त्यात तेही गेले !' श्याम हळहळून म्हणाला.

'ह्या सगळ्याचा अर्थ एवढाच की पहिल्या बाजीरावाच्या पुतळ्याला तुमचा विरोध आहे असाच ना ?' कर्वे.

'अगदी चूक ! पहिल्या बाजीरावाचा पुतळा व्हावाच. फक्त त्याच्या अनावरण–समारंभाला मुख्यमंत्री वा प्रधानमंत्री वगैरे न बोलवता बुंदीच्या नबाबांना बोलवावे, त्यांचा सत्कार करावा व त्यांच्या हस्ते कार्य-क्रम करावा म्हणजे पूर्वी केलेल्या पापाचं थोडं तरी क्षालन होईल !'

□

## शस्त्रास्त्र सज्ज असलेला

# पाकिस्तान भारताशी परत युद्ध करेल का?

राजेंद्र सखदेव

जगाच्या कोणत्या ना कोणत्या भागात गेल्या दोन–चार वर्षांत मर्यादित स्वरूपाची युद्धे होत आली आहेत. यामध्ये इराण–इराक, ब्रिटन–अर्जेंटिना, इस्रायल – लेबेनॉन यांसारखी मर्यादित युद्धे झाली. प्रथम रशियाने अफगाणिस्तानमध्ये लष्करी हस्तक्षेप केला. त्यानंतर १९८० मध्ये इराण–इराक–युद्ध सुरू झाले. मध्ये काही काळ ते थंडावले असे वाटत होते; परंतु आजमितीस ते परत थोड्या-फार फरकाने चालूच आहे. त्यानंतर १९८२ मध्ये इंग्लंड व अर्जेंटिना यांच्यात फॉकलंडबेटाच्या मालकी हक्कावरून युद्ध होऊन त्यामध्ये इंग्लंडने अर्जेंटिनास पराभूत केले. यानंतर जुलै १९८२ मध्ये इस्रायलने लेबेनॉनवर हल्ला करून बैरूत शहरावर कब्जा मिळवून बैरूतमधून पॅलेस्टाइन मुक्ति संघटनेच्या गनिमांना शहराबाहेर हाकलून दिले. हेच गनीम आज हल्ले करून इस्रायली सैनिक ठार मारत आहेत. नुकताच अमेरिकन परराष्ट्रमंत्री श्री. शुल्ट्झ यांनी या प्रश्नांची कोंडी फोडावयाचा प्रयत्न केला; परंतु श्री. अराफत यांच्या ताठर धोरणामुळे हा प्रश्न न सुटता तसाच लोंबकळत राहिलेला आहे.

आता पाकिस्तानबाबत विचार करता आपणास असे दिसून येते की, दोन्ही देशांच्या वरिष्ठ नेत्यांच्या बैठकी होतात. युद्ध नको असा प्रस्ताव पुढे येत असतानाच अमेरिकेने दिलेली ३ अब्ज रुपयांची लष्करी मदत घेऊन झिया आपली लष्करी ताकद वाढवत आहेत. याच झियांनी युद्ध नको कराराचा कागदी घोडा भारतीयांच्या पुढे नाचत ठेवला आहे. नुकताच पाकिस्तानने भूमिगत अणुस्फोटाची चाचणी घेण्याचा प्रयत्न केल्याचे निदर्शनास येत आहे. अर्थात नेहमीप्रमाणे पाकिस्तानी लष्करी नेत्यांनी या वृत्ताचाही इन्कार केला आहे. चीनच्या सिकियांग प्रांतातून निघून पाकच्या वायव्य सरहद्द प्रांतास जोडणारा काराकोरम–मार्ग नुकताच पूर्ण झाला आहे. वास्तविक पाहता हा मार्ग पूर्ण करण्यात चीनचा पाकिस्तानला मदत किंवा त्यांना लष्करी मदत किंवा वाहतुकीच्या सोयीसाठी हा हेतू नसून चीनचा त्यात मोठा स्वार्थ आहे. अफगाणिस्तानला लागून असलेल्या रशियन सीमेपर्यंत जाण्याचा रस्ता यामुळे सोयीचा झाला आहे.

ज्या वेळी सर्वसामान्य माणूस या सर्व गोष्टींचा विचार करतो त्या वेळी मनात एकच विचार येतो की, पाकिस्तान भारताशी परत युद्ध करेल का? या सर्वसामान्यांच्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी अनेक गोष्टींचा अनेक दृष्टींनी विचार करावा लागेल.

आजमितीस पाकिस्तानला अत्याधुनिक शस्त्रास्त्रांनी समृद्ध करण्याचा निर्णय अमेरिकेने घेतला आहे. पाकिस्तानला ३ अब्ज रुपयांची लष्करी स्वरूपातील मदत देण्याचा निर्णय रेगन सरकारने घेतला आहे. हे सर्व करण्यामागे आशियाखंडातील रशियाच्याच हालचालीस खीळ घालणे हे मुख्य धोरण आहे. पाकिस्तानच्या सीमेला लागून असलेल्या अफगाणिस्तान देशात रशियाने केलेल्या लष्करी हस्तक्षेपास शह देण्यासाठी किंवा त्यास रोखण्यासाठी म्हणा अमेरिकेने, पाकिस्तानला शस्त्रसमृद्ध करण्याचा निर्णय घेतला. डिसेंबर १९८३ मध्ये रशियाच्या अफगाणिस्तानातील लष्करी हस्तक्षेपास ४ वर्षे पूर्ण होतील. या चार वर्षांत रशियन फौजांना वाढता विरोध अफगाण गनिमांकडून होत आहे. या अफगाण गनिमांना पाकिस्तानमध्ये युद्धाचे शिक्षण दिले जात आहे. या अफगाणी गनिमांना अमेरिकन सरकार शस्त्रास्त्रे व मदत पाकिस्तानमार्फत देत आहे. अफगाणिस्तानात असलेल्या रशियन फौजा खैबरखिंडीमार्फत पाकिस्तानमध्ये शिरतील अशी भीती अमेरिकेला वाटत होती. लेबेनॉन ताब्यात घेतल्यावर जर इस्रायली फौजांनी सीरियावर हल्ला केला तर त्या वेळी रशिया कोणती पावले उचलेल याची अमेरिकन लष्करी निरीक्षकांना पूर्ण कल्पना होती. कारण रशिया व सीरिया यांच्यात मैत्रीचा व मदतीचा करार झालेला आहे व यामुळेच एक प्रतिचाल किंवा प्रतिशह म्हणून म्हणा रशियन फौजा खैबरखिंडीमार्फत पाकिस्तानमध्ये प्रवेश करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

आशियाखंडातील आखाती प्रदेश व अरबराष्ट्रे ही तेथील पेट्रोलियममुळे अत्यंत समृद्ध झालेली आहेत. साहजिकच या पश्चिम आशियातील समृद्ध राष्ट्रांमुळे जागतिक घडामोडीत अनेक बदल होत आहेत. साहजिकच या प्रदेशातील समृद्धीचा ओघ आपल्याकडे वळवण्यासाठी जगातील अमेरिका व रशिया या दोन महासत्तांच्यात चुरस निर्माण झाली आहे. या आखाती प्रदेशाकडे व तेथील तेलसाठ्याकडे जाणारा एकुलता एक खुष्कीचा मार्ग हा पाकिस्तानमधून–खैबरखिंडीमधून–जातो. एका अर्थाने हा मार्ग म्हणजे पाकिस्तानपुढे निर्माण झालेले प्रश्नचिन्ह आहे; परंतु या गोष्टीमुळेच जागतिक युद्धनीतीत महत्त्वाचा असा बदल घडून आला. आशियाखंड हे तिसऱ्या महायुद्धाचे क्षेत्र समजले जाऊ लागले; परंतु पाकिस्तानने या रस्त्याच्या प्रश्नाचा व अफगाणिस्तानातील फौजांच्या धोक्याच्या इष्टापत्तीचा आपल्या फायद्याच्या दृष्टीने वापर करून घेतला आहे.

### चीन–पाकिस्तानसंबंध

पूर्वी ज्या वेळी कार्टर सत्तेवर होते त्या वेळी कार्टर सरकारने पाकिस्तानला ४० कोटींची लष्करी मदत देऊ केली होती; परंतु

पाकिस्तानने तेव्हा ती मदत किरकोळ म्हणून धुडकावून लावली होती, त्याच पाकिस्तानला आज सत्तेवरील रेगन सरकार ३,००० कोटींची लष्करी मदत देण्यास तयार झाले आहे व हप्त्या-हप्त्याने ती देण्यास सुरुवातही होईल. आता हे ऐकल्यानंतर, वाचल्यानंतर सामान्यपणे मनात विचार येतो की, ही ३,००० कोटींची लष्करी मदत अमेरिका विनाकारण देईल का? याच्या बदलल्यात अमेरिका काहीच अपेक्षित नाही का? किंवा अमेरिका ही रक्कम कोणत्याही मार्गाने वसूल करणार नाही का? या व यासारख्या निर्माण होणाऱ्या अनेक प्रश्नांबाबत दोन्हीही देशांची नेतेमंडळी मौन पाळून गप्प असली तरीही आंतरराष्ट्रीय लष्करी निरीक्षक व आंतरराष्ट्रीय विचारवंत सांगतात की, अमेरिका व पाकिस्तान यांच्यामध्ये कोणत्या ना कोणत्या स्वरूपाचा गुप्त लष्करी करार झाला असला पाहिजे. यातील करारानुसार पाकिस्तानमध्ये अमेरिकेचे लष्करी तळ उभारले जात आहेत. वरकरणी रेगन-सरकार आपल्याला पाकमध्ये लष्करी तळ मिळाल्याच्या वृत्ताला ठामपणे विरोध दर्शवत असले तरीही परिस्थती अशी आहे की, कराचीपासून ६० मैलांवर असलेल्या ग्वाडार बंदरात व पेशावर येथे अमेरिकेने अनुक्रमे नाविक व हवाई-तळ उभारण्याचे काम सुरू केले आहे. ज्या वेळी हे तळ उभारले जातील व अत्याधुनिक स्वरूपातील शस्त्रास्त्रे येतील. साहजिकच तंत्रज्ञ, शिक्षक, सैनिक, सल्लागार या स्वरूपात हजारो अधिकारी व सैनिक पाकमध्ये येतील व साहजिकच अमेरिकेच्या या कृतीमुळे अमेरिकेचा फार मोठ्या प्रमाणावर दबाव राहील. साहजिकच पाकिस्तानच्या लष्करी धोरणावर, लष्करी हालचालींवर अमेरिकेचा दबाव असणे अटळ आहे. अमेरिकेच्या राजकीय धोरणावरूनच पाकिस्तानला आपले राजकीय धोरण आखावे लागेल. म्हणूनच या दबावशक्ती झिया उल्-हक् यांना पूर्णपणे आपल्या नियंत्रणाखाली ठेवतील.

चीन व पाकिस्तान यांच्यात संबंध चांगले आहेत. चीनने अमेरिकेशी आपले संबंध सुधारणे चालू ठेवले आहे. अमेरिका व चीन यांच्यात सध्या सलोख्याचे राजनैतिक संबंध प्रस्थापित होत आहेत. आज चीन रशियाला आपला नंबर एकचा शत्रू मानतो. चीनचा सिकियांग प्रांत, पाकची वायव्यसरहद्द जोडणारा काराकोरम मार्ग नुकताच सुरू झाला. हा मार्ग काश्मिरवरून जाऊन वायव्यसरहद्द प्रांतास मिळतो. या मार्गामुळे काश्मिरला पर्यायाने भारतास धोका उद्भवतो. हे जरी खरे असले तरीही, या मार्गामुळे चीन पाकिस्तानला मोठ्या प्रमाणावर लष्करी मदत करू शकेल अशी शंका निर्माण होऊ शकत नाही. कारण चीनचा हा मार्ग बांधण्यात स्वार्थच जास्त आहे. या मार्गामुळे चीनला, रशियाच्या अफगाणिस्तानला लागून असलेल्या सरहद्दीपर्यंत जाणे सहज शक्य झाले आहे. या मार्गामुळे चीन पाकिस्तानला लष्करी सामुग्रीची मदत करणे संभवत नाही. कारण चीनचे लष्करी सामुग्री बनवायचे कारखाने चीनच्या पूर्वेकडे आहेत व चीनने मनात आणले तरी ३ ते ३५०० मैल अंतर काटून दारुगोळा, मदत देणे सुरक्षिततेच्या दृष्टीने अशक्य आहे. तिबेटमध्ये आज चीनची लाख-दीड लाख फौज आहे व चीनच्या दृष्टीने या लष्करास मदत पुरवणे जास्त महत्त्वाचे आहे. आजचे चीनचे लष्करी उत्पादन हे दुसऱ्या देशास पुरवण्याएवढे मोठ्या प्रमाणावर नाही.

जून १३, १९८३ रोजी पाकिस्तानने अणुबॉबचा भूमिगत स्फोट केल्याची शक्यता भारत सरकारने व्यक्त केली आहे. अर्थात पाकने या वृत्ताचा इन्कार केला आहे. पाकिस्तानने क्वेट्टयाजवळील रसूक पर्वतराजीत १३ जून ८३ रोजी सकाळी ८ वाजता २० ते ५० किलोटन वजनाच्या अणुबॉबचा भूमिगत स्फोट केल्याचा, काही परकीय वृत्तसंस्थांनी लष्करी अधिकाऱ्यांचे अहवाल देऊन स्पष्ट केले आहे.

पाकिस्तानला हा अणुबॉब बनवण्यासाठी अमेरिका व त्याची मित्रराष्ट्रे यांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष स्वरूपात मदत केली आहे. अमेरिकेने पाकिस्तानच्या शेकडो शास्त्रज्ञांना अणुबॉबचे तंत्रज्ञान दिले, शिक्षण दिले. फ्रान्सने व इतर राष्ट्रांनी नकाशे, आराखडे व इतर मदत केली. अशा तऱ्हेने पाकिस्तान हे आशियाखंडातील अणुबॉब करणारे दुसरे राष्ट्र ठरले. जर आज पाकिस्तानने खरोखरीच अणुबॉब बनवला असेल तर त्याच्या धमकीच्या बळावर पाकिस्तान काही सवलती, काही फायदे नक्कीच मिळवू शकेल.

## लष्करीदलात प्रचंड वाढ

रशियाच्या आक्रमणाचे धोक्याचे निमित्त करून पाकिस्तानने आपल्या लष्करीदलात प्रचंड वाढ केली आहे. पाकिस्तानने आपल्या भू-सेनेतही भरीव वाढ केली आहे. मूळ चौदा डिव्हिजनमध्ये ( एक डिव्हिजन म्हणजे २०००० ) वाढ करून डिव्हिजनची संख्या २१ पर्यंत नेली आहे. या सर्व डिव्हिजन सात कोअर्सवर आधारित आहेत. रशियाच्या अफगाणिस्तानातील हस्तक्षेपानंतर पाकिस्तानच्या संरक्षणदलातील वाढीस चांगलाच वेग आला आहे. कारण इतकी वर्षे पाकिस्तानला भारताविरुद्ध एकाच आघाडीवर लढावे लागे; पण आता पाकिस्तानला २ आघाड्या सांभाळाव्या लागणार आहेत. या दोन्ही आघाड्यांवर एकाच वेळी लढण्याच्या दृष्टीने पास्तिानने आपले शस्त्रबळ व सैन्य वाढवले आहे. पूर्वी अशी परिस्थिती नव्हती. पाकला आपल्या पूर्वसीमेचीच जास्त काळजी वाटत होती; परंतु आता पाकिस्तानला आपल्या पश्चिमेकडील १२०० मैलांची दुसरी आघाडीही सांभाळावी लागणार आहे. अशा तऱ्हेने पाकिस्तानला निर्माण झालेल्या धोक्यात पाकच्या दृष्टीने निश्चितच वाढ झाली आहे. म्हणूनच पाकिस्तानने आपली स्थलसेना ३२४५०० वरून वाढ करून ४५०,००० पर्यंत वाढवली आहे.

१९७१ च्या युद्धाच्या वेळी पाकिस्तानकडे १९ स्कॉड्रन्स व भारताकडे २५ स्क्वॉड्रन्स होत्या; परंतु त्यानंतर ११–१२ वर्षांत पाकने आपल्या विमानदलात ५ ते ८ नवीन स्कॉड्रन्स वाढवल्या आहेत. नुकताच अमेरिका व पाकिस्तान यांच्यात करार झाला आहे. त्यानुसार अमेरिका पाकिस्तानला (४०) F16 विमाने पुरवणार आहे. यातील पहिला व दुसरा हप्ता पाकिस्तानकडे आलेला पण आहे. या F16 विमानात G–79 जातीचे इंजिन बसवलेले आहे. १९८२–८३ च्या पाकिस्तानच्या एअरफोर्सच्या अहवालानुसार पाककडे कॅनबेरा जातीच्या Light Bomber ची एक स्कॉड्रन मिराज ३ व मिराज ५ च्या फायटर बॉबर विमानाच्या स्कॉड्रन मिग १९ च्या (Interceptor Squadrons) पाकिस्तानने F16 ४० विमाने ३५ मिराज विमाने व A–5 जातीच्या चिनी विमानांची ऑर्डर नोंदवली आहे.

अमेरिकेने नुकतीच F14 Tomcat F15 Eagle F16 Falcon F18 Hornet इ. विमाने विकसित केली आहेत. यापैकी F14 व F18 ही ( Naval aircrafts) आहेत. F15 हे फायटर जातीचे असून F16 हे फायटर बांबर आहे. म्हणूनच F16 हे त्यातल्या त्यात स्वस्त ( Loast Sophisticated ) अर्थात मिराज २००० व U. S. S. R. विमानांशी तुलना करता स्वस्त आहे. कोणत्याही भारतीयास असेच वाटेल की, पाकिस्तानला वरील विमाने मिळू नयेत. F20 हे Under devalopement आहे. त्यास F. S. G असे नाव दिले आहे. भारतात याचे Co-production करण्यासाठी Indian Air Forse ला अमेरिकेकडून विचारणा झाली होती. भारताने आपला नकार दर्शविला. कारण E20 हे अमेरिकेने स्वतःच्या U.S. Air Forse साठीही हे विमान नाकारले असले तरीही हे विमान जर्मनी, हॉलंड, जपान, इटली इ. ना विकली गेली आहेत या F5G या दूरवर आघात करणाऱ्या विमानाचे ५ स्कॉड्रन्स मिळावे म्हणून पाकिस्तान प्रयत्नशील आहे.

F16 विमाने रडारयंत्रणेला चुकवून अगदी झाडाच्या उंचीएवढी खाली येऊन बांबफेक करू शकतात. आपल्या लक्ष्यावर खोलवर घुसूनही क्षणार्धात झडप घालावयाचे कौशल्य या विमानाकडे आहे. याच F16 विमानाने हल्ला करून इराकची अणुभट्टी इस्त्रायलने उडवून दिली होती व हाच धोका पाकिस्तानपुढेही उभा आहे. पाकिस्तानने आपल्या संरक्षणखर्चातही भरीव वाढ केली आहे. प्रतिवर्षी ३०० कोटींवरून १५०० कोटींच्यावर खर्च नेला आहे.

वॉशिंग्टनच्या प्रेस प्रोग्राममध्ये १३ डिसेंबर १९ २ रोजी झिया उल-हक यांनी सांगितले की, या F16 विमानांचा उपयोग अर्थात अफगाणिस्तानकडून होईल. इंडियाकडे त्याचा वापर केला जाणार नाही; परंतु भारतातील अमेरिकेचे राजदूत हॅरी बार्नेस यांनी नुकतेच स्पष्ट केले आहे की, पाकिस्तानला दिलेली लष्करी सामग्री पाकिस्तानने कुठे वापरावी हे पाकिस्तानने स्वतः ठरवायचे आहे. त्यावर कोणत्याही प्रकारचे निर्णय बंधनकारक नाहीत. आज पाकिस्तानमध्ये २० नवे विमानतळ बांधण्याचे काम चालू आहे, त्यापैकी बरेच पाकिस्तानच्या पूर्वसीमेकडे म्हणजे भारताच्या बाजूस आहेत. सरगोधा (Sargodha) हा पाकिस्तानच्या पीएएफचा मेन बेसकॅंप अमृतसरपासून २२५ कि. मी. वर आहे.

## भारतापुढे धोका

पाकिस्तानने आपल्या नौसेनेत फारशी वाढ केली नाही. पाकिस्तानात बांधल्या जात असलेल्या अमेरिकन नाविकतळामुळे दियागो गार्सिया व कराची बंदराजवळ अमेरिकेच्या लढाऊ विनाशिकांची आवक-जावक वाढली आहे. अर्थातच या विनाशिकेचे अप्रत्यक्षपणे पाकिस्तानला संरक्षण होत आहे. साहजिकच भारताकडून सागरी हल्ल्याची शक्यता खूपच कमी झाली आहे. उलट ब्रिजेट अटलांटिकच्या फ्रेंच बनावटीच्या विमानांमुळे पाकिस्तानच्या सागरी निरीक्षणक्षमतेत निश्चितच वाढ झाली आहे. पाकिस्तानकडून एक्सोसेत मिसाइलच्या वापराचा संभाव्य धोकाही भारतापुढे उभा राहिला आहे. याच मिसाइल्सचा वापर अर्जेंटिनाने करून इंग्लंडच्या विनाशिका नष्ट केल्या होत्या. साहजिकच भारतीय नौसेनेस या मिसाइलचा मोठाच धोका संभवतो. मुंबईनजीकच्या समुद्रात उभारलेल्या तेलविहिरीस पाकिस्तानकडून मोठा धोका संभवतो. साहजिकच या विहिरीचे योग्य तन्हेने संरक्षण करणे ही एक मोठी जबाबदारी भारतावर येऊन पडली आहे.

परकीय तंत्रज्ञान, परकीय मदत घेऊन पाकिस्तानने स्वतःचा अणुप्रकल्प उभारला आहे. या प्रकल्पात अमेरिकेचा वाटा फार मोठा आहे; परंतु हाच अणुप्रकल्प आज पाकिस्तानपुढील मोठा चिंतेचा विषय होऊन बसला आहे. ह्या अणुप्रकल्पाविषयी पाकिस्तानने कमालीची गुप्तता पाळली आहे. कारण त्यांना इस्त्रायल, रशिया व भारत यांच्याकडून संभाव्य धोका संभवतो. इस्त्रायलने अरब राष्ट्रांवर आपला वाढता दबाव निर्माण केला आहे. या दबावाला पाकिस्तानकडून तडा जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. इस्त्रायलला पाकिस्तानचा अरब राष्ट्रांत वाढणारा हस्तक्षेप नको आहे. कारण त्यामुळे इस्त्रायलच्या स्थानास धक्का पोहचू शकतो. इस्त्रायलने नुकतीच F16 विमानांच्या सहाय्याने बांबफेक करून इराकची अणुभट्टी संपूर्णपणे नष्ट केली आहे. याबाबत दुसरा धोका रशियाकडून संभवतो व तिसरा धोका भारताकडून संभवतो. तरीदेखील भारताकडून विनाकारण हल्ला संभवत नाही. या दृष्टीने पाकच्या अणुप्रकल्पाला इस्त्रायल व रशियाकडून प्रमुख धोका संभवतो. त्यामुळेच पाकच्या प्रत्येक कृतीकडे हे देश डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवत आहेत.

आजमितीस एकंदर परिस्थिती पाहता पाकिस्तान आपली युद्धक्षमता फार मोठ्या प्रमाणावर वाढवत आहे. पाकिस्तानने अनावश्यक शस्त्रास्त्रांचा साठा करण्याचे धोरण अवलंबिले आहे. पाकिस्तानला अमेरिका ४० कोटी डॉलर्स किमतीची 'हार्पून' क्षेपणास्त्रे देणार आहे. त्याविषयीचा ठराव नुकताच अमेरिकेच्या सिनेटपुढे आला आहे. या 'हार्पून' क्षेपणास्त्रामुळे भारताने समुद्रात खोदलेल्या तेलविहिरी (बॉंबे हाय) व इतर भारताची एकुलती एक विमानवाहू नौका विक्रांत यास फारच मोठा धोका उत्पन्न झाला आहे. कारण ही क्षेपणास्त्रे जमिनीवरून, आकाशातून व पाण्यातूनही मारा करू शकतात. पाकिस्तानकडे असलेल्या पाणबुडीवर ही क्षेपणास्त्रे बसवून जर त्याचा मारा करून समुद्रातील तेलविहिरी व विक्रांत या क्रूझरवर मारा केला तर भारताचे किती नुकसान होईल याचा संरक्षणमंत्र्यांनी त्वरित विचार करून त्या दृष्टीने पावले उचलणे अत्यावश्यक आहे. या 'हार्पून' क्षेपणास्त्राची रेंजही ९० कि. मी. आहे. साहजिकच भारताच्या भाभा अणुसंशोधनकेंद्रालाही यामुळे फार मोठा धोका संभवतो. कारण वरील सर्व निर्देशित केलेली ठिकाणे ही हार्पूनच्या पल्ल्यामध्ये येतात. पाकिस्तानच्या नौदलाला ही क्षेपणास्त्रे अतिशय उपयोगी पडतील. अशा अत्याधुनिक शस्त्रास्त्रांमुळे नौदल लढाईचे संदर्भच बदलण्याचे किंवा नवीन परिणाम लाभायची शक्यता निर्माण झाली आहे. या नव्या आव्हानांना तोंड देण्यासाठी भारताला त्वरित पावले उचलण्याची गरज आहे. अर्थात युद्धात शस्त्रातील वरचढपणा नेहमी निर्णायक असतोच असे नाही. शस्त्र वापरणारा माणूस अधिक निर्णायक असतो याचा अनुभव दोनदा आलेला आहे. तिसऱ्यांदा अशाच प्रकारचा अनुभव घेण्याची पाकची इच्छा दिसते.

पाकिस्तानच्या अनावश्यक शस्त्रास्त्रखरेदी, युद्धक्षमतेत वाढ यामुळे आशिया खंडात अनावश्यक तणाव निर्माण होत आहेत. यामुळे साहजिकच भारतानेदेखील आपल्या सैन्याच्या आधुनिकीकरणास वेग दिला आहे, आपल्या संरक्षणखर्चातही मोठ्या प्रमाणावर वाढ करण्यात आली आहे. भारताचा संरक्षणखर्चही ५१०० कोटी प्रतिवर्षापर्यंत जाऊन पोहोचला आहे. पाकिस्तान लष्करी मदतीसाठी

विकसित राष्ट्रांवर (अमेरिकेवर) मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे, हाच त्यांच्या संरक्षणयंत्रणेतील फार मोठा कच्चा दुवा आहे. इंधनाची उपलब्धता, वाहतुकीची साधने व पेचप्रसंग आल्यास उपयोगात आणावी लागणारी राखीव कुमक या तिन्ही दृष्टींनी पाकिस्तानी संरक्षणयंत्रणा पुरेशी सुसज्ज नाही. पहिला हल्ला केल्यावर दिल्या जाणाऱ्या प्रत्युत्तराला तोंड देण्याची कुवतही पाकिस्तानी फौजेत नाही,

पाकिस्तानचा विचार करताना आपणाला नुसत्या पाकिस्तानचाच विचार करुन चालणार नाही. त्याचबरोबर चीनचा विचार करणेही अपरिहार्य आहे. पाकिस्तान व अमेरिका यांच्यासंबंधीची गोष्ट आपणा सर्वांस चांगलीच माहीत आहे. माओच्या काळात अमेरिका व चीन यांचे राजनैतिक संबंध सुरळीत नव्हते. त्या दोन देशांत प्रचंड मतभिन्नता होती; परंतु आजची राजकीय परिस्थिती याहून खूपच वेगळी आहे. अमेरिका व चीन यांच्यातील बिघडलेले संबंध सुधारणे हे चालू आहे. या दोन्ही देशांत परत राजकीय स्वरूपातील संबंध प्रस्थापित होत आहेत. कारण या दोघांचा एक समाईक शत्रू आहे व तो म्हणजे रशिया. ज्या अर्थी चीन व अमेरिका यांचे संबंध चांगले आहेत त्या अर्थी पाकिस्तान व चीनचे संबंधही चांगले असणे स्वाभाविकच आहे आणि यामुळेच भारताला जो युद्धाचा धोका संभवतो तो केवळ पाकिस्तानकडून नसून भारताचा दुसरा शेजारी चीन या दोहोंच्याकडून संभवतो.

भारताची नैसर्गिक भौगोलिक परिस्थिती अशी आहे की, भारताच्या पूर्वेकडे भारताच्या सीमेलगत चीन पसरला आहे व पश्चिमेला पाकिस्तान आहे. त्यामुळे यापुढे भारतालादेखील आपल्या दोन्ही सीमांवर लक्ष ठेवणे अत्यावश्यक आहे. भारताच्या पश्चिम सीमेबाबत आपण विचार केला आहे. आता पूर्व सीमेबाबत विचार करू.

## तोंड देण्यास भारत समर्थ

भारताशी चीनने १९६२ साली युद्ध केले. या युद्धात भारताचा पराभव झाला. पराभवाची अनेक कारणे आहेत. या सर्व कारणांमध्ये सरकार हेच सर्वात अधिक दोषी ठरते. स्वातंत्र्य आल्यावर सरकारने स्वातंत्र्यरक्षण ही गोष्ट अग्रहक्काची कधीच मानली नाही. लाथा बसल्याशिवाय जागे व्हायचे नाही व जाग आल्यावरही सुस्तपणे पावले टाकायची हा आपल्या लोकशाहीस मिळालेला शापच आहे की काय कोण जाणे.

चीन व पाकिस्तान या दोघांच्याही एकंदर लष्करी हालचाली पाहताना, भारताभोवती एक व्यापक जाळे टाकण्याची त्यांची योजना चालू असल्याचे भासते. म्हणूनच भारताने ही त्यांची योजना संपूर्णपणे उधळून टाकली पाहिजे.

भारताची २५०० मैलांची उत्तर सीमा ही चीनच्या दृष्टीने पर्वणीच म्हणावी लागेल. यातील बराच भाग हा बर्फाच्छादित आहे, मध्ये प्रचंड पर्वत, दऱ्या आहेत. हे सर्व असूनही चीनने या भागातूनच हल्ले करून भारताचा पराभव केला होता. यातून भारतास अनेक गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. या युद्धात दिसून आलेले आपल्या संरक्षणयंत्रणेतील कच्चे दुवे आपण शोधून काढून ते नष्ट करावयास हवे होते.

कोणतीही प्रचंड व गूढतेचे आवरण असलेली गोष्ट माणसाच्या मनात कुतूहलाबरोबरच एक प्रकारच्या भीतीची भावनाही निर्माण करते. चीनचा प्रचंड विस्तार, त्यांची अफाट लोकसंख्या व पूर्वीपासून बाहेरच्या जगाला चीनबद्दल असलेले अल्पज्ञान यामधून अशीच एक भीतीची भावना निर्माण झाली आहे.

नुकतीच पाकिस्तानातील एका वृत्तसंस्थेने अशी बातमी दिली आहे की, चीन पाकिस्तानमध्ये २ लष्करी तळ बांधत आहे. अर्थात या वृत्ताला पाक सरकारने दुजोरा दिलेला नसला तरीही या वृत्तावरून चीन–पाकचे किती घनिष्ठ संबंध आहेत हे स्पष्ट होते.

काराकोरम मार्गामुळे चीन व पाकिस्तान यांच्यात दळणवळण चालू झाले आहे.

या मार्गाचा लष्कर किती प्रमाणात उपयोग करते ते दिसलेच आहे. या मार्गामुळे भारताच्या काश्मिरभागास फार मोठ्या प्रमाणावर धोका संभवतो, म्हणूनच भारतीय संरक्षणदलाचा मोठा लष्करीतळ श्रीनगरविभागात आहे. त्याचप्रमाणे नेफा विभागातही भारतीय सैन्याचा तळ ठेवण्यात आलेला आहे.

दहा–पंधरा हजार फूट पर्वतराजीतून, कडाक्याच्या थंडीत, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतदेखील चिनी सैनिकांनी भारतावर हल्ला केला होता. म्हणूनच भारतीय सैन्याने जरादेखील गाफील न रहाता आपल्या टेहेळणी–पथकात वाढ केली पाहिजे.

आज चीनकडे आंतरखंडीय क्षेपणास्त्रे आहेत. या क्षेपणास्त्रांच्या टप्प्यात भारताची आज अनेक प्रमुख औद्योगिक व राजकीय शहरे येतात. म्हणून प्रथमतः भारताने या क्षेपणास्त्रविरोधी योजना आखून अमलात आणल्या पाहिजेत.

आजमितीस चीनकडे अण्वस्त्रे तयार आहेत त्यांचा ते केव्हाही उपयोग करू शकतात हे भारताने ध्यानात ठेवले पाहिजे. चीनकडे पाणबुडीतून सोडावयाची क्षेपणास्त्रेही तयार आहेत. या क्षेपणास्त्रांमुळे भारताच्या पूर्वकिनाऱ्याला पश्चिम किनाऱ्याप्रमाणेच धोका संभवतो.

आज चीनकडे साधारणपणे ४५ लाख खडे सैन्य आहे. या सैन्याची फेररचना करण्याचे काम सध्या चीनमध्ये मोठ्या प्रमाणावर चालू आहे. चीनची आर्थिक परिस्थितीही तितकीशी चांगली नाही. म्हणूनच बाहेरून शस्त्रास्त्रे विकत घेणे चीनला परवडणारे नाही. म्हणूनच अधिक चांगल्या दर्जाची शस्त्रास्त्रे बनवण्यासाठी लागणारा पैसा उपलब्ध व्हावा म्हणूनच चीन आपल्या सैन्याची पुनर्रचना करत आहे व या पुनर्रचनेतून वाचणारा पैसा शस्त्रास्त्रे सुधारण्यासाठी वापरण्यात येईल.

हे सर्व जरी खरे असले तरीही चीनच्या सामर्थ्याचा वाजवीपेक्षा अधिक बाऊ आपण करतो आहोत. चीनच्या अडचणी आपण लक्षात घेतल्या पाहिजेत. चीनची दळणवळण–सामुग्री फारशी चांगली नाही. सैन्याला रसद पुरवणे हा एक प्रश्न आहे. चीन हा रणगाडे व विमाने याबाबत फारसा प्रगती करू शकलेला नाही. त्याबाबत चीन तसा मागासलेलाच आहे.

वरील सर्व गोष्टी लक्षात घेताना जर पाकिस्तानने भारताशी युद्ध पुकारले तर त्या वेळी पाकिस्तान अमेरिकेप्रमाणेच चीनवरही काही प्रमाणात का होईना अवलंबून असेल. जरी चीन व पाकिस्तानने एकाच वेळी दोन्ही सीमांवर युद्ध पुकारले तरीही त्यास तोंड देण्यास आज भारत समर्थ आहे. यामध्ये भारत–पाकिस्तानचा पराभव तर करेलच; पण चीनविरुद्ध झालेल्या पराभवाचे उट्टे काढल्याशिवाय रहाणार नाही ! □

रंगभूमी माध्यमाच्या शक्यता आणि मर्यादा
लेखनाच्या मर्यादा—दिग्दर्शनाच्या मर्यादा
पंचवीस वर्षांतील मराठी नाट्यप्रेक्षकांची अभिरुची
नेपथ्यरचना—अंधार-प्रकाशातील रंगमंच
अभिनेत्याचं नाटक
रंगभूमीवरचे आवाज आणि पार्श्वसंगीत
यासारख्या महत्त्वाच्या विषयांवर १७–१८ सप्टेंबर हे दोन दिवस मुंबईत चर्चा झाली. 'भरतशास्त्र' मासिकाच्या पाचव्या वाढदिवसानिमित्त ही चर्चा झाली. वृत्तपत्रांतून याचे वृत्तांत थोडक्यात प्रसिद्ध झाले.
हा एक विस्तृत वृत्तांत—

# 'भरतशास्त्र'चा अर्धदशक उत्सव

## रंगभूमीविषयक एक महत्त्वाची चर्चा

रंगभूमीला वाहिलेल्या भरतशास्त्र या मासिकाने नुकताच आपला अर्धदशकपूर्ति-समारंभ रूपारेल महाविद्यालयाच्या जिमखान्याच्या हॉलमध्ये साजरा केला. त्यानिमित्त दि. १७ सप्टेंबर व १८ सप्टेंबर या दिवशी मराठी रंगभूमीसंबंधी विचार करणारी चर्चासत्रे आयोजित केली होती. या चर्चासत्रात श्री. अमोल पालेकर, श्री. श्रीराम लागू, श्री. अनंत भावे, श्री. कमलाकर सोनटक्के, श्री रत्नाकर मतकरी, श्री. अशोक रानडे, श्री अनंत अमेबल, श्री. हेमू अधिकारी यांनी निबंधवाचन केले. अध्यक्षा पुष्पा भावे यांनी चर्चासत्राचे सूत्रचालन केले.

### दि. १७ सप्टेंबर १९८३

### श्री. अमोल पालेकर —'रंगभूमी-माध्यमाच्या शक्यता आणि मर्यादा'

रंगभूमी हे माध्यम काय आहे याचा विचार करून रंगभूमीशी निगडित अशा कलामाध्यमाच्या तुलनेत प्रथम करावासा वाटतो प्रथम लक्षात येणारी दोन प्रमुख माध्यमं म्हणजे लेखनकला आणि चित्रकला. ही दोन्ही कलामाध्यमं रंगभूमीमध्ये अंतर्भूत असूनही रंगभूमीवर ती वेगळी बनतात. लेखकाकडून काव्य, कथा, कादंबरी वगैरे ज्या क्षणी लिहून पूर्ण होते किंवा चित्रकाराकडून ज्या क्षणी चित्र रेखाटून वा रंगवून पूर्ण होतं त्याच क्षणी त्या कलेला पूर्णत्व प्राप्त होतं; पण रंगभूमी या संदर्भातलं लेखन—नाट्यसंहिता लिहून झाल्यामुळे नाटक पूर्ण होत नाही किंवा त्या संहितेला दृश्यस्वरूप प्राप्त झाल्यानंतरसुद्धा नाटक पूर्ण होत नाही. किंवा त्या संहितेला दृश्यस्वरूप प्राप्त झाल्यानंतरसुद्धा नाटक पूर्ण होत नाही. म्हणजे प्रेक्षक हा घटकप्रक्रियेमध्ये आल्याशिवाय नाटक पूर्ण होत नाही. रंगभूमी या माध्यमाची ही एक आवश्यकता आहे. रंगभूमीवर सादर केली जाणारी वस्तू आणि ती ज्याच्यापुढे सादर केली जाते त्याचं अस्तित्व, हा रंगभूमिमाध्यमाचा आवश्यक घटक आहे.

सादरकर्ता आणि प्रेक्षक हे दोघंही जिवंत असणं हीसुद्धा रंगभूमिमाध्यमाची गरज आहे. चित्रपटमाध्यमात प्रेक्षकांच्या अस्तित्वामुळं समोर चाललेल्या चित्रपटात काही बदल होऊ शकत नाही, तसंच नृत्यकला किंवा संगीतकला या माध्यमात निर्जीव मूर्तीसमोर त्यांचं सादरीकरण गृहीत धरलेलं आहे. तिथंही प्रेक्षकांचं अस्तित्व महत्त्वाचं नसतं. एका जिवंत व्यक्तीशी दुसऱ्या जिवंत व्यक्तीचा संवाद साधायचा केलेला प्रयत्न आणि ही प्रक्रिया फक्त रंगभूमी या माध्यमातच अपेक्षित आहे. म्हणून इतर माध्यमात वावरणाऱ्यांना ज्या कारणासाठी रंगभूमी हे माध्यम परावलंबी (आणि पर्यायाने दुय्यम दर्जाचं) वाटतं, तीच खरी रंगभूमिमाध्यमाची ताकद आहे असं म्हणायला हरकत नाही.

एखादं देऊळ साकार करण्यासाठी, लेखनाच्या माध्यमातून जितकं कमीत कमी वर्णन करणं आवश्यक असतं किंवा चित्रकलेच्या माध्यमातून जितकं कमीत कमी चित्रण आवश्यक असतं,त्यापेक्षा कितीतरी कमी प्रयत्नांनी रंगभूमीवर देऊळ उभं राहू शकतं. म्हणजे 'अरे, हे तर देऊळ' असं केवळ शब्दात व्यक्त करून किंवा ॐकाराचा घुमणारा प्रतिध्वनी सूचित करून किंवा अशाच काही पद्धतीने रंगभूमीवर देऊळ मूर्त होतं. कारण प्रेक्षक ते सहज मान्य करतो. दुसऱ्या माध्यमांमध्ये प्रेक्षक ते मान्य करीत नाही. ही त्याची मान्य करून घेण्याची इच्छा किंवा खरं तर स्वतःला फसवून घेण्याची तयारी हे रंगभूमी—माध्यमाचं बलस्थान आहे.

हे बलस्थान एकदा मान्य केल्यावर रंगभूमीवर किती असंख्य प्रकारांनी नाटक उभं राहू शकतं याची कल्पना येईल. संपूर्ण रिकाम्या रंगमंचावर सादर केल्या जाणाऱ्या लोककलेमध्ये याच बलस्थानाचा आधार घेतलेला असतो. प्रोसेनियम थिएटरमध्ये बगीच्याचा पडदा खालीवर करून किंवा वास्तवाचा आभास शक्य तितका निर्माण करणारं नेपथ्य उभारून सादर केल्या जाणाऱ्या नागरी नाटकात याच बलस्थानाचा आधार असतो. केवळ कलाकारांच्या शरीराचा वेगवेगळा वापर करून, ध्वनीच्या सहाय्याने एखादा अमूर्त विचार सादर करणाऱ्या आधुनिक रंगभूमीवरही याच बलस्थानाचा आधार घेतलेला दिसतो. या आपल्या माहितीच्या शक्यतांपलीकडे जाऊन अनेकविध अंगांनी रंगभूमीवर नाटक साकार होऊ शकेल. संगीतामध्ये जसं शब्दांच्या पलीकडे जाऊन केवळ स्वर, लय, ताल यांच्या आधाराने एक अनुभव निर्माण होतो, तसंच रंगभूमीवर आपल्याला आजवर माहिती असलेल्या शक्यतांच्या पलिकडे जाऊन नाटक निश्चित साकार होऊ शकेल.

असं असूनही मराठी रंगभूमीने रंगभूमी या माध्यमाच्या या शक्यता पडताळून पाहिल्या नाहीत. ते का? या माध्यमाच्या बलस्थानाबद्दल मराठी रंगभूमी साशंक आहे किंवा काय असं वाटतं ते का? कारण शोधण्याचा प्रयत्न केला तर दिसतं (१) कमीत कमी प्रयत्नात जास्तीत जास्त फसवणूक किती करता येईल याचा शोध घेण्याऐवजी कमीत कमी फसवणूक करण्याचे जास्त प्रयत्न मराठी लेखनात दिसतात. फक्त संवादातून सांगितलेली कथा म्हणजे नाटक. अशा कथानकप्रधान दृष्टिकोनातून रंगभूमीकडे लेखकांनी पाहिल्यामुळे आणखी वेगळ्या अंगांनी रंगभूमी माध्यमाला भिडण्याचा प्रयत्न जवळजवळ झालाच नाही. म्हणून जयवंत दळवी, श्री. ना. पेंडसे यांच्यासारखे अत्यंत समर्थ लेखक नाटकाला काहीच देऊ शकले नाहीत. किंबहुना नाटक या लेखनप्रकाराचा विचार कथालेखनाहून वेगळ्या पद्धतीने करायला हवा असा दृष्टिकोन या दोघांच्या नाटकांतून आढळत नाही. तसेच विजय तेंडुलकर किंवा रत्नाकर मतकरी यांच्यासारखे प्रायोगिक रंगभूमीवर आलेले नाटककारही एखाद –दुसऱ्या नाटकाचा अपवाद वगळता कथानकप्रधान नाटकच लिहीत राहिले. बादल सरकार, आद्य रंगाचार्य, मोहित चट्टोपाध्याय यांच्यासारख्या नाटककारांनी रंगभूमी माध्यमाच्या निरनिराळ्या शक्यता शोधण्यासाठी विविध अंगांनी नाटक लिहिण्याचे सातत्याने प्रयत्न केले. असे प्रयत्न मराठी नाट्यलेखनात अच्युत वझे, सतीश आळेकर, वृंदावन दंडवते हे अभिमानास्पद अपवाद वगळता, झालेच नाहीत असं म्हणणं भाग पडतं.

(२) मराठी रंगभूमीवरचे नाट्यप्रयोग हे फक्त (प्रोसेनियम) थिएटर या एकाच संकल्पनेत अडकून राहिले. 'गोची' 'बूट-पॉलिश' 'चल रे भोपळ्या' 'राजाचा खेळ,' 'जुलूस' हे मोजकेच नाट्यप्रयोग सोडून प्रोसेनियमच्या बाहेरचे प्रयोग गेल्या पंधरा वर्षांत न होणे हे चांगले नाही किंवा छबिलदास रंगमंचाचा वापर अशा विविध दिशांनी आणि निरनिराळ्या अंगांनी होण्याऐवजी बाहेर अस्तित्वात असलेल्या शिवाजीमंदिर प्रोसेनियम थिएटरची गरीब आवृत्ती म्हणूनच फक्त करण्यात यावा ही खेदाची गोष्ट आहे.

मराठी रंगभूमीचे पाठीवर बिऱ्हाड घेऊन फिरणारी टूरिंग कंपनी असं स्वरूप पाहिलं आणि प्रायोगिक रंगभूमीचा हमखास रंगमंच म्हणजे प्रोसेनियम थिएटरमध्ये अडकलेली राज्यनाट्यस्पर्धा हे पाहिले की, उद्याच्या रंगभूमीवर काही वेगळं दिसू शकेल असं मी कितीही आशावादी असलो तरी वाटू शकत नाही.

आजच्या किंवा उद्याच्या मराठी रंगभूमीवर एक गोष्ट कायम स्वरूपाची दिसते ती म्हणजे माध्यमाच्या ताकदीला, प्राणाला विसरून केलेली वाटचाल. ही वाटचाल इतर प्रांतीय रंगभूमीच्या तुलनेनं जास्त चांगली असली तरी खऱ्या अर्थाने पुढे जाणारी निश्चितच नाही. कारण रंगभूमी माध्यमाच्या शक्यतांचा विचार नकारात्मक पद्धतीने करण्यात आला आणि त्या मर्यादा आहेत असं मानून हळूहळू एक एक दोर कापून टाकण्यात आला. उरता उरलं ते फक्त कथानकप्रधान प्रोसेनियम थिएटरमध्ये तांत्रिक अंगात जखडलेलं नाटक! ज्या क्षणी या मर्यादा जाणवतील आणि इतर माध्यमात वावरणाऱ्या लोकांशी वैचारिक आणि प्रत्यक्ष देवाणघेवाण ज्या वेळी सुरू होईल तेव्हाच नवनव्या शक्यता निर्माण करण्याचा प्रयत्न होईल.

मराठी रंगभूमीवर हा प्रयत्न शक्य तितक्या लवकर व्हावा ही मनोमन इच्छा. ◻

## श्रीराम लागू : 'लेखनाच्या मर्यादा–दिग्दर्शनाच्या मर्यादा'

नाटक या कलाप्रकाराचा आविष्कार करताना लेखनावर काय किंवा दिग्दर्शनावर काय, दोन प्रकारच्या मर्यादा पडतातसे दिसते.

पहिली मर्यादा त्या कलावंताची अंगभूत मर्यादा असते. ती त्याच्या प्रतिभेची मर्यादा असते. जितका प्रतिभावान लेखक अगर दिग्दर्शक तितकी मोठी त्याची कलाकृती होण्याचा संभव असतो. केवळ आपल्या प्रतिभेचीच कास धरून दुसऱ्या कुठल्याही बाह्य दडपणाचा अडथळा येऊ न देता लेखक/दिग्दर्शक आपली कलाकृती निर्माण करतोसे दिसत नाही. बाह्य दडपणांमुळे त्या विशिष्ट कलाकृतीच्या निर्मितीला दुसरी एक खूप मोठी मर्यादा पडते.

जागतिक नाटकांची तुलना टाळूनसुद्धा मराठी नाटकांचे जे चित्र दिसते ते असे की, अनेक नाटकांत अभिजात प्रतिभेचा साक्षात्कार होतो; पण कलाबाह्य दडपणांच्या ओझ्याखाली नाटक दडपून गेलेले दिसते. अगदी किर्लोस्कर, गडकरी, देवलांपासून तो खानोलकर, तेंडुलकर, आळेकरांपर्यंत ह्याच प्रकार कमी-अधिक प्रमाणात दिसतो. हा विचार मूलतः लेखनाला लागू असला तरी दिग्दर्शनाच्या बाबतीतही हेच म्हणता येण्यासारखे आहे. मात्र एक खरे की, हे ओझे लेखकाच्या डोक्यावर अधिक आहे. दिग्दर्शकाच्या डोक्यावर थोडे कमी आहे.

काही दडपणे लेखक/दिग्दर्शकांच्या मनातली आहेत काही परंपरांनी निर्माण केली आहेत. काही सामाजिक चालीरीतींतून निर्माण झालेली आहेत, काही शासकीय स्वरूपाची आहेत.

इ. स. १८४३ साली सांगली मुक्कामी मराठी नाटक जन्म घेते झाले. ते उत्सवप्रसंगी लोकांच्या करमणुकीकरता तयार केलेला एक प्रकार म्हणून. त्यामुळे करमणुकीचे साधन हे बिरुद मराठी नाटकाला फारच घट्ट चिकटून बसले. ते निघायला सुरुवात होण्याकरता शंभरहून अधिक वर्षे जावयाला लागली आणि अजूनही ते पुरते निघाले नाहीच. देवल, खाडिलकर, गडकरी इ. नाटककारांनी नाटकात काही गंभीर आशय मांडण्याचा प्रयत्न केला. तेव्हा या करमणूक कल्पनेने त्यांची केविलवाणी झालेली अवस्था दिसते. 'एकच प्याला' सारखे महान आशय सांगू पहाणारे नाटक, गडकऱ्यांच्या तथाकथित विनोदामुळे आणि गाण्यामुळे ठिकठिकाणी परिणामशून्य होते तीच गोष्ट शारदा, भाऊबंदकी इ. नाटकांची.

पाश्चात्य रंगभूमीचा जसजसा मराठी नाटकवाल्यांना परिचय होऊ लागला आणि मराठी प्राध्यापक, विद्वान मंडळी जसजशी मराठी नाटकात अधिकाधिक रस घेऊ लागली तसतसे लोकशिक्षण हे आणखी एक बिरुद मराठी नाटकाला चिकटले. सबंध भारतातच त्या वेळी राजकीय आणि सामाजिक क्रांतीचे वारे वाहू लागले होते. नाटकानेही विचारजागृतीचे कार्य केले पाहिजे अशी अपेक्षा करणे अगदी रास्त होते; परंतु सावरकर किंवा वीर वामनराव यांच्या-

सारख्या नाटककारांनी स्वतःच्या प्रतिभेशी अत्यंत प्रामाणिक राहून आपले ज्वालाग्राही विचार नाटकांतून मांडणे वेगळे आणि गडकऱ्यांसारख्या कविवृत्तीच्या माणसाने सामाजिक सुधारणांचा पाठपुरावा करायलाच हवा म्हणून रामलालच्या तोंडी विधवा-विवाहावरचे एक लांबलचक व्याख्यान घुसडणे वेगळे.

आज बऱ्याच नाटककारांनी ही दोन जोखडे झुगारली आहेत तरी सामाजिक बांधिलकी हे नवे जोखड ते स्वीकारतात की काय अशी भीती वाटू लागली आहे. एखाद्या कलावंताला राजकीय अगर सामाजिक प्रश्नाबाबत खरोखरीच पोटतिडकीने काही वाटत असेल त्याने जरूर 'जुलूस' अथवा 'उध्वस्त धर्मशाळा'सारखी नाटके लिहावीत; पण दलितांच्या अगर महारोग्यांच्या प्रश्नावर केवळ फॅशन म्हणून नाटके पाडू नयेत.

नाटक हे शेवटी प्रेक्षकांसमोर, प्रेक्षकांसाठी असते हे खरेच; पण या विधानाचा अर्थ प्रेक्षकांना आवडेल तेच लिहायचे असाच बव्हंशी घेतला गेला. प्रेक्षकांना अन्नदाते मायबाप म्हणणे हे पराकोटीच्या शालीनपणाचे लक्षण नसून लाचारीचे लक्षण आहे असा मला दाट संशय आहे. नाटकवाल्यांना प्रेक्षकांची जितकी गरज आहे, त्याहूनही अधिक गरज प्रेक्षकांना नाटकवाल्यांची आहे यात यत्किंचितही शंका नाही. आज बहुसंख्य नाटके गल्ल्यावर नजर ठेवून अगदी हिशेब मांडून लिहिली, बसवली जात आहेत, ही लेखनाला आणि दिग्दर्शनाला पडलेली फार मोठी मर्यादा आहे.

सामाजिक चालीरीतींतून निर्माण होणाऱ्या अनेक मर्यादा अनेक प्रकारच्या असू शकतात. नाटक पाच अंकी, तीन अंकी, दोन अंकी असावे याबद्दल निरनिराळ्या काळात निरनिराळे दंडक होते. बहुसंख्य नाटककार बहुसंख्य नाटकांच्या बाबतीत ते पाळताना दिसतात. याबाबतीतही लेखक केवळ आपल्या अंतःप्रेरणेला साक्षी ठेवून नाटक लिहितोसे दिसत नाही. दुसरे म्हणजे पांढरपेशा समाजाच्या सभ्यासभ्यतेच्या, श्लीलअश्लीलतेच्या कल्पना, भाषाविषयक संकेत यांचा पगडा लेखकाच्या मनावर खूपच दिसतो. अर्थात याही कल्पना काळाबरोबर बदलत जातात. त्याबद्दल काही धाडसी लेखकांचा प्रामाणिक प्रयत्न कारणीभूत होतो हेही खरे. सुमारे तीस वर्षांपूर्वी अंमलदार नाटकात हुणम्याचे पात्र 'च्यायला' हा शब्द ठासून म्हणे तेव्हा त्याचा निषेध अनेक संस्कृतिसंरक्षकांनी केला होता हे आज खरे वाटत नाही.

## परिश्रमांची टंचाई

रंगभूमीवर 'सूचकता' या प्रकाराचे असेच स्तोम माजविले जाते. याचा जाच लेखकापेक्षा दिग्दर्शकाला होतो. विशिष्ट प्रसंगाने रंगभूमीवर नेमका काय परिणाम साधायचा आहे यावर सूचकतेचा वापर करावा की, वास्तववादी तंत्राचा वापर करावा हे ठरविणे सयुक्तिक वाटते; परंतु प्रत्येक प्रसंगी सूचकतेचाच वापर केला पाहिजे असा हट्ट केला म्हणजे मग प्रत्येक प्रसंगात खुल्लंखुल्ला तंत्रच वापरले पाहिजे असा तितकाच दुराग्रह मांडला जातो. हे दोन्ही विचार निर्मितीला सारखेच हानिकारक आहेत.

शासकीय यंत्रणेने निर्माण केलेले एक मोठे कलाबाह्य दडपण म्हणजे 'सेन्सॉरशिप.' अमुक एका विषयावर नाटक लिहायचे कशाला असे उद्गार नामवंत, प्रतिभावंत मराठी नाटककारांनी अगदी मनापासून काढल्याचे आपल्याला माहीत आहे. क्वचित 'गिधाडे'सारखे एखादे नाटक सेन्सॉरशिपचा विचारही न करता लिहिले जाते, ती लेखकाच्या स्वतंत्र प्रतिभेची निकडीची गरज असते म्हणून; परंतु हे नाटक सेन्सॉरसंमत होणार नाही या भीतीने किमान दोन नामवंत नाट्यसंस्थांच्या विचारवंत संचालकांनी ते नाटक सेन्सॉरबोर्डाकडे पाठवायचेच नाकारले आणि ते नाटक जवळजवळ बारा वर्षे बासनात पडून राहिले ही वस्तुस्थिती आहे.

आणखी एक बाह्य दडपण म्हणजे सरकारी पारितोषिकांचा एकंदर व्यवहार हाताळला जातो त्यावरून ही पारितोषिके केवळ सदिच्छेतून निर्माण झाली आहेत की लेखकांना सरकारचे मिंधे करण्याकरता निर्माण झाली आहेत या प्रश्नाला जागा आहे. अनेक लेखक त्यासाठी आपली प्रतिमा राबवतात हे खरे आहे.

आर्थिक परिस्थितीचे बंधन लेखक-दिग्दर्शकाला टाळणेच शक्य नाही. उपलब्ध प्रेक्षागृहे, त्यातील रंगमंचाचा आवाका, प्रकाश-ध्वनी यांच्या संयोजनाकरता उपलब्ध असलेल्या सोयी आणि साधनसामुग्री या साऱ्यांचा दिग्दर्शकांच्या संकल्पनांवर फार मोठ्या मर्यादा घालीत असतो आणि लेखकाला या साऱ्या गोष्टींना तोंड द्यावे लागत नसले तरी कळत न कळत या परिस्थितीचा त्याच्या मनावर पगडा असतोच.

बहुतेक नाटके अशी असतात की, त्यांची आविष्कारपद्धती बरोबर घेऊनच ती जन्माला येतात. ती आविष्कारपद्धती दिग्दर्शकाला अचूक पकडता आली तर 'घाशिराम कोतवाल' किंवा 'गोची' सारखे श्रेष्ठ नाट्यप्रयोग जन्माला येतात; परंतु असे दिसते की, आशयाला अनुरूप आविष्कारपद्धती शोधण्याऐवजी आविष्कारपद्धतीचे निरनिराळे साचे बनत जातात. आजकाल भारतीय लोककलांना वेठीला धरून त्यांची एक वेगळीच आविष्कारपद्धती बनविली जात आहे. अशा प्रकारची दिग्दर्शनपद्धती आशयवादी नसून पूर्णतया आकारवादी (form) असते. परिणामी नाटकाच्या आशयाला अन्यायकारक ठरते. अर्थात आशयापेक्षा घाटाला महत्त्व देणारे सौंदर्यशास्त्री कलेच्या सर्वच क्षेत्रात आहेत.

प्रतिभा हे एक केवळ दैवी देणे आहे असे म्हणणारा एक वर्ग आहे. त्याचप्रमाणे प्रतिभा म्हणजे पाच टक्के Inspiration आणि उरलेले पंचावण्ण टक्के perspiration असे मानणारा दुसऱ्या टोकाचाही वर्ग आहे. टक्केवारीच्या भाषेतच बोलायचे तर उपजत प्रतिभा पन्नास टक्के आणि परिश्रम पन्नास टक्के अशी विभागणी असावीसे दिसते. खानोलकरांसारख्या विलक्षण प्रतिभेचा नाटककार परिश्रमांच्या अभावी एकही सलगपणे परिणामकारक नाटक देऊ शकला नाही आणि खरे, मतकरींसारखे सामान्य प्रतिभेचे नाटककार परिश्रमांच्या जोरावर अनेक परिणामकारक नाटके देऊ शकले हे आपण पाहिले आहे. नाटक हे माध्यम प्रतिभावंतांकडून परिश्रमाची मागणी करते. मराठी नाटकांमध्ये प्रतिभेच्या टंचाईबरोबर परिश्रमांची टंचाईही फार जाणवते.

कलावंत काही निर्वात पोकळीत निर्माण होत नाही. ज्या समाजात तो जन्मतो आणि वाढतो त्या समाजाचाच तो एक अविभाज्य

घटक असतो. अधिक सुसंस्कृत समाजात अधिक प्रतिभावंत कलावंत निर्माण होणार हे उघड दिसते. तेव्हा अविकसित, असंस्कृत समाजाला 'आमच्याकडे प्रतिभावान कलाकार निर्माण होत नाहीत' अशी तक्रार करण्याचा हक्क आहे का? का राज्यशास्त्राच्या नियमाप्रमाणे people get the theatre that they deserve' हा नियमही खरा आहे? आणि कलावंतांच्या प्रतिभेच्या मर्यादा ही जर त्याच्या समाजाच्या सांस्कृतिक विकासाची मर्यादा असेल तर कलावंताच्या (लेखकाच्या अगर दिग्दर्शकाच्या) प्रतिभेच्या मर्यादांचा शोध घेण्याआधी त्याच्या समाजाच्या सांस्कृतिक विकासाच्या मर्यादांचा शोध घेणे जास्त फलदायी ठरणार नाही काय?

¤

**अनंत भावे :**

## गेल्या पंचवीस वर्षांतील मराठी नाट्यप्रेक्षकांची अभिरुची

१९५७ सालच्या टप्प्यापाशी मराठी नाट्यरसिकांजवळ पूर्वसंचित काय होते? दहा वर्षांपूर्वी स्वातंत्र्यासाठीच्या प्रयत्नात महाराष्ट्राचे योगदान मोठे होते. तो अभिमान संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत इरेला पडला. त्यामुळे द्वैभाषिक राज्याचा घेडगुजरी प्रयोग फसून महाराष्ट्र राज्य निर्माण झाले. मराठी अस्मिता प्रखर होऊन समूहसंबंधी गोष्टींबद्दल तिला नवा उमाळा आला. नाटक ही त्यातली एक.

आधुनिक मराठी रंगभूमीला शंभराहून अधिक वर्षांची परंपरा होती. ही परंपरा आणखी मागे लोकनाट्यापर्यंत, संस्कृत नाटकापर्यंत नेता येत होती. या परंपरेत गद्य आणि संगीत अशा दोन पठड्या होत्या. या काळात टिळकवाद, आगरकरवाद, सावरकरवाद, गांधीवाद, आंबेडकरवाद, समाजसत्तावाद, व्यक्तिस्वातंत्र्यवाद, कलावाद, जीवनवाद यांनी समाजात वेळोवेळी क्षोभ निर्माण केले. त्यांचे पुसट प्रतिबिंब रंगभूमीवर दिसले याचेच नाटकवाल्यांना आणि नाट्यरसिकांना कौतुक असावे असे वाटते. कोणत्याही नाटकातून जास्तीत जास्त करमणूक देता-घेताना नाटक भोंगळपणे सर्वसंग्राहक होत गेले. स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनी करणे ही गोष्ट मराठी प्रेक्षकांना, समाजाला पटली, त्यांनी ती स्वीकारली ही या काळातली क्रांतिकारक घटना.

सत्तेचाळीस साली स्वातंत्र्य मिळाले. बहुजनसमाजाची निरंकुश सत्ता अनेक ठिकाणी नांदू लागली. सांस्कृतिक जीवनमानाचा निर्देशांक ठरवू लागली. दलितांनी आवाज उठवायला सुरुवात केली. एकेकाळची उच्चवर्णीय मंडळी शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर, अभियंता व्यवस्थापन—वृत्तपत्रप्रकाशन, लेखन, बँक, नाट्यसैद्धांतिक राजकारण इ. इस्त्रीदार धुवट पेशे सांभाळता सांभाळता आपण लोकशाहीची निगराणी करत आहोत असे मानू लागली. शिक्षण या स्वातंत्र्यपूर्वकाळातल्या एका महत्त्वाच्या विभाजक श्रेयाचे औपचारिक विकेंद्रीकरण झाले. जीवनाचे काही प्रमाणात साधारणीकरण झाले. सगळ्या क्षेत्रात लहान-मोठ्या पूरक-स्पर्धक संघटना उभ्या राहिल्या आणि सामाजिक पुंजीचा जास्तीत जास्त वाटा मिळविण्यासाठी आधाशीपणे धडपडू लागल्या.

स्वातंत्र्योत्तर आजपर्यंतच्या काळातल्या मला दिसलेल्या आपल्या महाराष्ट्राचे, मराठी समाजाचे हे नीलचित्र आहे. यातला अविभाज्य भाग म्हणजे मराठी रंगभूमी. अवयव-अवयवी असा त्यांचा संबंध आहे. म्हणजे मराठी समाजाचा जो स्वभाव तोच मराठी रंगभूमीचा स्वभाव आहे.

१९५७ च्या आगेमागे मराठी साहित्यातल्या कथा, कविता, ललितलेखन, कादंबरी या प्रयत्नात त्यांनी आशय-अभिव्यक्तीचे जुने साचे मोडून टाकले, ही नवी जाणीव समर्थपणे पोचविण्यासाठी नाटक हे अत्यंत प्रभावी माध्यम ठरले असते, याची कल्पना तेंडुलकरांसारख्या एखाद्याच नाटककाराला होती असे दिसते.

द्वैभाषिकाने आणि पुढे मराठी भाषिक महाराष्ट्राने नाटक-तमाशा (आणि कुस्ती) यांना परंपरापूत राज्यकला मानले. त्यामुळे नाट्यमहोत्सव, प्रशिक्षणशिबिरे भरविण्यात आली. करमणूक-कर माफ करण्यात आला. चैतन्यशाली वातावरण तयार झाले. अधिकाधिक रसिकांना नाटक पहायची इच्छा आणि सवय होऊ लागली. यात काही प्रामाणिक प्रयत्न होते, तर काहींनी घोरणी आखाखे-बांधून स्पर्धेसाठी, कुस्तीसाठी खुराकी मल्ल तयार करतात तशी नाटके तयार केली. यातले प्रमुख तालीमबाज पुरुषोत्तम दारव्हेकर. कथाकथन, कवितावाचन, संगीत-व्याख्यान, कीर्तन, समाचार-चित्र, चित्रपट, सांघिक खेळ, फॅशन-शो, जादूचे प्रयोग या सगळ्यांचा एकत्रित अनुभव नाटकाने द्यावा अशी या सोफाकमबेडपट वृत्तीच्या प्रेक्षकांची अपेक्षा होती, असे वाटते. रसिकांना नम्र अभिवादन करणाऱ्या नाट्यसंस्था ही अपेक्षा पुरी करायला पुढे सरसावल्या. पुरुषोत्तम दारव्हेकर, विद्याधर गोखले, सुरेश खरे, चिं. त्र्यं. खानोलकर, मधुसूदन कालेलकर, शं. ना. नवरे, पु. भा. भावे, वि. वा. शिरवाडकर, अनिल बर्वे, मधुकर तोरडमल, वसंत कानेटकर, रमेश पवार, श्री. ना. पेंडसे, बाळ कोल्हटकर, रणजित देसाई इ. नाटककारांनी काही नाटकांचे प्रयोग म्हणजे सुरस आणि चमत्कारिक कादंबऱ्यांचे रंगमंचावर करण्यात आलेले प्रात्यक्षीकरण होते अशी माझी समजूत झाली होती. यातूनच पूर्वीच्या रंगभूमीवर पिकलेल्या आख्यायिकांची जागा घेणाऱ्या खर्चाच्या, औचित्याच्या, धडाडीच्या, खाजगी जीवनाच्या आख्यायिका पैदा झाल्या.


बालरंगभूमी कशी असावी हे कळून तिच्यासाठी जाणीवपूर्वक पद्धतशीर शोध करणाऱ्यांचा शोध घेऊ लागलो तर एक रत्नाकर मतकरी तेवढे दिसतात; पण तेही दमले असावेत!

मराठी रंगभूमीबद्दल खरी, अस्सल आंतरिक ओढ, वर्तमान मराठी समाजाला वाटते आहे असे मानायला मी तयार नाही. मराठी माणूस नाटकवेडा आहे, असे काही तरी म्हणायला-ऐकायला बरे वाटते; पण वेडा होण्यासाठी एखाद्या गोष्टीचा कलंदर बेहिशेबी ध्यास घ्यावा लागतो तसा नाटक या गोष्टीचा ध्यास काही मराठी समाजाला नाही. गेल्या पंचवीस वर्षांत प्रायोगिक रंगभूमीची काही छोटी-मोठी बेटे वगळता हळूहळू पण निश्चितपणे नाटकवाले आणि प्रेक्षक यांचे नाते दुकानदार आणि गिऱ्हाईक असे रोखठोक होऊ लागले आहे.

मराठी नाटक हा कोणाचा धर्म असो नाही तर धंदा, ती राज्यकला असो नाही तर उपरी कला असो, काहीही असले तरी त्याचे व्यवस्थापन अत्यंत व्यापक पद्धतीने करायला हवे. त्यासाठी लागणारे शहाणे अर्थकारण नाटकाच्या मराठी माणसाला जमावे.

—विनया खडपेकर

(उरलेला वृत्तांत पुढील अंकी)



## आजचे कवी

द्रविडांची कविता अस्तित्व-वादाची परंपरा जोपासणारी आहे; पण असे असूनही अभि-व्यक्तीत ती सर्वस्वी त्यांची स्वतःची आहे.

¤

**लेखांक चौथा**

¤

**अविनाश सहस्रबुद्धे**

# जाणिवेचा मुक्त शोध घेत जाणारी

अनिल द्रविड हे एक तरुण कवी, त्यांच्या पहिल्या कवितासंग्रहाचे नाव आहे 'दिशांची पावले.' या संग्रहातील कविता वाचल्यावर सर्वप्रथम जाणवते ते हे की, द्रविडांची काव्य-शैली ही त्यांच्या समकालीन कवितेपेक्षा अगदी वेगळी आहे. त्यांच्या कवितेतील आशय हा मुख्यत: रूपक–प्रतीकांमधून व्यक्त होताना दिसतो. त्यांचे भावविश्वही अशा अनेक रूपक-प्रतीकांमधूनच घडताना दिसते. ही प्रतीके कुठल्या ना कुठल्या प्रवृत्तीची निदर्शक म्हणून त्यांच्या कवितेतून सतत येताता दिसतात. त्यामुळे आजच्या आधुनिक काळातील मानवी प्रवृत्तींचे दर्शनही आप-ल्याला या कवितांमधून घडते. द्रविड यांचे वैशिष्टय हे की, रूपक-प्रतिकांमधूनही त्यांच्या कवितेतला आशय आपल्या सूचकतेत आणि सूक्ष्मतेतही स्पष्ट असतो. प्रवृत्तीने पहाता अनिल द्रविडांची कविता दि. पु. चित्र्यां-पासून मराठी कवितेत सुरू झालेल्या अस्तित्व-वादाची परंपरा जोपासणारी आहे; पण असे असूनही अभिव्यक्तीत ती सर्वस्वी त्यांची स्वतःची, त्यांच्या अनुभूतीतूनच निर्माण झालेली अशी कविता आहे.

द्रविडांची प्रतिमासृष्टी ही वैयक्तिक संदर्भांच्या पायवाटेने उमलणारी असली तरी तिला एक प्रकारचे गूढ, काहीसे दुर्बोध असे वलय आहे; पण ही प्रतिमासृष्टी सर्वस्वी त्यांची, सगळयांना अपेक्षा भिरका-वून देऊन स्वतःचे आकारविश्व शोधणारी आहे. द्रविडांचे कविमन आपल्या अनुभवाच्या आकृती मांडू लागते आणि त्यातून मग विलक्षण प्रतिमाविश्व साकारते. द्रविडांच्या कवितेतून प्रकट होणारी स्त्रीची प्रतिमाही वेगळी व वैशिष्टयपूर्ण आहे. त्यांच्या काही कवितांमधून भेटणारी 'ती' ही 'पाऊस सुरू झाला की खिडकीशी येणारी' आहे. 'संध्याकाळ झाली की, पाखरांना गोष्टी सांगून घरी परतणारी' आहे. 'दूर जंगलात नाचणारे मोर' पाहू शकणारी आहे. 'रात्री स्वप्ने खूप पडणाऱ्या' या 'ती' ला 'तो' कदाचित येईल अशी सतत आशाही वाटत असते व म्हणूनच 'पाऊस आत आला तरी ती दारे उघडीच ठेवते.' स्त्रीची असंख्य रूपे आपल्याला या कवितांमधून दिसतात. ही स्त्री नव्या जीवनाची स्वप्ने पहाणारी, प्रियकराची प्रतीक्षा करणारी जशी आहे तशीच उध्वस्तपणाच्या अनुभवाला सामोरी जाणारीही आहे म्हणूनच 'पावसात ओंजळ पुढे करणाऱ्या' या स्त्रीला 'समईच्या विझत्या प्रकाशात रक्ताने माखलेले तिचे हात' ही दिसतात. या कवितांमधून द्रवि-डांनी स्त्रीच्या मनाचे, व्यक्तिमत्त्वाचे विल-क्षण दर्शन घडविले आहे. कधी ही स्त्री स्वतःच्याच रक्तातून, मांसातून जगू पहाणारी आहे तर कधी उध्वस्तपणाच्या अनुभवाने निराश झालेली, एकटी आहे. या स्त्रीच्या प्रतिक्रिया विलक्षण सूचक असूनही तिचे अवघे भावविश्व उलगडून दाखवणाऱ्या आहेत. मध्यरात्री जिच्या 'डोळयात पेट-लेल्या कृष्णकमळांच्या बागा' आणि 'स्तनांवर झोपलेली फुलपाखरं' दिसतात ती ही स्त्री भोवतालच्या विनाशात अखेरच्या क्षणापर्यंत स्वप्ने जतन करताना दिसते. 'माळ' या कवितेने स्त्रीची ही स्मृतींचा प्रवाह जपणारी वृत्तीच दिसते. आयुष्याच्या संध्याकाळी सगळी स्वप्ने पिवळया पानांसारखी झडून गेल्यानंतरही पक्ष्यांच्या कवटयांची माळ प्रियकरासाठी ओवून एकाकी, उजाड माळा-वर उभी राहिलेली ही स्त्री आहे. 'पाऊल-खुणा' या कवितेतही 'त्याच्या' पाऊलखुणा शोधणाऱ्या विमनस्क स्त्रीचे चित्र कवीने रेखाटले आहे. प्रेमभावनेतील स्त्रीमनाची उत्कटताच त्यातून व्यक्त होते. 'पाऊसपेंग' आणि 'मध्यरात्री मी' या कवितांमधूनही प्रेमानुभवातून येणारे नैराश्य, स्त्रीमनाची होणारी भ्रांत, असंबद्ध अवस्था शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न कवीने केला आहे. द्रवि-डांची स्त्रीविषयक जाणीव किती प्रगल्भ व वस्तुनिष्ठ आहे याची साक्ष आपल्याला 'चौकाचौकात लावलेलो' या एकाच कवि-तेत मिळते. घरी परतताना शहरातील चौकाचौकात लावलेली, भीतीचे वातावरण निर्माण करणारी भित्तिपत्रके दोघांनीही पाहिलेली असतात. मध्यरात्री शहरात गड-बड, पळापळ होते तेव्हा ती झोपलेलीच असते. सकाळी त्याच्याकडून रात्रीचा सगळा वृत्तांत ऐकल्यावर तिच्या ज्या प्रतिक्रिया होतात त्या अगदी मोजक्या शब्दात द्रवि-डांनी पुढील ओळींमधून व्यक्त केल्या आहेत.

सकाळी मी तुला हे बोललो.
पाखरू उडून गेलेल्या फांदीसारखी
तू दिसत होतीस.
कुंडीतली वाळून गेलेली
वेल उपटत तू म्हणालीस—
संध्याकाळी नवी पत्रके वाचायला
जायला हवे.


पहिल्या कडव्यात तिची अवस्था 'पाखरू उडून गेलेल्या फांदीसारखी' होते तर दुसऱ्या कडव्यात परिस्थितीला सामोरे जाण्याचा तिचा निर्धार दिसतो. सामान्यांच्या जीवनात भीतीची विविध रूपे वेगवेगळे आकार घेऊन

सतत अवतरत असतात. दैनंदिन जीवनाच्या चाकोरीतच ही भीतीची रूपे त्याला दिसतात. हाच अनुभव इतरही काही कवितांमधून व्यक्त झाला आहे.

संग्रहातील काही कवितांमधून द्रविडांनी आजच्या आधुनिक जीवनाच्या गुंतागुंतीत, ताणतणावाखाली जगणाऱ्या व्यक्तीच्या जीवनविषयक करकरीत प्रतिक्रिया मांडल्या आहेत. काही कवितांमधून व्यक्तीच्या जीवनातील विदारकत्वही दिसते 'राखेच्या वावटळी', 'ऊर फोडून आरशाचा स्फोट', 'वाळलेल्या रक्तासारख्या 'मागील दिवसांच्या आठवणी', 'काळे गुलाब' उसवलेले झाड 'चंद्रसूर्यताऱ्यांची कलेवरे', 'कोसळलेल्या उल्का', 'समुद्रपक्ष्यांचे चीत्कार', 'माथ्यावरची वांझ दिशा', 'कुजू लागलेली काळाची साल' अशा अनेक प्रतिमांमधून ही जीवनातले हे विदारकत्व, उध्वस्तपणाची, विनाशाची जाणीव व्यक्त होते. अशा या उध्वस्त झालेल्या जीवनातही कवीला भविष्याविषयी आशा आहे, विश्वास आहे. म्हणूनच तो स्वतः तर 'सूरांची वाट पहातो'च परंतु इतरांनाही भविष्याविषयी आश्वस्त करतो तो म्हणतो.

या वस्तीहून तुम्हीही कूच करणार आहात
म्हणून त्यांनी वेळूच्या बेटात
तुमच्यासाठी थोडासा ओलावा ठेवला आहे.
निश्चित रहा!

नव्या वास्तवाचे रोखठोक भान जसे या कवितेत आहे तशीच येणाऱ्या नव्या युगाची चाहूलही तिच्यात आहे. द्रविडांची सामाजिक जाणीवही मानवी जीवनातील अशा तऱ्हेतऱ्हेच्या ताणतणावातून निर्माण होते आणि त्यांच्या प्रतिमांचे आकृतिबंधही त्यातूनच घडत रहातात. संग्रहातील शेवटच्या दोन कवितांमधून अशा सामाजिक जाणिवेचा आविष्कारच झालेला दिसतो. विसाव्या शतकातील मानवी जीवनामधल्या विसंगतीने अगतिक झालेल्या, अस्वस्थ झालेल्या मनाचे प्रतिबिंब जसे या कवितांमध्ये उमटले आहे तशीच ही विसंगती, हा भेदाभेद, वर्गावर्गातली ही दरी, शोषणाची ही प्रक्रिया आज ना उद्या नष्ट होणार हा विचारही त्यातून घुमत रहातो. हे घडायचे असेल तर 'आपण एकदा या मातीशीच रुजवात घालायला हवी' हे सांगायलाही कवी विसरत नाही.



अनिल द्रविड

पुणे येथे ५-३-१९५५ रोजी जन्म. नंतर कायम वास्तव्य कोल्हापुरात इंग्रजी विषयात एम. ए. चा एक भाग पूर्ण. दीड वर्ष पत्रकारिता. सत्यकथा, अनुष्टुभ, हंस, प्रतिष्ठान, श्रीशब्द, महाराष्ट्र टाइम्स इ. नियतकालिकांतून कवितांना प्रसिद्धी 'कविता दशकाची' या ग्रंथालीने प्रसिद्ध केलेल्या संकलनातील एक कवी. 'दिशांची पावले' कवितासंग्रह १९८१ त वाल्मीक प्रकाशनतर्फे प्रकाशित.

पत्ता : ४१३/१ डी. द्रविडवाडा, गंगावेस, कोल्हापूर– ४१६ ००२.

व्यक्तीच्या दुःखाचे मूळ जसे समाजात आहे, नियतीत आहे तसे ते स्वतःत, व्यक्तीतही आहे या वस्तुस्थितीचा निर्देशच कवीने इथे केला आहे

काही कवितांमधून द्रविडांनी जीवनाच्या प्रवाहात अपरिहार्यपणे सतत विरुद्ध दिशेने वाहात जाणाऱ्या सर्वसामान्य माणसाच्या प्रतिक्रिया तसेच व्यक्तीचे दुभंगलेपण यांना व्यक्त केले आहे या कवितांमध्ये कधी भेदक वास्तवतेचा बोचरेपणा जाणवतो तर कधी

कितीक नावे खोदित गेलो
तरी हरवली नाती
प्राक्तनातुनी माझ्या गळते
अंधाराची माती

यासारखी हताश जाणीवही दिसते. अशा कवितांमधून व्यक्तीच्या अवतीभवतीचे अनेकविध संदर्भ ताजे होऊन समोर येतात व त्यातूनच अस्वस्थतेची अनेक आवर्तने प्रगट होऊ लागतात. अटळपणाने आत फुटतउसकटत रहाणारे कविमनच त्यातून दिसते. पृष्ठ १६, २२, २५, २८, ३२, ३९ वरील कवितांमधून कवीच्या मनःस्थितीची–अनुभूतीची अशी आवर्तने उठलेलीच दिसतात.

### १. मध्यरात्री मी पाहिल्या होत्या

मध्यरात्री मी पाहिल्या होत्या
तिच्या डोळ्यांत पेरलेल्या
कृष्णकमळांच्या बागा
आणि स्तनांवर झोपलेली
फुलपाखरे.
पहाटेच्या पहिल्या प्रकाशात
सूरांच्या ओळी हळूहळू
दिसू लागल्या
तेव्हा सारे दिवे मालवून
ती निघाली
झाडांच्या ओळीत ती शिरली
तेव्हा माझ्या पायापर्यंत पडलेली
तिची लांब सावली
सरकत सरकत झाडांतून
दिसेनाशी झाली.
मग मी वळलो आणि चालू लागलो
हे अख्खे क्षितिज संपेपर्यंत
नुकत्याच जन्मलेल्या
फुलपाखरांचे थवे
माझ्या मागावर होते.

२.

समुद्रात भरकटलेल्या गलबताच्या
डोलकाठीवरून उडालेला पक्षी
आला
माझ्या बुबुळांच्या आतल्या दऱ्याखोऱ्यात
तिथेच त्याने घरटे बांधले
कधीकधी पापणीच्या केसांवर बसून
तो समुद्राला साद घालतो
आणि कोसळलेल्या उल्का
गोळा करायला निघून जातो.

□

शब्दांच्या पलिकडील प्रदेशात
तुम्ही पुरलेली दिशांची सावली
मी पाहून आलो आहे.
परतताना साऱ्या खुणा
उसवून टाकल्यात तरी
या वाटांशीच मी शिवला गेलो आहे
हे तुम्ही विसरलात.
अपरात्री आकाशातून शहामृगांची
प्रेतयात्रा जाताना दिसते आणि
पहाटे पडणारे दव
थोडेसे लालसर असते
हे तुम्हीच मला सांगितले होते. (पृ. ६०)

या ओळींमध्ये अनुभूती व दृश्याचा भास यांचा संयोग झाला आहे. 'मध्यरात्री मी' या कवितेत मीलनाच्या तृप्त अनुभवानंतर पहाटे सुरूंच्या झाडात तिची सावली नाहीशी होई-पर्यंत कवी रेंगाळत रहातो आणि मग निघतो तेव्हा अख्खे क्षितिज संपेपर्यंत फुल-पाखरांचे थवे त्याच्या मार्गावर नाचत, रेंगाळत रहातात. मीलनानंतरच्या अशा सुखद क्षणांचा अनुभव द्रविडांच्या कवितेत क्वचितच दिसत असला तरी प्रेमानुभवातील हळुवार भावनांच्या छटा या संग्रहातील गझलांमध्ये दिसतात. भावकवितेच्या कक्षा वाढवण्याचा प्रयत्न म्हणून या गझलांचा उल्लेख केला पाहिजे.

चिंतनशील जाणीव व्यक्त करण्यासाठी प्रतीकांचे संघटन असलेली रचना काही वेळा द्रविड करतात द्रविडांच्या कवितेत आश-याचे शब्दांकन घडत असताना पुढच्या ओळीत किंवा कडव्यात कुठले प्रतिमान येईल याचा अंदाज वाचकांना येत नाही. सर्वस्वी अनपेक्षित, विक्षिप्त प्रतिमान अनु-भूतीच्या तीव्रतेच्या कडयावर उभे असलेले दिसते. अशा विक्षिप्त प्रतिमासृष्टीने वाच-काला धक्का बसल्यावाचून रहात नाही. उदाहरण म्हणून पुढील ओळी पहा—

चंद्र आणखी थोडा वर आला
तेव्हा टिटव्यांचा थवा ओरडत
थेट माझ्यापर्यंत आला.
आमचे उसासे कोरलेली
फुले घेऊन तो निघून गेला.




जाताना एका टिटवीने
मला सांगितले :
मोरपिसे छातीत खुपसून
नुकतीच तिने आत्महत्या केली.

दुसऱ्या कडव्यातला हा धक्काही नंतर अंतर्मुख बनवितो आणि विक्षिप्तपणातली एक कुठली तरी आंतरिक सुसंगतीही अंती लक्षात आणून देतो. द्रविडांची अशी काही प्रतिमाने जी. ए. कुलकर्ण्यांच्या कथांतील प्रतिमासृष्टीप्रमाणे मानवी जीवनातील विलक्षण वास्तवतेच्या, सत्याच्या शोधासाठी प्रवास करताना दिसतात.

'दिशांचा गळू लागलेला मोहर' या कवितेत काव्यनिर्मितीसंबंधी एक अतिशय संपन्न अनुभव व्यक्त करणारे रूपक आहे.

द्रविडांच्या कवितेत निसर्गसौंदर्याची स्वयंपूर्ण अशी चित्रे दिसत नाहीत. निस-र्गाची चित्रे येतात ती रूपक–प्रतिमांमधूनच. आणि त्यांचा 'उपयोग' अंतर्विश्वातील आंदोलने तसेच वैचारिक जाणीव स्पष्ट करण्यासाठीच असतो.

आपण एकटे कधीच नसतो
हे पहिल्यांदा मला झाडांनी शिकविले
त्यांचे हे ऋण मी मानत आलो

या ओळींतून ते निसर्ग–मानवातील एक-रूपता स्पष्ट करतात. 'वारा ओवून त्याच्या माळा गळयात घालण्याची स्वप्ने माणसे कायमपणे पहातात' यातही हा संबंधच अधिक दाट झालेला दिसतो.

आशयाच्या किंवा रचनेच्या बाबतीत कुठलाही साचा समोर न ठेवता जाणिवेचा मुक्त शोध घेत जाणारी द्रविडांची कविता आहे. त्यातून व्यक्त होणारा आशय नव्या वास्तवाचे, आधुनिकतेचे भान असणारा आहे. एकूणच या कवितेत सूचकता व आशयाची तीक्ष्णता आहे. रूपक–प्रतिकांच्या मांडणीच्या बाबतीत तर ती पूर्णपणे निराळ-पणाचा प्रत्यय आणून देणारी आहे. किती तरी वेगवेगळया प्रतिक्रियांची वादळे या प्रतिमासृष्टीतून उठत असतात. कवितासंग्रह वाचून झाल्यावरही मनातल्या विचारांची व प्रतिक्रियांची वादळे संपत नाहीत. ती चालूच रहातात. □

# रिचर्ड राइट – कम्युनिझमबद्दल भ्रमनिरास झालेला निग्रो लेखक

रिचर्ड राइट हे अत्यंत गरीब परिस्थितीत वाढले. त्यांच्या आयुष्यात त्यांना ज्या अनंत हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या त्या सर्व त्यांच्या लेखनामध्ये प्रतिबिंबित झालेल्या आहेत. कम्युनिझमबद्दल भ्रमनिरास झालेला हा अमेरिकन निग्रो लेखक विसाव्या शतकातील श्रेष्ठ निग्रो लेखकात अग्रगण्य मानला जातो.

पुस्तके : अंकल टॉम्स चिल्ड्रेन (लघुकथा) हाऊ बिगर वॉज बॉर्न, नेटिव्ह सन, ब्लॅक बॉय इत्यादि.

□

रघुपती भट्ट

रिचर्ड राइट एका अत्यंत गरीब निग्रो कुटुंबात जन्मले. त्यांच्या लहानपणी त्यांच्या पित्याने त्यांच्या आईला वाऱ्यावर सोडून दिले. त्यांची आई म्हणजे एक धोबीण होती. तिने आपल्याला शक्य होईल तेथपर्यंत त्यांना कष्टाने वाढवले. पुन्हा ती अर्धांगवायूने विकलांग झाली. त्यानंतर त्यांच्या आजीने त्यांचा सांभाळ केला व दोनएक इयत्ता शाळाही त्यांना शिकविली. पंधराव्या वर्षी त्यांनी घर सोडले आणि जगाच्या शाळेत प्रवेश घेतला. त्यांना लेखक व्हायचे होते. अगदी चिल्लर कामे करीत त्यांनी तुटपुंजी कमाई गोळा केली आणि ते शिकॅगोला आले.

एक दिवस 'जॉन रीड' क्लबबद्दल समजले. या क्लबमध्ये अनेक क्रांतिकारक लेखक आणि कलावंत जमत असत आणि ते सगळे कम्युनिस्ट होते. त्यांच्या एका मित्राने त्यांना त्या क्लबमध्ये नेले. तेथे त्यांना बरीच पुढे नामवंत झालेली मंडळी भेटली. 'लेफ्ट फ्रंट' नावाचे मासिक ती काढत होती.

त्यांनी रिचर्डना त्या मासिकासाठी काही तरी लिहायची विनंती केली. रिचर्डना फक्त एकच विचार अस्वस्थ करीत होता, ही सगळी मंडळी गोरी होती. ते एक निग्रो होते. त्यांच्याबद्दल त्या मंडळींना मनातून काय वाटत असेल ? पण एक मात्र खरे होते त्यांनी रिचर्डचे तेथे स्वागत केले होते. त्यांना आदराची वागणूक दिली होती

क्लबमधील सर्वच लोक कम्युनिस्ट होते असं नाही; पण त्यामधील कम्युनिस्ट अगोदर बाहेर एखादी बैठक घेऊन क्लबचे धोरण आखत असत आणि मग क्लबमध्ये त्यांच्या वाद घालण्याच्या पद्धतीने इतर लोकांना आपल्या बाजूने मत द्यायला भाग पाडत असत. त्यामुळे कम्युनिस्ट पक्षाच्या मताप्रमाणे या शिकॅगो जॉन रीड क्लबचे कामकाज चालत असे.

'लेफ्ट फ्रंट' या मासिकामध्ये आपले लेख छापून यावे या इच्छेने रिचर्डसारख्या अनेक लेखकांनी या क्लबमध्ये प्रवेश घेतला होता; पण पक्षाच्या आर्थिक मागणीमुळे ते धोक्यात आले व ते बंद करावे असा पक्षाचा आदेश आला; पण क्लबमधील लेखकांनी ते नाकारले.

रिचर्डना या क्लबचे सेक्रेटरी करण्यात आले आणि त्यानंतर कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य करून घेण्यात आले. निग्रोंच्या समान हक्कासाठी कम्युनिस्ट पक्ष नेहमी झटत राहील अशी आशा त्यांना वाटत होती. रस्त्यावरचे निग्रो जेव्हा आपल्या मागण्यांसाठी लढतील तेव्हा हाच पक्ष आपल्याला साथ देईल असं त्यांना वाटत होतं.

कम्युनिस्ट चर्चा आणि वाद यातून एक नवी दृष्टी जरी रिचर्डना मिळाली तरी कोणी पक्षाच्या नेत्यानं 'असं लिहा, तसं लिहा' वगैरे म्हटलेलं त्यांना चालत नसे. आपल्या पद्धतीने रिचर्ड लिहीत असत.

एकदा एक ज्यू तरुण त्यांच्या क्लबमध्ये आला. आपण डेट्राइटहून आलो असल्याचे त्याने सांगितले. त्याच्या म्हणण्यानुसार त्याचे नाव यंग होते आणि तो कम्युनिस्ट पक्षाचा सदस्य होता. पक्षसदस्य कसा नाकारायचा म्हणून त्याचे स्वागत करण्यात आले; पण त्याचे एकंदरीत वागणे गूढ होते. साध्या प्रश्नांना उत्तर देतानासुद्धा तो चाचरत असे.

कॉम्रेड यंगने रिचर्डजवळ क्लबच्या आवारात झोपायची परवानगी मागितली. रिचर्डनी ती दिली. लवकरच तो पक्षाचा झटणारा कार्यकर्ता बनला त्यामुळे कम्युनिस्ट पक्षाकडून त्याच्याबद्दल काही कळवण्यात आलेले नसले तरीसुद्धा त्याचा कोणी संशयही घेतला नाही तो चित्रं फार सुरेख काढी

एके दिवशी त्याने पक्षसदस्याच्या बैठकीत बोलायची परवानगी मागितली. तो बोलायला उठला आणि त्याने क्लबमधील एका तरुण कलावंतावरच हल्ला चढवला. उत्कृष्ट कलाकार असलेला तो तरुण कलावंत 'संधीसाधु' 'पोलिसांचा खबऱ्या' 'ट्रॉटस्की गटाचा' असल्याचा आरोप त्याने केला. सगळ्यांना वाटले 'यंग' पक्षसदस्य असल्याने तो पक्षाचीच मते मांडतो आहे. ज्याच्यावर आरोप झाले तो तरुण सगळ्यांचा आवडता होता. रिचर्डनी सांगितले की, हे आरोप पक्षाच्या कार्यकारिणीपुढे ठेवले जातील. पक्षसदस्य असलेली क्लबची कार्यकारिणी त्याचा काय तो विचार करेल; पण क्लबच्या सभासदांनी त्याला विरोध केला. सभासदांनी रिचर्डना विचारले की, यंगशी त्यांचेही सहमत आहे का ? रिचर्डना वाईट वाटले.

रिचर्डनी यंगला गाठले. त्याला हे कोणी सांगितले हे त्यांना विचारायचे होते. यंगने सरळ उत्तर दिले नाही. तो म्हणाला, 'मला पक्षात स्वच्छता करायची आहे.' यंग त्या वेळी एखाद्या महान क्रांतिकारकासारखा लालबुंद दिसत होता.

पण यंगने क्लबमधील त्या तरुणांवर

आरोप केल्यामुळे क्लबचे सदस्य रागावले होते. रिचर्डनी पक्षाला विचारणा केली. पक्षाचे उत्तर आले 'आम्ही काही त्या तरुणाविरुद्ध कारवाई करण्यास सांगितलेले नाही.' मग हा 'यंग' कोण? गूढ वाढले. शेवटी पक्षनेत्यापुढे त्या प्रकरणाची चौकशी ठरली.

दहाएक जणांची बैठक जमली. पक्षनेत्याने यंगला त्याचे आरोप वाचायला सांगितले. त्यानं त्याच्या दहा प्रती काढून ठेवल्या होत्या. पक्षसदस्यांनी त्याचे ऐकले. या खेपेला यंगचे भाषण पूर्वीपेक्षा जहाल झाले. त्या तरुण सदस्यावर यंगच्या त्या आरोपांचा विपरीत परिणाम झाला होता. तो म्हणाला, 'मी राजीनामा देऊन टाकीन!'

पण रिचर्डना त्या यंगचे वागणे थोडेसे गूढ वाटत होते. त्या मीटिंगनंतर एकदा रिचर्ड त्याच्या खोलीत त्याच्याशी बोलण्यासाठी म्हणून गेले तर त्यांना समजले की, यंग रहस्यमयरीत्या बेपत्ता झाला होता! त्यांनी त्याच्या खोलीची तपासणी केली तर तिथे त्यांना कागदाचा एक मोठा रीळ सापडला. त्यामध्ये यंगने चित्रे काढून ठेवली होती आणि वर लिहिले होते—'मार्क्सवादी दृष्टिकोनातून मानवजातीचा इतिहास!'

त्याच्या डायरीवर जो पत्ता होता त्यावरून त्यांनी पत्रव्यवहार केला तेव्हा त्यांना समजले की, यंग चक्क 'वेडा' होता. वेड्याच्या हॉस्पिटलमधून पळून येऊन तो त्यांच्या क्लबमध्ये आला होता आणि पुन्हा आपल्या वॉर्डमध्ये दाखल झाला होता!

येथे रिचर्डना पहिला धक्का बसला. एक वेडा मनुष्य राजरोसपणे क्लबमध्ये राहतो, क्लबमधील सभासदावर चक्क आरोपांची मालिका लावतो. पक्षाचे मान्यवर नेतेसुद्धा याकडे लक्ष देतात; पण त्यांना त्याच्या वेडेपणाबद्दल काहीही माहीत असत नाही!

¤

एकदा रिचर्डची आणि रॉस नावाच्या निग्रो कम्युनिस्टाची ओळख झाली. रॉस हा टिपिकल निग्रो नेता आहे. रिचर्डनी त्याच्या जीवनावर नोटस् घ्यायचे ठरवले. त्यासाठी रिचर्ड त्याच्या घरी जाऊ लागले. त्याच्या संभाषणातून त्यांना तो कम्युनिस्ट कसा बनला हे काढून घ्यायचे होते. यामधूनच दक्षिणेकडून आलेल्या निग्रोंच्या विदारक परिस्थितीवर प्रकाश पडेल असं त्यांना वाटत होते.

पण त्या लोकॅलिटीमधील निग्रो रिचर्डचा द्वेष करीत असत. त्यांना रिचर्ड म्हणजे बुद्धिजीवी वाटत. खरं म्हणजे रिचर्ड दोन वेळच्या जेवणासाठी रस्ता लोटण्याचे काम करीत असत; पण निग्रो कम्युनिस्टांच्या मते ते लेखक होते आणि लेखकमंडळींचा कम्युनिस्ट द्वेष करतात किंवा ते श्रमजीवी असल्याने त्यांनी तो केला पाहिजे या मताने हे निग्रो कम्युनिस्ट रिचर्डचा द्वेष करीत असतात. त्यांच्यात ही बातमी पसरली.

पैकी निग्रो कम्युनिस्ट रिचर्डकडे आला आणि गंभीर स्वरात 'बुद्धिजीवींना आमच्या पक्षात स्थान नाही!' असं म्हणाला. आपण रिचर्डवर का रागावलो आहोत हे त्याला माहीत नव्हते. रिचर्डनी त्याचे काही ऐकून घेतले नाही आणि आपण श्रमजीवी आहोत हे ठासून सांगितले. बऱ्याच वेळानंतर तो महाभाग गेला; पण जाताना, 'ट्रॉटस्कीचं काय झालं ते विसरू नका!' असं एक वाक्यही टाकून गेला.

एकदा रॉसच्या घरी ते नोटस् घेत बसलेले असताना आणखी एक निग्रो कम्युनिस्ट तेथे आला. त्याने रिचर्डना अविश्वासाच्या सुरात अनेक प्रश्न विचारले. रॉससुद्धा त्या प्रश्नांच्या फेरीने भांबावून गेला; पण त्यातून एक स्पष्ट झाले. रिचर्डवर निग्रो कम्युनिस्टांचा विश्वास नव्हता. रॉस घाबरून गेला होता. रिचर्डनी त्याची समजूत करण्याची शिकस्त केली; पण त्याचा उपयोग झाला नाही.

तेथून पुढे रॉसला किंवा त्याच्या मित्रांना रिचर्डनी प्रश्न विचारले नाहीत. फक्त ते काय म्हणताहेत तेवढे ऐकून त्याच्यावर नोटस् काढल्या आणि 'बिग बॉय लीव्हज होम.' नावाची एक कथा त्यावर लिहिली. ज्या ज्या कम्युनिस्ट नेत्यांना त्यांच्या हेतूविषयी शंका आली होती त्या कोणीही ती त्या वेळी वाचली नाही. त्यामुळे संशयाचे वातावरण कायम राहिले.

## पक्षाला रुचो अगर न रुचो

त्यानंतर रिचर्डचे काम सुटले. काही दिवस इकडे तिकडे मागामाग केल्यावर यांना पुन्हा एक फुटकळ नोकरी देण्यात आली.

या वेळी त्यांनी ऐकले की, त्यांनी ज्याच्या जीवनावर नोटस् काढल्या होत्या त्या रॉसवर कम्युनिस्ट पक्षाने काही आरोप लावले होते आणि लवकरच त्यांच्यावरसुद्धा असेच आरोप केले जातील. कारण ते बराच काळ रॉसच्या सहवासात होते.

एक दिवस बरेच निग्रो कम्युनिस्ट रिचर्डकडे आले. रॉसपासून दूर राहायला सांगायला ते आले होते. 'कारण तो वाईट आहे' ते म्हणाले, "तुम्ही पक्षाचा निर्णय मानत नाही का?'

'माझं काही चुकलं तर मी ऐकलं असतं.' रिचर्ड त्यांना म्हणाले, 'पण माझं काही चुकलेलं नाही.'

'तुमच्या प्रवृत्तीमुळं आम्हाला तुमचा अविश्वास वाटतो.' ते निग्रो कॉम्रेडस् म्हणाले.

रिचर्ड संतापले. आपल्यावर हे लोक का अविश्वास दाखवत आहेत हे त्यांना कळेना. आपल्या पत्र्याच्या मोडक्या-तोडक्या घराकडे आणि जीर्ण वस्तूंकडे बोट दाखवत ते ओरडले, 'यात काय आहे मित्रांनो? मी काय करतो, किती मिळवतो, माझे कोण मित्र आहेत हे आपल्याला माहीत आहे. यात काय चुकीचं आहे ते सांगा!'

स्मितहास्य करीत ते निघून गेले. रिचर्डची चूक त्यांना लवकरच कळेल असं त्यांना सुचवायच होतं.

पण रिचर्डचं मन लवकरच दुसरीकडे वळलं. ज्या क्लबमध्ये ते काम करत तेथे बरीच निग्रो मुले यायची. या मुलांना घरदार नव्हतं, संस्कृती नव्हती, कोणाची भीती नव्हती आणि कसलाही धरबंद नव्हता. या मुलांशी गप्पा मारत रिचर्डना निग्रो-जीवनाची अधिक माहिती मिळू लागली. उद्याच्या तुरुंगाच्या, फासाच्या दोराच्या अपेक्षा पूर्ण करणारी ही मुले होती.

निग्रोंना समान हक्क दिले पाहिजेत, त्यांच्यात शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे, असं तोंडी सांगणाऱ्या पण निग्रोंच्या जीवनाचा प्रत्यक्ष अभ्यास करून जगापुढे नोंदी ठेवू इच्छिणाऱ्या रिचर्डसारख्या लेखकांचा द्वेष करणाऱ्या कम्युनिस्ट नेत्यांना ही मुले आणि त्यांच्या जीवनाची शोकांतिका माहीत नव्हत्या.

रिचर्ड राइट या मुलांच्या जीवनाचा अभ्यास करीत राहिले.

त्यानंतर रिचर्डचा आणि पक्षकार्यकर्त्यांचा एकदा वाद झाला. 'लेखकांनी पक्षासाठी लेखन करावे की राजकीय कार्य करावे?' असा त्यांचा प्रश्न होता. पक्षाचे मत होते की दोन्ही केले पाहिजे; पण रिचर्डच्या मते लेखकांनी फक्त लेखनच केले पाहिजे. हा मुद्दा रिचर्डनी डाव्या विचारसरणीच्या लेखकांच्या सभेत मांडला. या सभेतच पक्षाने 'लेफ्ट फ्रंट' नावाचे मासिक, जे रिचर्ड स्वत: रस घेऊन चालवत होते ते बंद करायचे ठरवले.

रिचर्डना वाटले की, 'जॉन रीड क्लब' जो लेखक आणि कलावंत यांचा होता, तो आता पुढे चालवण्यात अर्थ नाही. त्यांच्या या प्रतिपादनामुळे पक्षाचे नेते नाराज झाले. लेखकांच्या त्या सभेत जे अनेक ठराव पक्षाने संमत करून घेतले त्यामध्ये लेखक, लेखन आणि तत्संबंधी काहीही नव्हते ही एक आश्चर्यकारक गोष्ट घडली.

पण निग्रो कम्युनिस्टांत मात्र रिचर्डबद्दलचा संशय दृढ झाला. त्यांच्यामध्ये रिचर्डच्या रूपाने एक शत्रू वावरतो आहे, जो पक्षाच्या नेत्यांना विरोध करतो आहे, त्यांच्या आज्ञा मोडतो आहे रिचर्ड पक्षाच्या विरुद्ध एक गुप्त गट स्थापन करीत आहेत अशीही एक अफवा पसरली. रिचर्डना काही कळेना. कम्युनिस्टांपुढे काही नाकारून चालत नाही हे त्यांना माहीत नव्हते का? एखादा कम्युनिस्ट रस्त्यात भेटला तरी त्याचे मत काय असावे याचा अंदाज घेऊनच ते बोलत.

त्यानंतर आणखी एक सभा झाली. यात जे लेखक आले होते ते सगळेच बावरलेल्या मनस्थितीत होते. पक्षाने त्यांना का बोलवले आहे, हेच त्यांना कळत नव्हते आणि त्या कॉंग्रेसमध्येही काही निर्णय त्यांच्यावर घेण्यात आला नाही.

नंतर मात्र एक घोषणा झाली.

देशातील जॉन रीड क्लब बंद करण्यात येणार होते. का? नव्या धोरणाशी ते विसंगत आहेत. त्याऐवजी डाव्या लेखकांची एक नवी संघटना बांधण्यात येईल. मग नव्या लेखकांचे कसे? त्यांना पक्षाच्या संघटनेत प्रवेश घेता येणार नव्हता.

या गोष्टीला विरोध करण्याचा रिचर्डनी खूप प्रयत्न केला; पण त्यांना पाठिंबा नव्हता. त्यांच्याशी सहमत असणारेसुद्धा पक्षापुढे त्यांना पाठिंबा द्यायला तयार नव्हते. त्यांना पक्षाची भीती वाटत होती.

रिचर्ड दक्षिण अमेरिकेत जन्माला आले होते. तेथील निग्रो समाज ज्या सतत भीतीत जगत होता त्यापासून सुटका करून घेण्यासाठी ते उत्तरेला आले होते. कम्युनिस्ट पक्ष आपल्याला यातून मुक्त करेल अशी आशा त्यांना वाटत होती. त्यासाठी तर त्यांनी पक्षाची कास धरली होती.

पण आता त्यांना पक्षातच भीतीशी सामना करावा लागत होता; पण त्यांनी ठरवले जे आपल्याला वाटते ते लिहायचेच. मग ते पक्षाला रुचो अगर न रुचो.

□

न्यूयॉर्कला भरलेल्या लेखकांच्या आणखी एका कॉंग्रेससाठी पक्षाने रिचर्डनाच पाठवले. रिचर्ड तेथे गेले आणि त्यांना आढळले की, त्यांच्या राहण्याची गैरसोय होणार आहे. कार्नेजी हॉलमध्ये अधिवेशन होते. इतर लेखकांची सोय झाली होती; पण रिचर्डसारख्या गरीब, फाटक्या निग्रोची सोय कोठे होणार? सगळे डावे लेखक संकोचून गेले होते. रिचर्डना जाणवले की, कम्युनिस्ट असलो तरी आपण प्रथम निग्रो आहोत हेच खरे!

एकाने बराच प्रयत्न केला; पण त्याला यश मिळाले नाही. रिचर्ड शरमिंदेही झाले आणि अवघडून संतप्तही झाले. शेवटी रिचर्डनी फक्त बॅग ठेवण्यास जागा मागितली आणि जागा शोधण्यासाठी ते स्वत: बाहेर पडले. अधिवेशनाच्या विषयापेक्षा आपल्याला अंघोळ कशी मिळू शकेल!

शेवटी एका दयाळू गोऱ्या बाईच्या घरात रिचर्डची राहण्याची सोय झाली. अंघोळ वगैरे झाल्यावर ते बाहेर पडले; पण अधिवेशनाच्या विषयापेक्षा त्यांच्या मनात एकच विचार घोळत होता. या देशात निग्रोंना माणसाची वागणूक केव्हापासून मिळायला लागणार?

त्या दिवशी अधिवेशनात त्यांचे मन लागले नाही. हार्लेमकडे ते त्या रात्री गेले. (पुन्हा त्या गोऱ्या बाईला त्रास देणे त्यांना बरे वाटत नव्हते.) त्यांना फूटपाथवर असंख्य निग्रो आढळले; पण सगळ्यांनी त्यांना सांगितले की, तेथे निग्रोंसाठी हॉटेल नव्हते. (विशेष म्हणजे ती निग्रोंची वस्ती होती.) शेवटी त्यांना निग्रोंच्या एका क्लबमध्ये राहाण्यास जागा मिळाली.

अधिवेशनाच्या शेवटच्या सभेला ते उपस्थित राहिले. त्या सभेत एका कम्युनिस्ट लेखकाने अमेरिकेतील जॉन रीड क्लबची माहिती देऊन ती संपवण्याचा ठराव आणला. त्यानंतर वाद सुरू झाले.

रिचर्ड उठले आणि म्हणाले, 'हे क्लब संपवण्याला माझा विरोध आहे.' आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ त्यांनी जॉन रीड क्लब हे नव्या लेखकांना, कलावंतांना आतापर्यंत किती सहाय्यभूत झालेले आहेत याचे दाखले दिले आणि या नवोदितांना मदत करण्यासाठी जॉन रीड क्लब्स् हे चालूच ठेवले पाहिजेत असं त्यांनी प्रतिपादित केलं. आपण हे सांगताना कम्युनिस्ट पक्षाच्या धोरणाला विरोध करतो आहोत हे त्यांना माहीत होतं; पण ते स्वस्थ बसले नाहीत. जॉन रीड क्लबनं स्वत:ला जे सहाय्य केलं ते त्यांना विसरता येत नव्हतं. त्यांचं अनुभवविश्व समृद्ध करण्यात त्याचा मोठा भाग होता.

त्यानंतर मतदान घेण्यात आलं. हे क्लब्स विलीन करून टाकावेत या मागणीला पाठिंबा देणारे असंख्य हात वर आले. याला कोणाचा विरोध आहे का? असं विचारल्यावर फक्त रिचर्डचा हात वर आला!

रिचर्डना त्या क्षणीच कळलं की, आता इथूनपुढे आपल्याला पक्षातच शत्रू म्हणून ओळखलं जाईल; पण त्यांना त्याची पर्वा नव्हती.

## संबंध संपवायचे होते

जॉन रीड क्लबच्या समाप्तीबरोबरच रिचर्ड राइट यांचे पक्षाबरोबर संबंध संपले. पार्टीच्या बैठकांना जायचे त्यांनी कटाक्षाने टाळले. कारण शिस्तभंग कारवाईची वगैरे तेथे शक्यता होती. कम्युनिस्ट पक्षात ते आता संशयास्पद घटक बनले होते. एखादा कम्युनिस्ट त्यांच्याकडे नियम मोडून येई आणि कम्युनिस्ट जगात एकमेकांवर कसे आरोप चाललेले आहेत याची माहिती देई.

एकदा त्याने सांगितले की, बड्डी निमल्स-

नने त्यांची 'प्रतिक्रियेचा स्मगलर' अशी रिचर्डची संभावना केलेली आहे. त्याचं कारण काय तर रिचर्ड हे बूर्झ्वा गटातील आणि त्यांनी आपल्या कल्पनांनी पक्षात भ्रष्टता आणलेली आहे.

बड्डी निअल्सन म्हणजे बडं प्रस्थ होतं. अमेरिकन निग्रोंना कम्युनिस्ट पक्षात स्थान देण्याचं महत्कार्य त्याचं. क्रेमलिनमध्ये त्याची भाषणं झाली होती. स्टॅलिनसमोरही त्याचं भाषण झालं होतं.

तर रिचर्डना आता पक्षामध्ये शिव्यां-खेरीज संबोधने नव्हती. त्यामध्ये 'ट्राटस्काइट' ही एक होतीच. याशिवाय विशेष महत्त्वाची म्हणजे 'बेवारशी बुद्धिजीवी !'

रिचर्ड नंतर काही काळ आजारी होते. त्या वेळी एक सीनियर कम्युनिस्ट त्यांना भेटायला आला. तो बसायला देखील तयार नव्हता. त्याने रिचर्डना बड्डी नेअल्सनचा निरोप दिला. बड्डीला त्यांची भेट हवी होती. पक्षकार्यासाठी त्याला काही तरी बोलायचे होते.

आजारातून उठल्यावर रिचर्ड त्याला भेटायला गेले. हा बड्डी म्हणजे हसतमुख असणारा पण त्यापाठीमागे एक चिडचिडा स्वभाव असणारा निग्रोनेता होता. जागतिक कम्युनिस्टांत मान असणारा असा तो कम्युनिस्ट !

प्रथम त्याने रिचर्डच्या लेखनाबद्दल काही बरे उद्‍गार काढले. पुन्हा तो म्हणाला, 'तुम्ही रॉसचे मित्र आहात असं ऐकतो.'

रिचर्डनी सांगितलं की, रॉस त्यांचा मित्र म्हणता येणार नाही; पण त्याच्या जीवनावर त्यांनी नोटस् काढल्या होत्या.

'रॉस हा राष्ट्रवादी आहे.' बड्डी म्हणाला, 'आम्ही आमच्या पक्षात निग्रो राष्ट्रवादाला महत्त्व देत नाही.'

'रॉसच्या राजकारणाला मी महत्त्व देत नाही.' रिचर्ड म्हणाले, 'एक दक्षिणेचा निग्रो म्हणून त्याच्या जीवनाविषयी काही नोंदी मी घेतल्या. त्यातील एका प्रसंगावर मी एक कथाही प्रसिद्ध केली आहे.'

रिचर्डनी त्याला समजावून सांगितले की, कम्युनिस्ट पक्षाविरुद्ध त्यांनी काही लिहिलेलं नाहीय. आपल्या लिखाणातून निग्रो जीवन प्रतिबिंबित करणे एवढा एकच उद्देश त्यांच्या लिखाणातून असतो आणि रॉसच्या जीवनावर लिहिणं त्यांनी आता सोडून दिलं होतं. कारण निग्रो बंधूंत असणारं संशयाचं वातावरण.

बड्डीनं त्यांना जुनं सगळं विसरून जायला सांगितले. तो म्हणाला की, आता रिचर्डच्या प्रतिभेची पक्षाला गरज आहे. पक्षाचा संदेश सर्वत्र पोचवण्यासाठी, उच्च राहणीमानाविरुद्ध एक समिती संघटित करायचं काम रिचर्डना करायचं होतं.

रिचर्डना हसू आलं. रस्ता लोटणे, बशा विसळणं असं काम केलेल्या त्यांना उच्च राहणीबद्दल काय ठाऊक होतं ? ते त्या वेळी एक कादंबरी लिहीत होते. त्यांनी स्पष्ट सांगितलं की, त्यांना ते जमणार नाही. ती कादंबरी लिहिल्यावर कदाचित त्यांना पक्षकार्य करता येईल. लिखाणामध्ये त्यांच्या भावना आहेत असंही त्यांनी बड्डीला सांगितलं.

पण बड्डीनं त्यांना सांगितलं की, त्यांनी ते काम स्वीकारणं पक्षाच्या दृष्टीने महत्त्वाचं आहे.

आता मात्र रिचर्डना त्याचा विचार करणे भाग होते. त्यांना कम्युनिस्ट राहायचे होते. पक्षाचे काही असो पण शिस्त ह्या दृष्टीने त्यांच्या समाजाला पक्षच मार्ग दाखवू शकेल असं त्यांना वाटत होतं. शतकानुशतकं जे लाचारीत, भ्रष्ट दिशाहीन राहिले त्यांच्यासाठी हाच मार्ग होता. पक्ष त्यांच्याशी जमवून घेवो अगर राहो.

रिचर्डनी त्याला सांगितले की, ते निग्रो कलावंतांची एक संघटना स्थापन करतील आणि त्यातून पक्षकार्य करण्याचा प्रयत्न करतील. खरं म्हणजे त्यांना संबंध संपवायचे होते; पण अजून त्यांचा धीर होत नव्हता.

## मी दोषी आहे... रॉस

त्यानंतर रिचर्डना पुन्हा पक्षकार्य करावे लागले. त्यात कम्युनिस्टांची चर्चासत्रे असत. निग्रोंना सवलती मिळाव्यात यासाठी शहरांच्या अधिकाऱ्यांवर कोणत्या मार्गाने दबाव आणता येतील यावर वाद असत; पण ह्या सगळ्या फुकाच्या वाफ दवडण्यावर रिचर्ड मनोमन नाराज होते. त्यांच्या लेखनाची तार मध्येच तोडून पक्षाने त्यांच्यावर हे नवे बंधन आणले होते.

बड्डीने एकदा स्मिथ नावाच्या एका माणसाबरोबर रिचर्डची भेट घडवून आणली. हा स्मिथ अमेरिकेतील सर्व निग्रोंच्या संघटना एक करणार होता. त्याने रिचर्डना स्वित्झर्लंड आणि रशियाला पक्षकार्यासाठी जाण्याची ऑफर केली; पण रिचर्डनी ती नाकारली. आपण आपले लेखन सोडून कोठेही जाऊ शकत नाही असं त्यांनी स्पष्ट सांगितले. पक्ष त्यांच्या लिखाणाच्या आड येतो आहे, स्मिथच्या मध्यस्थीने पक्षाचा हा प्रयत्न चाललेला आहे हे स्पष्ट दिसत होते.

'राइट, तुम्ही मूर्ख आहात.' स्मिथ म्हणाला.

रिचर्डनी मोठ्या कष्टाने राग आवरला. लहान असताना असं कोणी म्हणालं तर आपण त्याचं थोबाड फोडून ठेवत होतो हे त्यांना आठवलं; पण आता त्यांनी कष्टानं राग आवरला.

पुन्हा जेव्हा पार्टीची मीटिंग झाली तेव्हा सगळे मातब्बर कम्युनिस्ट बड्डी वगैरे हजर होते. रिचर्डनी बोलण्याची परवानगी मागितली.

ते म्हणाले, 'कॉम्रेड्स, गेली दोन वर्षे मी अक्षरशः दररोज तुमच्याबरोबर काम केलेलं आहे. तरीसुद्धा आज पक्षात मला कठीण दिवस आलेले आहेत. त्याचं कारण मी सांगत बसत नाही; पण प्रामाणिकपणे एवढं सांगतो की, मला त्याच्यावर उपाय सापडला आहे असं मला वाटतं. माझं नाव पक्षातून काढून टाकावं असं मी सुचवतोय. पक्षाच्या निर्णयाशी बांधलं राहणं मला जमणार नाही. पक्षाशी संबंधित संघटनांमधून मी पक्षाचं काम करीत राहीन. माझ्या म्हणण्याचा वाईट अर्थ घेतला जाऊ नये. पुन्हा कधी तरी मी काय करू शकतो हे मला दाखविता येईल असं वाटतं.'

सगळे शांत बसले होते. रिचर्डनी आपली हॅट, टोपी उचलली आणि ते बाहेर पडले. एका मोठ्या ओझ्यातून आपली सुटका झाल्याचा आनंद त्यांना होत होता आणि त्यांनी कोणाचे वाईटपण घेतले नव्हते, की कोणावर आरोप केले नव्हते हे समाधान होते.

दुसऱ्या दिवशी रिचर्डना दोघे कम्युनिस्ट भेटले. त्यांच्याकडून त्यांना कळले की, निअल्सनने रिचर्ड ट्रॉटस्काइट असून त्यांनी इतरांना आपल्या गटात ओढण्याचा प्रयत्न

चालवलाय असे सर्वांना सांगितले होते. त्यांना राजिनामा देता येणार नव्हता. कारण त्याचा इतरांवर परिणाम झाला असता.

रिचर्डनी निअल्सनला निरोप पाठवला. पक्षाबरोबर युद्ध करण्याची त्यांची तयारी होती. केवळ पक्षाचे निर्णय मान्य न करण्याबद्दल त्यांना शिक्षा देण्यात येणार असेल तर मग ते अगदी सार्वजनिकरीत्या पक्षाबरोबर भांडायला तयार होते.

त्या दिवसापासून पक्षाने रिचर्डना पक्षघातकी, श्रद्धाहीन ठरवले.

पुन्हा रिचर्डना एका निग्रो थिएटर कंपनीत काम मिळाले. तेथे दिग्दर्शक म्हणून एक गोरी बाई काम करायची, रिचर्डना वाटले हे योग्य नाही. त्यांनी सूचना करून त्यांचा एक ज्यू मित्र तेथे आणला; पण त्या दिग्दर्शकाने रिचर्डच्या सूचनेवरून जे नाटक बसवले ते त्या निग्रोंना जमेना. त्यांनी त्या दिग्दर्शकाला हाकलण्याचा डाव रचला आणि रिचर्डनी त्याची बाजू घेतली तेव्हा ते त्यांनाच मारायला उठले.

निग्रोबंधूबद्दलचा रिचर्डना हा आणखी नवा अनुभव. त्या नाटककंपनीमध्ये काही चांगले व्हावे, त्यांची प्रगती व्हावी म्हणून ते प्रयत्न करीत होते तर ते त्यांच्या जिवावरच उठले होते.

तेथून पुढं आपल्या कल्पना आपल्याजवळच ठेवण्याचा त्यांनीं निश्चय करून टाकला.

पुन्हा एकदा कम्युनिस्ट पक्षाच्या बैठकीला हजर राहण्याचे त्यांना आमंत्रण होते. ते सदस्य राहिले नव्हते तरीसुद्धा. त्याचे कारण होते त्यांचा जुना परिचित 'रॉस' याच्यावरची कारवाई रिचर्डना वाटले या निमित्ताने त्यांना बोलावून कदाचित त्यांच्यावर कारवाई होणार असेल; पण त्यांना सांगण्यात आले की, तसे काही होणार नाही. कामगारवर्गाच्या शत्रूविरुद्ध कोणती कारवाई होते ते त्यांना समजावे एवढाच त्या आमंत्रणामागील हेतू होता.

ते त्या कारवाईला गेले. रस्त्यावर, दारावर सगळीकडे कॉम्रेडस्चा जंगी बंदोबस्त होता. रिचर्डना आत नेण्यात आले. वातावरण तंग होते. आरोपी 'रॉस' पुढच्या बाजूला बसला होता. त्याचा चेहरा भकास दिसत होता.

रिचर्ड शांतपणे तो सोहळा पाहात राहिले. 'रॉस'चा खटला सुरू झाला. अनेकांची भाषणे झाली; पण त्यात एक रीत होती.

त्यानंतर कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती कार्यकारिणीचा एक नेता उठला. त्याने जगातील कामगारांच्या स्थितीचे अतिशय सुंदर विवरण केले. ते ऐकत असताना रिचर्डना जाणवले की, या कामगारस्थितीचा एवढा प्रचंड अभ्यास कम्युनिस्ट पक्षाएवढा कोणीही केला नसेल. 'रॉस'च्या खटल्याच्या वेळी हे विवरण एवढ्यासाठी झाले की 'रॉस'ने पक्षद्रोह केला म्हणजे कोणाविरुद्ध द्रोह केला हे स्पष्ट व्हावे. पुन्हा एकाने रशिया आणि त्याचा त्याग यावर विवेचन केले. त्यानंतर शिकॅगोचा दक्षिण भाग, तेथील निग्रोवस्ती, कम्युनिस्टांचे त्यातील कार्य यावर भाष्य केले.

त्यानंतर 'रॉस'वर आरोप झाले. हे आरोप रॉसच्या मित्रांनी त्याच्यावर केले. त्यांनी रॉसची संभाषणे, त्याच्या तारखा, दृश्य सगळं काही खुलं केलं. रॉसनं जे काही वाईट केलं होतं ते हळूहळू त्याच्या मित्रांच्या जबान्यांवरून स्पष्ट होत गेले.

रॉसची पाळी आली. त्याच्या बाजूने बोलायला त्याने पढवून ठेवले होते; पण त्याने कोणालाच बोलवले नाही. तो उध्वस्त झाल्यासारखा दिसत होता. त्याने तोंड उघडले पण शब्द येईनात. त्याचे हातपाय कापत होते. 'कॉम्रेडस् मी दोषी आहे.' एवढेच तो म्हणाला.

कोणी काही बोलले नाही. कोणी त्याला अडवले नाही. तो आता बाहेर जायला मुक्त होता. रिचर्ड म्हणतात, रॉसचा कोणी अपमान केला नव्हता. कोणी त्याला उद्देशून बोलले नाही; पण त्याचीच त्याला खंत वाटली की त्याने कबुली दिली... कम्युनिस्टांनी त्याला स्वतःच्या गुन्ह्याकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली होती. तो त्यांच्यातील होता. ते त्याचे होते आणि त्याने चूक केल्यावर त्यांनी ही दृष्टी त्याला दिली होती. त्यामुळे तो अंतःकरणापासून म्हणाला होता. 'कॉम्रेडस्, मी दोषी आहे. मला माफ करा!'

रिचर्ड तेथून बाहेर पडले, त्यांना ते बघवले नाही. त्या सगळ्या कमुनिस्टांना रिचर्डमध्ये आता शत्रूच दिसत होता. अशा लोकांमध्ये राहणे त्यांना बरे वाटेना.

पुन्हा रिचर्डना लेखकांच्या संघटनेत काम मिळाले. गाईड लिहून पोटापुरते ते मिळवू लागले. या संघटनेत बरेच कम्युनिस्ट लेखक होते; पण ते रिचर्डशी संपर्क टाळीत असत.

एकदा रिचर्डना समजले की, त्या सगळ्या कम्युनिस्ट लेखकांनी मिळून त्यांना तेथून हाकलून देण्याचा कावा रचला होता; पण, त्यांच्या सुदैवाने व्यवस्थापकाने त्याच्याकडे दुर्लक्ष केले.

आणि त्यातूनच त्यांना समजले की, पूर्वी त्यांना निग्रो थिएटर कंपनीतून काढून टाकण्यामध्ये कम्युनिस्ट पक्षाचाच भाग होता. रिचर्ड अतिशय खिन्न झाले.

एकदा रस्त्याने एक लेखकांचा मोर्चा निघाला होता. रिचर्डना बघितल्यावरोबर त्या मोर्चाने रिचर्डना शिव्या द्यायला सुरुवात केली. हे रिचर्डना धक्कादायक होते.

त्यानंतर 'मे डे' च्या परेडच्या वेळी भयानक घडले. रिचर्ड ज्या युनियनमध्ये होते ती पुढे निघून गेली होती. एका कम्युनिस्टाने त्यांना हाक मारली. कम्युनिस्ट आपल्याला आता शत्रू मानतात तेव्हा आपण त्यात जायला नको असे त्यांना वाटले; पण तो कम्युनिस्ट म्हणाला, 'आज मे डे आहे. आज सर्वच यात आहेत. तुम्ही आलात तर काही बिघडणार नाही!'

काही पावले चालल्यावर एकदम त्यांना एक रागीट आवाज ऐकू आला. 'अगोदर त्यातून बाहेर हो!' त्यांनी मागे पाहिले तर त्यांना कम्युनिस्टांचा एक जिल्हापातळीवरचा नेता दिसला.

'आज मे डे आहे आणि मला या परेडमध्ये बोलवण्यात आलेय.' रिचर्ड म्हणाले.

'अगोदर बाहेर पड!' पुन्हा रागीट गर्जना.

ज्याने त्यांना बोलवले होते त्याच्याकडे रिचर्डनी पाहिले. तो घाबरला होता. बोलायला तयार नव्हता.

दोघे–तिघे कम्युनिस्ट पुढे आले. त्यांनी रिचर्डची मानगूट धरली आणि त्यांना बाहेर फेकून दिले. हे दोघेही गोरे होते. सगळे काळेगोरे कम्युनिस्ट पाहात होते. कोणाला काही वाटत नव्हते.

रिचर्ड सुन्न होऊन पहात राहिले. मे डे परेड निघून गेली. रिचर्ड विचार करत राहिले. 'त्यांच्या शत्रूंनी त्यांना आंधळं बनवलंय.' आपल्या सगळ्या आतापर्यंतच्या कथा त्यांना आठवल्या. या सगळ्यात कम्युनिस्ट पक्ष तारक होता, उद्याच्या जगाची आशा होता.

आता येथून पुढे त्यांना तसे लिहिता येणार नव्हते. □

(*Richard wright* यांच्या '*The God that failed*' मधील निबंधावरून.)

# विज्ञान आणि शस्त्रे

चित्रा बेडेकर

या पृथ्वीतलावर मानवाचे अस्तित्व सुमारे दहा लाख वर्षांपासून आहे; परंतु संघटित समाजजीवनापर्यंत तो येऊन पोचला त्याला जेमतेम दहा हजार वर्षेसुद्धा झाली नाहीत आणि त्यामध्ये देखील त्याची भौतिक प्रगती गेल्या दोन–अडीच वर्षांतच झाली. या दोन–अडीच वर्षांत प्रथम अठराव्या शतकात वाफेच्या शक्तीने व नंतर शंभर वर्षांनी विद्युतशक्तीने माणसाच्या भौतिक प्रगतीला चालना दिली. आता तर दुसऱ्या महायुद्धानंतर अणुशक्ती, इलेक्ट्रॉनिक्स व गणकयंत्रे 'कॉम्प्युटर्स' यांनी घडकेली वैज्ञानिक तंत्रशास्त्रीय क्रांती माणसाचे जीवन पार बदलून टाकत आहे. विज्ञानाचे वरदान माणसाने मिळवले आहे खरे; पण विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विकासाची झिंग चढून त्याची विवेकशीलता तो विसरत चालला आहे. हे आणखी काही वर्षे चालले तर मानवाचा संपूर्ण विनाशही फार दूर नाही !

विज्ञानाची ही जी अफाट वेगाने आगेकूच चालू आहे त्यामुळे सामान्य माणसाची चांगलीच दमछाक होते. विज्ञान हे त्याच्या आटोक्याबाहेरचे, आकलनाच्याही बाहेरचे बनते. त्याच्यासाठी मग विज्ञान हे केवळ शाळाकॉलेजातील किंवा संशोधनसंस्थेमधील प्रयोगशाळांपुरतेच मर्यादित रहाते. तसल्या विज्ञानाचा आणि आपल्या जीवनाचा काही संबंध असेल असे त्याला मुळीच वाटत नाही. आम्हा कोटयवधी सामान्य माणसाच्या जीवनावर मृत्यू व विनाशाची टांगती तलवार ठेवणाऱ्या शस्त्रास्त्रांचा आणि प्रयोगशाळेतल्या विज्ञानाचा काही अर्थाअर्थी संबंध त्याला जाणवत नाही. युद्धाचे किंवा शस्त्रास्त्रांचे म्हणाल तर तो केवळ सत्तास्पर्धेचे राजकारण खेळणाऱ्या बलाढ्य शक्तीचा खेळ आहे अशीच त्याची धारणा बनलेली आहे. त्याच्याशी विज्ञानाचा काय संबंध ?

पण खरे तर विज्ञान आणि युद्ध यांचा जवळचा संबंध इतिहासात सर्वत्र दिसतो. पाठ्यपुस्तकातून आपल्याला शास्त्रज्ञांच्या फक्त वैज्ञानिक कार्याचीच माहिती मिळते; पण त्यांनी जे शोध लावले त्यांचा त्या वेळच्या सामाजिक-राजकीय परिस्थितीचा शास्त्रज्ञांशी कितपत संबंध होता याची फारच थोडी कल्पना आपल्याला असते. आर्किमिडीज म्हटला की, 'युरेका, युरेका' ओरडत न्हाणीघरातल्या टबातून नग्नावस्थेत बाहेर धावत येणारा शास्त्रज्ञ एवढेच चित्र आपल्या नजरेसमोर येते; पण हिरॉन राजाच्या विनंतीवरून याच आर्किमिडीजने तयार केलेल्या युद्धयंत्रांनी सिरॅक्यूजला वेढा घालणाऱ्या रोमन सैन्याची कशी दाणादाण उडवली ही घटना फारशी प्रसिद्ध नाही. अर्थात रोमन सैन्याचाच विजय झाला आणि एका साध्या शिपायाकडून आर्किमिडीज मारला गेला हा भाग वेगळा.

विज्ञानामुळे मानवाचे जीवन निश्चितपणे सुखी झाले आहे; परंतु याबरोबरच युद्धासाठीही त्याचा उपयोग होत आला आहे. चाकाचा शोध हा किती महत्त्वाचा आहे ! वाहतुकीची वाहने आणि मोठमोठाली यंत्रे यामध्ये त्याचा उपयोग ही त्या काळी नक्कीच नाविन्यपूर्ण घटना होती; परंतु त्या शोधाचा उपयोग करून युद्ध खेळण्यासाठी रथसुद्धा बनवले गेले. लोखंडाच्या शोधाने तर माणसाच्या जीवनात क्रांतीच घडून आली. जीवनोपयोगी अनेक गोष्टीत लोखंडाचा उपयोग सुरू झाला; पण त्याचबरोबर बिचवे, खंजीर, तलवारी यांसारखी युद्धोपयोगी हत्यारेदेखील निर्माण झाली. बंदुकीच्या दारूचा शोध लागल्यावर नेत्रदीपक असे शोभेचे दारुकाम केले जात होते पण तीच दारू वापरून बंदुका, तोफा या अधिक प्रभावशाली शस्त्रांचा युद्धसामग्रीत समावेश झाला. तोफखाने बाळगणारे राजे अधिक सामर्थ्यशाली ठरले.

### केंद्रीय सत्ता बळकट

पूर्वीपासून आजतागायत विज्ञानाचे समाजावर किंवा समाजाचे विज्ञानावर परिणाम होत आले आहेत, यापुढेही हे होत राहाणार. कारण विज्ञान हे समाजातच जन्म घेते. त्यामुळे दोघांचे एकमेकांपासून वेगळे अस्तित्व असूच शकत नाही. वाफेच्या इंजिनाच्या शोधाने रेल्वेमार्गांचे जाळे पसरून दळणवळण सुलभ झाले; पण लष्कराच्या हालचालींसाठीसुद्धा त्याचा उपयोग सुरू झाला. पक्ष्याप्रमाणे आकाशात भरारी मारावी हे प्रत्येक माणसालाच वाटत होते. राइट-बंधूंसारख्या हौशी तंत्रज्ञांनी इंजिन बसवलेले विमान उडवून ते स्वप्न साकारदेखील केले; पण विमानाचे युद्धात होऊ शकणारे उपयोग लक्षात आल्यावर त्यापुढचा विमानविद्येचा विकास संपूर्णपणे लष्कराच्या कुशीतच झाला. संदेशवहनासाठी तारायंत्रात विजेचा वापर सुरू झाल्यावर माणसापेक्षाही माणसांचे संदेश अधिक वेगाने प्रवेश करू लागले. त्यामुळे लांबवर पसरलेल्या व्यवहारांवर एकाच प्रमुख केंद्रातून नियंत्रण ठेवणे मोठमोठ्या संघटनांना शक्य झाले; पण त्या काळी त्याचा उपयोग शासनसंस्थांची केंद्रीय सत्ता अधिक बळकट होण्यासाठीसुद्धा झाला. भौगोलिकदृष्ट्या विशाल क्षेत्र व्यापणाऱ्या साम्राज्यांमध्ये दूरस्थ दुय्यम अधिकाऱ्यांच्या स्वयंकर्तृत्वाला आणि स्वायत्ततेला आळा बसला.

पण एवढे मात्र खरे की, त्या काळी विज्ञान आणि शास्त्रज्ञ यांच्यावर आजच्याइतका शासनसंस्थेचा पगडा नव्हता. स्वतंत्रपणे किंवा गटागटाने सत्याचे संशोधन करणे ही त्या वेळची परिस्थिती आज उरलेली नाही. आज विज्ञान हे शास्त्र राहिले नसून तो एक संघटित व्यवहार बनला आहे आणि शासनकर्ते हा फायद्याचा विज्ञानव्यवहार उद्योगपतींसाठी आणि युद्धासाठी बिनदिक्कतपणे राबवत आहेत. संशोधनक्षेत्रात अमाप पैसा आज ओतला जात आहे. देशाचा विकास आणि देशाचे संरक्षण या नावाखाली खर्च केल्या जाणाऱ्या या पैशाचा हिशेबही कोणी विचारू शकत नाही. विज्ञानव्यवहाराला एक प्रकारचे सामूहिक आणि संघटित रूप आले आहे. विज्ञानाच्या कोणत्याही शाखेतला महत्त्वपूर्ण शोध आज युद्धतंत्रासाठी आणि

संहारक अशा शस्त्रास्त्रनिर्मितीसाठी वेठीस धरला जात आहे.

रसायनशास्त्रातल्या ज्ञानाचा उपयोग करून केवळ बंदुकीची दारूच नव्हे तर टी. एन. टी. टेट्रिल यासारख्या विस्फोटकांची मालिका निर्माण झाली, पारंपारिक शस्त्रांची (कन्व्हेन्शनल वेपन्स) एक पिढीच उदयाला आली. इतकेच नव्हे तर शरीरशास्त्राच्या विकासामुळे मानवाच्या शरीररचनेतील सूक्ष्मातिसूक्ष्म कार्यपद्धतीचा उलगडा झाल्यावर रासायनिक अस्त्रे (केमिकल वेपन्स) अस्तित्वात आली. माणसाच्या त्वचेतून, फुफ्फुसातून आत शिरून, त्याच्या मज्जासंस्थेवर हल्ला करून त्याच्या मृत्यूची कबर बांधणारे 'नर्व्ह गॅस' हे विषारी वायू अशा प्रकारच्या अस्त्रांमधे वापरले गेले. जीवशास्त्रामध्ये अधिकाधिक सखोल संशोधन झाल्यावर जंतुशस्त्रेही बनवली गेली. निसर्गातली प्रत्येक जडवस्तू घडवणाऱ्या परमाणूंमधील मूलकणांचा (बेसिक पार्टिकल्स) अभ्यास जसजसा प्रगत झाला तसे अणुबाँबपेक्षाही एकाहून एक वरचढ ठरावेत असे हायड्रोजनबाँब, कोबाल्टबाँब, नापामबाँब ही भावंडे जन्माला आली. आता तर न्यूट्रॉनबाँबच्या स्फोटात निर्माण होणारे न्यूट्रॉन्स मानवी शरीराच्या अणुरेणूपर्यंत (डी. एन्. ए. पर्यंत) घुसून मानववंशाच्या अस्तित्वालाच आव्हान देणार आहेत थोडक्यात म्हणजे, जीवनातल्या मूलभूत जीवरासायनिक आणि शरीरपेशींशी संबंधित असणाऱ्या प्रक्रियांचे गूढ विज्ञानाने जसजसे उकलले तसतसे विविध प्रकारचे 'कल्पक' आणि 'प्रगत' उपाय वापरून माणसांचा लीलया संहार करणे सोपे झाले आहे.

## निःशस्त्रीकरणच हवे

विज्ञान, शस्त्रास्त्रे आणि युद्ध यांच्यातल्या या नात्याला गेल्या तीस वर्षांत – विशेषत: दुसऱ्या महायुद्धानंतर – एक वेगळेच स्वरूप आले आहे. हिटलरच्या कारकीर्दीपूर्वी जगातल्या शास्त्रज्ञांना आणि त्यांच्या संशोधनक्षेत्राला राष्ट्रीय सीमांचे बंधन नव्हते. जर्मनी हे तर त्यांचे माहेरघर होते; पण १९३३ च्या जानेवारीत हिटलर सत्तेवर आल्यानंतर निर्वासित झालेल्या अनेक शास्त्रज्ञांनी अमेरिकेचा आश्रय घेतला. अगदी आइनस्टाइनसारखा थोर शास्त्रज्ञदेखील या ज्यूद्वेषातून सुटला नाही! दुधाने तोंड पोळल्यावर ताकही फुंकून प्यावे तशीच गत या शास्त्रज्ञांची झाली. शास्त्रज्ञांनीच अणुबाँब तयार करण्याची गळ अमेरिकन सरकारला घातली हे अर्धसत्य आपल्याला ठाऊक असते. पण जगज्जेतेपणाची ईर्षा बाळगणाऱ्या क्रूरकर्मा हिटलरच्या नाझी जर्मनीत अणुबाँब नक्कीच तयार होत असावा या शंकेने हे शास्त्रज्ञ घेरले गेले होते आणि त्यांनी अणुबाँब-निर्मितीची अमेरिकन शासनापुढे मागणी केली.

१३ ऑगस्ट १९४२ पासून अणुबाँब तयार करण्याच्या 'मॅनहॅटन' प्रकल्पाला अमेरिकेत सुरुवात झाली आणि तेव्हापासूनच विज्ञान आणि शास्त्रज्ञ हे शासन आणि लष्कर यांच्या पंजात अडकत गेले. संशोधनातले गुप्ततेचे करार, लष्करी खात्याची शास्त्रज्ञांच्या हालचालीवर सतत असणारी संशयी व करडी नजर आणि संशोधनकार्यात असणारे वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांचे वर्चस्व या गोष्टींतून नामवंत शास्त्रज्ञदेखील सुटले नाहीत. वरच्या हुद्द्यावरचे मूठभर शास्त्रज्ञ सोडल्यास आपण कसले संशोधन करत आहोत याचा कुणालाच थांगपत्ता नव्हता! जर्मनीत अणुबाँब तयार करत नाहीत याची खात्री पटल्यावर अमेरिकेतली अणुबाँबनिर्मिती थांबवावी यासाठी या वरिष्ठ शास्त्रज्ञांनी शिकस्तीचे प्रयत्न केले; पण फार उशीर झाला होता. त्यांनीच निर्माण केलेल्या त्या अस्त्रावर त्यांचा कोणताच अधिकार उरला नव्हता. ते सर्वस्वी शासनाच्या आणि लष्कराच्या हाती केव्हाच गेले होते. तेव्हापासून आजतागायत विज्ञान आणि आणि शास्त्रज्ञ हे युद्धपिपासूंच्या आणि शासनाच्या मगरमिठीत अधिकाधिक अडकत चालले आहेत.

काही प्रसंगी शास्त्रज्ञदेखील शासनाशी हातमिळवणी करतात. १९४९ मध्ये सोविएत युनियनने अणुस्फोट-चाचणी केल्याचे समजताच अणुबाँबहून अधिक संहारक बाँब तयार करण्याची अमेरिकन शासनाला घाई लागली. त्या वेळी ओपेन हायमर, हान्स बिथे व इतर शास्त्रज्ञांच्या विरोधाला न जुमानता एडवर्ड टेलर आणि न्यूमन यांनी शासनाची बाजू उचलून धरली. आजही अशी प्रवृत्ती काही शास्त्रज्ञांमध्ये आढळते. स्वत:च्या 'करियर'साठी मानवतेच्या विरुद्ध उभ्या ठाकणाऱ्या या प्रवृत्तीचा निषेधच करावा लागेल. अण्वस्त्रांचे डोंगर रचून विनाशाच्या कड्यावर सबंध जगाला आणून ठेवणाऱ्या बलाढ्य शक्तींच्या युद्धपिपासेला कोणत्याही वैज्ञानिकाने विरोधच केला पाहिजे. ही त्याची नैतिक जबाबदारीच आहे!

अण्वस्त्रनिर्मितीला बंदी घातली, युद्ध न करण्याचा एखादा जागतिक करार झाला आणि सर्व राष्ट्रांनी तो प्रामाणिकपणे पाळला तरीही सध्या जगात शस्त्रांचे आणि अण्वस्त्रांचे इतके प्रचंड साठे अस्तित्वात आहेत की, विनाशाची टांगती तलवार तशीच राहील! ही अत्याधुनिक अण्वस्त्रे इलेक्ट्रॉनिक्स व कॉम्प्युटर्स यांच्या प्रगत तंत्रज्ञानाद्वारे नियंत्रित केली जातात. जाणूनबुजून युद्ध सुरू केले नाही तरीही यांत्रिक बिघाड, हवामानातील बदल आणि मानवी चुका यामुळे शांततेच्या काळातही एखाद्या क्षणी युद्धाला तोंड फुटू शकते. अमेरिकेतल्या एका अधिकृत अहवालानुसार १९८० पूर्वी अठरा महिन्यांच्या अवधीत १४७५ वेळा चुकीचे इशारे दिले गेले. वरील तीन कारणांखेरीज अचानकपणे अपघात होतात ते वेगळे. अमेरिकेत अशा एका अपघातात २४ लाख टन स्फोटक्षमतेच्या अण्वास्त्रांचा (हिरोशिमावर टाकलेल्या अणुबाँबहून १८०० पटींनी


वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे
प्रेरणादायी चरित्र

**एक होता कार्व्हर**

**लेखिका : सौ. वीणा गवाणकर**
दुसरी आवृत्ती
मूल्य : तीस रुपये
**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पुणे ३०

अधिक शक्तिमान) स्फोट रोखणाऱ्या सहा नियंत्रण-व्यवस्थांपैकी पाच नष्ट झाल्या. उरलेली एक नियंत्रण-व्यवस्थाही नष्ट झाली असती तर अमेरिकेचा अठराशे पटींनी हिरोशिमा झाला असता !

आज ही युद्धलालसा विज्ञानाला आणि जगाला कोठे घेऊन जात आहे? सध्या जगात फक्त लष्करी कारणासाठी दरवर्षी ५००,००० कोटी डॉलर्सचा चक्काचूर होत आहे ! शस्त्रास्त्रांचे उत्पादन आणि लष्करी सेवा यात एकूण साडेसहा कोटी कामगार जुंपले गेले आहेत. जगात लष्करी उद्दिष्टांसाठी जे शास्त्रीय संशोधन चालते त्यात एकूण चार लाख शास्त्रज्ञ वेठीस धरले गेले आहेत. निसर्गसंपत्ती, पैसा, मनुष्यबळ आणि मानवी बुद्धी यांचा जो प्रचंड अपव्यय चालला आहे तो कशासाठी ? मानवजातीला समूळ नष्ट करण्यासाठी ? निसर्गाचे एकेक गूढ उकलून दाखवणारे विज्ञान आज लष्करशाहीची बटीक बनले आहे. मानवतेच्या या शत्रूंच्या हातात विज्ञानाच्या दोऱ्या गेल्यामुळे वैज्ञानिक आज कळसूत्री बाहुलीप्रमाणे अगतिक बनले आहेत. विज्ञानाचा आधार घेऊन जन्माला आलेली शस्त्रास्त्रे विज्ञानालाच गिळू पहाताहेत. अशा परिस्थितीत युद्धपिपासूंच्या मगरमिठीतून विज्ञानाची सुटका कशी होणार आहे ? केवळ शास्त्रज्ञांच्या विरोधातून नव्हे तर तुमच्याआमच्यासारख्या नागरिकांच्या तीव्र विरोधातून, या भूतलावर जगण्याचे हक्क मागणाऱ्या प्रत्येक माणसाच्या ज्वलंत मानवतावादातूनच ती होणार आहे.

आज केवळ युद्धबंदी करून किंवा अण्वस्त्रनिर्मितीला बंदी घालून जगाचा, मानववंशाचा संहार टाळता आला येणार नाही. त्यासाठी जगाचे निःशस्त्रीकरण झाले पाहिजे. कारण आजच्या प्रगत इलेक्ट्रॉनिक्सच्या आणि स्वयंचलित तंत्रज्ञाच्या युगात असा संहार करायला मनुष्यबळाचीही फारशी आवश्यकता उरलेली नाही. सर्व प्रकारच्या संहारक शस्त्रास्त्रांचे जगातले साठे इतके प्रचंड आहेत की, विनाशाचा निर्णय घेऊ शकणारा एखादा विकृत मेंदू आणि स्वयंचलित यंत्रांची बटने निर्विकारपणे दाबू शकणारी बोटे इतकेच पुरेसे आहे. □

पुस्तके

# तीन कादंबऱ्या

## 'आभाळ आणि जागरण'

या पुस्तकात दोन कादंबऱ्या एकत्र केलेल्या आहेत. १९६९ मध्ये दैनिक 'अजिंठा'-च्या दिवाळी अंकात 'मायगोदे' या नावाने प्रसिद्ध झालेली कादंबरी 'आभाळ' असे नामकरण करून इथे छापली आहे. या कादंबरीला रझाकारांच्या चळवळीची पार्श्वभूमी आहे. 'जागरण' ला कै. जयप्रकाशजींच्या दरोडेखोरांच्या हृदयपरिवर्तनाच्या प्रयोगांची पार्श्वभूमी आहे असे लेखकाने प्रास्ताविकात सांगितले आहे.

सर्वसामान्य माणसांच्या संथ, सरळमार्गी जीवनक्रमाला राजकीय वावटळींमुळे धक्का बसतो. अनेक प्रगट-अप्रगट व्यथा-वेदना त्यांना सोसाव्या लागतात. माणसा-माणसातल्या बदलू पहाणाऱ्या नातेसंबंधांच्या दर्शनाने, भाबडी, प्रेमळ, माणुसकीची भूक असणारी माणसं 'अंतर्यामी हादरतात हे अक्रीत कुठून, कसं आलं? कधी दूर होणार? विस्कटलेली मनं आणि जीवनं पुन: कधी फुलवणार ? हे प्रश्न या माणसांना अस्वस्थ करतात. जुनी, जाणती माणसं आपली सद्दी संपली या भावनेनं उदास होनात; पण त्यांना असणारा माणुसकीचा गहिवर त्यांच्या मनातला ओलावा नष्ट होऊ देत नाही. सगळ्या जगाचं सदैव भलं चिंतणाऱ्या बाप्पाजी देशमुखांची माणुसकीवरची दृढ श्रद्धा चित्रित करणारी ही 'आभाळ' कादंबरी ! रझाकारांच्या अत्याचाराला प्रत्युत्तर देण्यासाठी बाप्पाजींचा मुलगा रंगराव कंबर कसून उभा रहातो. बाप्पाजींना पत्ता लागू न देता संघटन करतो. हुसेन देशमुखांचा मुलगा हसन याने बाप्पाजींच्या विधवा सुनेला घरात कोंडलेले असतं; पण शांत, संयमी बाप्पाजी त्याचा सूड तर घेत नाहीतच; उलट गावच्या तरुण रक्ताला हुसेन देशमुख रझाकारांना सामील असल्याचा संशय असल्याचे माहीत असल्यामुळें बाप्पाजी कठीण प्रसंगात हुसेनला स्वत:च्या घरात आश्रय देतात. आपल्या विशाल मनाचं दर्शन घडवतात.

सुखराम हिवराळे यांनी ही सबंध कहाणी अतिशय सुटसुटीतपणे सांगितली आहे. संवाद, प्रसंगचित्रण, व्यक्तिचित्रण साधताना फापटपसारा टाळून नेमका तपशील तेवढा उभा केला आहे. एखाद्या रेखाचित्रासारखी ही कादंबरी आहे; पण उत्कृष्ट रेखाचित्रांतील रेषांमध्ये आस्वादकाच्या रसिकतेला आवाहन करण्याचे सुप्त सामर्थ्य दडलेले असते. इथे मात्र तसे घडत नाही. व्यक्ती-व्यक्तीमधले संबंध, गावातलं मूळचं वातावरण आणि नंतर निर्माण झालेली दहशत, बदलती मनं हे सारे घटक कादंबरीत पुरेसा उठावदारपणे उभे असायला हवे होते. त्यांच्याअभावी कादंबरी परिणामशून्य ठरते. विशाल मनाचं चित्रण करीत असताना परिस्थितीतील संघर्षाचं नाट्यही ताकदीनं रंगवलं असतं तर यातील व्यापक आशय मनाला स्पर्श करू शकला असता. एक बेताची कुवत असलेली कादंबरी असंच 'आभाळ' ला म्हणावं लागतं. ◻

'जागरण' या कादंबरीला कै. जयप्रकाशजींच्या दरोडेखोरांच्या हृदयपरिवर्तनप्रयोगाच्या वृत्तपत्रातील बातम्या वाचून प्रेरणा मिळाली आहे असे लेखक सांगतात. मात्र पत्थराच्या पोटात झुळझुळणाऱ्या झऱ्याचं स्तिमित करणारं दर्शन यात नाही. कादंबरी संपता संपता, तुरुंगातल्या अनुभवाने 'केवळ वाटमारी करून, दरोडे घालून जगण्याचे एकमेव साधन माहीत असलेल्या जीवांना श्रमसाफल्याची प्रचीती येत होती', 'नवजागरणाने नव्या जीवनाची दिशा त्यांना मिळाली होती' अशा वाक्यांनी दरोडेखोरांचं हृदयपरिवर्तन झाल्याचं सांगितलं आहे. सुरुवातीपासून संपूर्ण कादंबरी दरोडेखोरांच्या क्रौर्याचं, अक्राळविक्राळ प्रत्ययकारी रूप दाखवते. या वर्णनाशी लेखक समरस झालेले आहेत. दरोडेखोरांची वस्ती, भोवतालचा निसर्ग, त्यांच्या मार्गातले धोके आणि वेळप्रसंगी साथीदारालाही खतम करण्याची वृत्ती या सगळ्याचं चित्रण करून कादंबरी एकदम आटोपती घेतली आहे. तुरुंगात होणारे चांगले संस्कार, व्यवसायशिक्षण,

दोन विरुद्ध टोकाच्या मानवी जीवनाच्या दर्शनाने अट्टल गुन्हेगारांच्याही मनात होणारी उलथापालथ, या कादंबरीच्या कथाबीजात असलेल्या गोष्टींकडे लेखकांनी लक्ष दिलेले नाही. त्यामुळे जयप्रकाशजींच्या प्रयोगांशी तिचा कोणताच भावबंध जुळत नाही. दरोडेखोरांच्या जीवनाचं चित्रण मात्र चांगलं जमलेलं आहे.

'आभाळ' पेक्षा 'जागरण' ही कादंबरी काही दोष जाणवले तरीही, अधिक जमलेली कादंबरी आहे. मात्र या दोन्ही कादंबऱ्या एक उदात्त संस्कार करण्याचा हेतू मनाशी बाळगून लिहिलेल्या आहेत. त्यामुळे आखीव, बेतीव अशा रचनेमध्ये येणारी शुष्कता, अकलात्मकता यातही आढळते.

कादंबऱ्यांच्या प्रकाशनाच्या संदर्भात लेखकांना आलेले कटु निराशाजनक अनुभव त्यांनी प्रास्ताविकात सांगितले आहेत. हे अनुभव नवीन लेखकांचा उत्साह भंग करणारे आहेतच; त्याचबरोबर लेखकांना आत्मपरीक्षण करायलाही लावणारे आहेत. ¤

आभाळ आणि जागरण
लेखक : सुखराम हिवराळे
प्रचार प्रकाशन, कोल्हापूर
पष्ठे १४७. मूल्य. १७ रु.

## 'सर्वसाक्षी'

ही कृ. ज. दिवेकर यांची कादंबरी आहे. ह्या काल्पनिक चरित्रात्मक कादंबरीचा एक प्रकार आहे. दोन गोष्टींचा तोल साधत ती पुढे सरकू पहाते. एक म्हणजे केंद्रस्थानी असलेल्या पवन गायकवाड या काल्पनिक व्यक्तीचे जीवनचरित्र वाचकांच्या पुढे उभे करणे आणि दुसरे म्हणजे त्याच्यासंबंधीचा एक रहस्यमय धागा सूचित करीत रहाणे. वास्तविक यात नाविन्यपूर्ण असं काही नाही. ललितलेखनाच्या संदर्भात, त्या ठराविक चाकोरीतल्या रूढ अशा गोष्टी झाल्या; पण तरीही ही कादंबरी वेधक, स्वतःचा ललितरम्य थाट असलेली, माणसांच्या निबिड जंगलातल्या एका रासवट नमुन्याच्या द्वारे अंतर्मुख करणारा जीवनाशय व्यक्त करणारी, अशी होऊ शकली असती; पण तसे झालेले नाही. त्याचे प्रमुख कारण म्हणजे कलानिर्मितीत आकृतिबंधाला जे विशिष्ट महत्त्व असते, त्यामुळे कलाकृतीला जी सौंदर्यपूर्णता प्राप्त होत असते, त्याकडे लेखकाचे दुर्लक्ष झालेले आहे. डोक्याला ताण न देणाऱ्या सरळसोट, तपशीलवार निवेदनपद्धतीचा अवलंब इथे केलेला आहे. पवन गायकवाड या नायकासंबंधी त्यातून भराभर 'माहिती' मिळत जाते. या माहितीच्या अनुषंगाने इतर अनावश्यक फापटपसाराही येतो. ज्यामुळे कादंबरी परिणामकारकतेपासून दूर जाते, गायकवाड या व्यक्तीच्या अंतरंगाचे कप्पे उलगडत जाण्याऐवजी त्याच्या भन्नाट करामतींची गंमत वाटू लागते. हा पवन गायकवाड म्हणजे कोण ते पुस्तकाच्या मलपृष्ठावर छापल्यामुळे आणि पहिल्याच प्रकरणात सांगून टाकल्यामुळे रहस्य हे 'रहस्य' रहातच नाही !

ज्याच्याबद्दलचे तपशील अगदी भरभरून वाचायला मिळतात तो पवन गायकवाड आहे तरी कोण ? कोल्हापूरचे प्रख्यात कायदेपंडित गोपाळराव पाटील यांचा अनौरस मुलगा, दीपक पाटीलचा सावत्र भाऊ ! एक नॉनमॅट्रिक प्यून. पालघरच्या मिल्क स्कीममधून मुंबईला बदली मिळावी म्हणून तरुण मुलांना घाणेरडी पत्रं लिहिणारा, संभाषणचतुर, सूक्ष्म निरीक्षणशक्ती असलेला, दुसऱ्यावर छाप टाकण्यात तरबेज, नाटक, सिनेमा, साहित्य यात रस असणारा. स्वतः नट होण्याचं स्वप्नही त्याने उराशी बाळगलं; पण निराशा पदरी आली. कादंबरीतला 'मी' हा मोठ्या हुद्द्यावर असलेला अधिकारी आहे. त्याचा मित्र दीपक पाटील, काचवाला ही सारी मोठ्या पदांवर असलेली बुद्धिमान, सालस, सज्जन माणसं आहेत. निवेदकाची पत्नी मालती, पूर्वाश्रमीची प्रेयसी आणि दीपकची पत्नी ज्योती या दोघी सुंदर सुशिक्षित स्त्रिया आहेत. या सगळ्यांवर पवन गायकवाडने जणू जादू केली आहे. बाई आणि बाटलीत बुडालेल्या कसलेच सुसंस्कार नसलेल्या, कलासक्त, बहुश्रुत अशा गायकवाडला ही सारी माणसं चाहतात. 'मी' तर त्याने 'सर्वसाक्षी' केले आहे. स्वतःच्या आयुष्यातल्या सर्व गोष्टी कसलाही आडपडदा न ठेवता त्याने त्याला सांगितल्या आहेत. या वेळोवेळी सांगितलेल्या हकीगती, 'मी' गायकवाडसंबंधी इतरांशी जे बोलतो ते संवाद म्हणजेच ही कादंबरी !

अशा या गायकवाडचा जीवनग्रंथ वाचकांसमोर मांडताना, विविध घटना-प्रसंगांतून त्याचा स्वभाव, वृत्ती, त्याला छळणारी मानसिक दुःखं या गोष्टी सहज व्यक्त झाल्या असत्या तर कादंबरीला आपोआप एक कलात्मक उंची लाभली असती. कादंबरीत जे संवाद येतात तेही अतिशय कृत्रिम, लांबलचक पुस्तकी भाषेतले ! टी. व्ही. वरच्या बऱ्या-वाईट कार्यक्रमांची चर्चा ही मूळ कथावस्तूशी असंबद्ध आहे. रेल्वे-बसचा प्रवास फुकटात कसा करावा, नाटके, सिनेमे फुकटात कसे पहावे यासंबंधीचे तपशील गायकवाडच्या विविध 'गुणदर्शना' साठी आवश्यक वाटले तरी सवंग आहेत.


घटना-प्रसंगात बराच भडकपणा, अतिरंजितता जाणवते. ज्योती पाटीलला गायकवाडपासून मूल होणं, आपल्या पतीशी प्रतारणा करीत असल्याची कोणतीच खंत तिला न वाटणं, गोपाळराव पाटलांनी पवन गायकवाडच्या आईवर केलेल्या अन्यायाचा नकळत सूड घेतला जाणं या साऱ्या गोष्टी कादंबरीला एका सामान्य पातळीवर नेतात. कारण त्या घिसाडघाईने हाताळल्या गेल्या आहेत. आपल्या 'सर्वसाक्षी' ला पूर्णपणे अंधारात ठेवून गायकवाड लग्न करून येतो, अनेक दिवसांनंतर लग्नाचा खेळखंडोबा पत्राने कळवतो, या साऱ्याच गोष्टी निवेदक आणि गायकवाड यांच्यात निर्माण झालेलं नातं लक्षात घेता विसंगत वाटतात. या दोघातलं हे नातंही तसं वास्तवतेपासून खूप दूर गेलेलं आहे. आपल्या हाताखालच्या प्यूनबद्दल वरिष्ठ अधिकाऱ्याला आपुलकी वाटणं, आपल्याला शक्य असेल तेवढी त्याला मदत करावी, अधःपतनापासून वाचवावं असं वाटणं हे सारं सज्जनाच्या मनोवृत्तीला धरून आहे; पण दारुबाज आणि वेश्यागमनी माणसाला स्वतःच्या घरी रहायला ठेवून घेणं (पत्नी सालस, समंजस असते तरीही) हे फार टोकाचं झालं. तसंच गायकवाडला भेटायला अधीरतेनं काचवाल्यांच्या ऑफिसात जाणं, वरळीला त्याच्या घरी जाऊन आमच्याबरोबर कन्याकुमारीला येतोस का असं विचारणं हे सारं तर्कविसंगत आहे.

गायकवाडच्या अधःपतनाला परिस्थिती किंवा नियती यापेक्षा त्याचा तोच जबाबदार आहे. त्याच्या जीवनातल्या अनुकूल गोष्टींचा त्यानं आपलं आयुष्य घडविण्यासाठी काही उपयोग करून घेतलेला नाही. त्यामुळं ही व्यक्तिरेखा वाचकांचं मन जिंकू शकत नाही. अनेकविध गुणावगुणांचं अनोखं मिश्रण त्याच्यात असल्यानं थोडी वेगळी चीज वाटते इतकंच !

एकंदरीत फावल्या वेळात बेताची करमणूक करणारी ही चटपटीत कादंबरी आहे.

—मेधा सिधये

सर्वसाक्षी
कृ. ज. दिवेकर
श्रीविद्या प्रकाशन
प्रथमावृत्ती १५ ऑगस्ट १९८२
पृष्ठे १५२. मूल्य २० रुपये.



कार्यक्रमातील
कलमें वीस
नव आकांक्षांचे
नवें प्रतीक
davp-83/256

# 'अर्थ' समजलेली नायिका

पूर्वी हिंदी चित्रपटात एक जमाना असा येऊन गेला की, ज्यात दोन प्रेमी आणि एक प्रेमिका असा त्रिकोण असायचा. आता अलीकडच्या काही चित्रपटात पुनश्च एक त्रिकोण आपल्यापुढे येतोय आणि हा त्रिकोण म्हणजे फिल्मी भाषेतच म्हणायचं झालं तर 'पती, पत्नी और वो !'

'पती, पत्नी और वो', 'गृहप्रवेश', 'ये नजदिकियाँ', 'मासूम' अशा चित्रपटांच्या मालिकांतून हाच त्रिकोण आपल्यापुढे वेगवेगळे रंग घेऊन पेश होतोय. कधी नवऱ्याची पारंपारिक जीत, कधी पत्नीची सोशिकता तर कधी 'वो' चा समंजसपणा अशातून त्यांचे शेवट घडत गेले. आणि लोकही 'चला ! गाडी पुन्हा रुळावर आली ना !' असं म्हणून मोकळे.

या सगळया पार्श्वभूमीवर नव्यानेच आलेला महेश भट्टलिखित व दिग्दर्शित 'अर्थ' मात्र आपल्या शेवटाने लोकांना विचार करायला लावतो. काही अर्थ निश्चित शोधायला लावतो असं म्हणता येईल स्त्री-पुरुष समानतेची मागणी पुढे येणाऱ्या जमान्यात समानता आणि मुक्ती यांचा अर्थ आपण कसा लावणार आहोत याच्याही विचाराचा एक धागा हा चित्रपट आपल्यापुढे ठेवतो.

चित्रपटाचं कथानक थोडक्यात असं...

इंदर (कुलभूषण खरबंदा) आणि पूजा (शबाना आझमी) हे उच्च मध्यमवर्गीय जोडपं. इंदर आर्टिस्ट असतो थोडासा भांडकुदळ, त्यामुळे कुठेही नोकरीत न टिकणारा. स्वत:चं असं घर अजून न घेऊ शकलेला. लहानपणी अनाथाश्रमात वाढल्यानं 'स्वत:चं घर' हे पूजाचं स्वप्न. इंदरच्या स्वभावामुळं पूजाचं हे स्वप्न पुरं होऊ शकत नसतं.

इंदरच्या जीवनात फिल्मस्टार कविता (स्मिता पाटील) येते. त्यांच्या मैत्रीचं रूपांतर प्रेमात होतं. ते लग्न करायचं ठरवतात. पूजाला घर घेऊन दिल्यानंतर या लग्नाबाबत सांगायचं तो ठरवतो. कविताच्या पैशांनी तो पूजाला घर घेऊन देतो. अर्थातच पूजाला हे माहीत नसतं. नंतर तो पूजाला कविताबद्दल सांगतो. पूजा सुरवातीला चिडते, रडते, परत नव्याने आयुष्य सुरू करण्याबद्दल तिला अजून एक संधी देण्याबाबत विनवते; पण इंदरवर याचा परिणाम होत नाही. इंदर घर सोडून जातो. कविताच्या पैशांनी घेतलेलं हे घर आहे हे समजताच पूजाही घर सोडून जाते व हॉस्टेलवर रहाते. नोकरी करते. स्वत:च्या पायावर उभी रहाते. इकडे कविता इंदरशी लग्न करायला नकार देते. ती सांगते, 'माझ्यामुळे तू पूजाला सोडलंस, आणखी कुणासाठी तू मला कशावरून सोडणार नाहीस?' इंदर पूजाकडे परत येतो; पण पूजाही त्याचा स्वीकार करत नाही. ती विचारते, 'तू जे काही माझ्याशी केलंस ते मी तुझ्याशी केलं असतं आणि अशी परत आले असते; तर तू मला स्वीकारलं असतंस ?' तो 'नाही' म्हणतो.

दरम्यान पूजाच्या जीवनात तिचा गायकमित्र राज (राजकिरण) येतो, राज तिला लग्नाबाबत विचारतो; परंतु जीवनाचा अर्थ समजलेली पूजा स्वत:चे जीवन स्वत:च्या हिंमतीवर चालवण्याचा निश्चय बोलून दाखवते. भविष्याची स्वप्नं डोळयात खेळवणारा पूजाचा छान क्लोज-अप चित्रपट संपवतो.

स्वत:च्या जीवनाचा अर्थ समजलेली व त्याला सामोरे जाण्याची हिंमत असलेली नायिका अर्थमध्ये शबानाने समर्थपणे उभी केली आहे. आतापर्यंतच्या बहुतेक चित्रपटांतून नायिका या एक तर हिंदु नारी किंवा एकदम सेक्स डॉल. अधली-मधली भूमिका नाहीच. त्यामुळे अर्थमधली पूजा पारंपारिक कल्पनांना फाटा देणारी वाटते. पूजाचे चित्रण नव्या बदलत्या काळाच्या अनुषंगाने स्त्रीचे जे चित्रण आवश्यक आहे, त्याच्याशी मिळते जुळते वाटते. बऱ्याचदा स्त्रियांच्या प्रश्नांचे भांडवल चित्रपट 'हिट्ट' करण्यासाठी केले जाते. पण या चित्रपटाचा प्रेक्षकांवर होणारा परिणाम बघता असे जाणवत नाही. सुरुवातीची पूजाची गृहिणी ते शेवटची स्वतंत्र व्यक्ती म्हणून उभी राहण्याची धडपड, हा तिच्यातला बदल वास्तव वाटतो. आणि शेवटी इंदरचा किंवा राजचा स्वीकार न करता स्वत:च्या हिंमतीवर जगण्याची तिची जिद्दही तिच्या घडणीशी सुसंगत वाटते.

दुसरं स्त्रीपात्र म्हणजे फिल्मस्टार कविता. ही प्रसिद्धीमुळे आणि आर्थिक सुबत्तेमुळे स्वतंत्रच असते. जेवढया प्रामाणिकपणे तिची इंदरशी लग्न करण्याण्याची तयारी असते तितक्यातच प्रामाणिकपणे ती तो निश्चय शेवटी बदलते. सुरुवातीला काहीसं उथळ वाटणारं तिचं व्यक्तीमत्त्व शेवटच्या तिच्या निर्णयामुळे तिच्या थोडयाशा परिपक्वपणाची साक्ष देतं.

इंदर हे पात्र त्यामानानं अप्पलपोटी. त्याच्याबद्दल सहानुभती वाटतच नाही. हे मुद्दाम केल्याचंही जाणवलं नाही. सुरवातीला त्याच्या पूजातील मानसिक गुंतवणुकी (involvement) बद्दल शंका येते. त्याचं प्रेम उथळ वाटतं. ये नजदिकियाँ किंवा मासूम यात दाखवलेला हिरोतला परिपक्वपणा (maturity) त्याच्यात जाणवत नाही. त्यामुळे पूजा आणि कविता यांच्या प्रेमाच्या कात्रीत सापडल्याने त्याची झालेली कोंडी, सहानुभूतीचा सूर उमटवू शकत नाही किंवा शेवटी पूजा त्याचा स्वीकार करत नाही, हेही बरोबर वाटतं.

पूजाची मोलकरीण (रोहिणी हट्टंगडी) आणि रूमपार्टनर (किरण वैराळे) ही स्त्री पात्रं 'स्त्री' असल्यामुळे येणाऱ्या प्रश्नांनी ग्रासलेली. परंतु प्रत्येकीने आपापल्या परीने प्रश्नांतून मार्ग काढलेला. मोलकरीण, नवऱ्याने रखेली ठेवली म्हणून वैतागलेली पण सोडून जाण्याइतकी हिंमत नसलेली, परंतु शेवटी मुलीच्या शिक्षणाचे पैसे नवऱ्याने चोरले म्हणून ती त्याचा खून करते. रूमपार्टनर जीवनाचा आनंद लुटण्यासाठी स्वत:च्या शरीराचाही उपयोग करण्यास भाग पाडली गेलेली. त्यामुळे 'कुछ पानेके लिए कुछ देना चाहिए और औरतके पास देनेके लिए शरीर के अलावा और क्या है ?' शरीर—हे तिचं सूत्र ! कथेच्या अनुषंगाने आलेली पात्रंही कथेशी सुसंगत वाटतात.

'अर्थ' चं कथासूत्र आतापर्यंत बऱ्याच चित्रपटातून हाताळलेलं आहे; परंतु चित्रपटाच्या प्रभावाच्या दृष्टीने पाहता अर्थचा शेवट निश्चितच चांगला आहे. अर्थचं श्रेय या दृष्टीनं आहेच; पण इथे एक गोष्टही लिहावीशी वाटते की पती-पत्नी और वो मधल्या वोमुळे पती सोडून गेल्यानंतरच पत्नीला स्वत्वाची जाणीव का होते ? त्यानंतर ती स्वत:च्या पायावर उभे राहण्याचा प्रयत्न करते. स्वत:चं क्षेत्र शोधते म्हणजे असं काही घडेपर्यंत जीवनाचा स्वत:चा अर्थ, अस्मिता वगैरे काही नाही; पण नंतर या गोष्टी उफाळून येतात. सागायचं म्हणजे स्त्रियांना अन्यायकारक इतरही गोष्टी आहेत. त्याचंही चित्रण आवश्यकच आहे, शिवाय पूजाच्या जीवनात जे काही घडत त्यामुळे ही स्वतंत्र होते. जीवनाचा अर्थ समजू शकते. कदाचित इतरांच्या जीवनात इतक्या थरापर्यंत गोष्टी घडत नसतीलही. त्यांना या चित्रपटामुळे स्वत:च्या जीवनाबद्दल विचार करावासा वाटला तरी अर्थ सार्थकी लागला असंच म्हणावं लागेल.

—विद्या कुलकर्णी

# नाट्यपंढरी



## □ जाहिरात ! जाहिरात !

१८४३ ते १८८० पर्यंत म्हणजे विष्णुदास भावे ते अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या किर्लोस्कर नाटकमंडळीच्या स्थापनेपर्यंत नाटकांची खास अशी जाहिरात करीतच नसत. नाटकवाले गावोगाव फिरत आपले खेळ करीत. त्यांची खरी बोलकी जाहिरात म्हणजे त्यांचे प्रेक्षक. नाटकमंडळी पुढच्या गावी पोचते न पोचते तो तिची बरीवाईट कीर्ती तिथे पोचलेलीच असे. कारण पुढचा मुक्काम हा बहुधा पन्नास–पाऊणशे मैलांच्या आतबाहेरचाच असे. काही नाटकमंडळ्या लिथोप्रेसमध्ये छापलेल्या मोठ्या जाहिराती (भित्तीपत्रके) 'खूष खबर ! येणार, येणार !' 'इचलकरंजीकर नाटकमंडळी' लवकरच आपले हातखंडे खेळ करून दाखविणार ! (थिएटर, वार नि वेळ यासाठी याच जाहिरातीत मोकळी जागा असे ते मग शाईने लिहीत) अशा जाहिराती पुढच्या मुक्कामाच्या गावी चावडी, कचेरी, इमारतींच्या दर्शनी भागावर डकवीत असत. सहाजिकच त्यामुळे गावातल्या लोकांना कंपनीच्या आगमनाची चाहूल लागत असे.

ज्या गावी कंपनीचा मुक्काम असे तिथे मात्र जे नाटक असेल, त्याचे बोर्ड मोक्याच्या जागी लावीत. सकाळ–संध्याकाळ जाहिरातीचा गाडा किंवा गाडी फिरविली जाई. त्या वेळी हिरव्या, तांबड्या कागदावर छापलेल्या जाहिराती ( हँडबिल्स ) वाटीत असत. बस, इतकीच माफक जाहिरात असे. कधीकधी एखाद्या सजविलेल्या बैलगाडीवर दिव्यांची रोषणाई करून त्या दिवशीच्या ( रात्रीच्या ) खेळाची खास जाहिरात ती गाडी गावभर फिरवून करीत; पण हँडबिल्समध्ये मात्र काही काही नाटकमंडळ्या नाटकाची थोडी गोष्ट–सीनचे वर्णन अशा काही गोष्टी चुरचुरीत भाषेत मांडून लोकांचे लक्ष वेधीत. जसे 'नारायणराव पेशवे यांच्या वधाचा फार्स'चे हँडबिल छापताना, 'श्रीमंत नारायणरावांचा कोथळा फोडला जाताच, त्यांच्या पोटातून बाहेर पडणारा साखरभात स्टेजवर प्रत्यक्ष पहा !' नटश्रेष्ठ गणपतराव जोशी यांच्या 'शाहूनगरवासी'चे एक खुसखुशीत हँडबील–

सुखवस्तु गृहस्थ : पैसे गेल्याबद्दल डोळ्यांना त्रास होणार नाही, असे कोणते बरे नाटक आज आपण पहावे ?

विद्यार्थी : माझा अभ्यासाचा वेळ मोडला असे न होता, त्यातल्या त्यात इतिहासाचे ज्ञान आणि नीतीची तत्त्वे माझ्या मनावर ठसतील, असे कोणते बरे नाटक आज आपण पहावे ?

स्त्री : बीभत्स शृंगारापासून मन उद्विग्न न होता, निर्मळ पातिव्रत्य आणि उज्ज्वल शौर्य यांची उदात्त कल्पना, ज्याच्या योगाने माझ्या मनावर बिंबेल असे कोणते बरे नाटक आज आपण पहावे ?

चुगलखोर : ......... हा घातुक गुण ज्याच्या योगाने नाहीसा होईल, असे एखादे नाट्य आहे काय ?

नोकर : ...... स्वदेशाबद्दल मला कधी आठवणसुद्धा झाली नाही......त्या स्वदेशभक्तीशी माझा परिचय कशाने होणार ? ......कदाचित एखाद्या नाटकातून त्या स्वदेशभक्ताचे उत्तम चित्र असले तर असायचे; पण असे कोणते बरे नाटक आहे ?

सगळ्यांना एकच उत्तर – 'कांचनगडची मोहना' पहा !

## □ मुजरा .... छत्रपतींचा !


श्रीमंत शाहूमहाराजांना जेवढी साठमारीच्या खेळाची रग तेवढीच गाण्यात गोडी. जितका कुस्तीचा षोक तितकीच नाटकाची आवड. अल्लादिया खाँसाहेबांचा शागिर्द होण्यासाठी करवीरात आलेल्या, बालके नारायण राजहंसाला कानाच्या दुखण्याच्या निमित्ताने, मिरजेला औषधोपचारासाठी, किर्लोस्कर संगीत मंडळीत सुस्थळी सुपूर्द केला तो शाहूमहाराजांनीच ! तोच नारायण पुढे 'बालगंधर्व' म्हणून मराठी मनाचे लडिवाळ दैवत ठरले. लोकांनी लोकमान्यांइतकेच बालगंधर्वांवर प्रेम केले.

शाहूमहाराज जितक्या आवडीने संगीत नाटके पहात, तितक्याच आवडीने गद्य नाटके पहात. एकदा ते 'महाराष्ट्र नाटक मंडळी'चे शिवसंभव नाटक पहायला गेले होते. खरेशास्त्रीबुवांसारख्या व्युत्पन्न विद्वानाचे नाटक. केशवराव दाते, ओंधकर, शाळिग्राम यांच्यासारखे मातब्बर नट. शककर्त्या शिवप्रभूंच्या जन्माचे, पहिल्यापासून अस्सल ऐतिहासिक वातावरणात घेऊन जाणारे कथानक. शिवप्रभूंच्या जन्माचा सीन आला, पाळणा हलू लागला. पडद्यात तोफांच्या सलामी झडू लागल्या. तोच शाहूमहाराज एकदम उठून उभे राहिले नि त्या दुपट्यातल्या बालशिवाजीला लवून मुजरा केला. सहाजिकच महाराज उठले म्हणून सारे थिएटर उठून उभे राहिले. कडकडून टाळी पडली नि मुजराही झडला !

रसिकहो, हे यश कोणाचे ? नाटकाचे, नाटककाराचे की नटांचे ? छे, छे ! ! त्या त्रिवेणी–संगमाचे !

## □ खरी नाट्यस्पर्धा

आजही अनेक नाट्यस्पर्धा आयोजित केल्या जातात; पण एके काळी पुण्यात पौराणिक नाटकांची एक आगळी–वेगळीच चढाओढ मोठ्या इर्षेने होई. धोंडोपंत सांगलीकर नि श्रीपादपंत लेले (सांगलीकरच) या दोन नाटक मंडळ्यांत ती स्पर्धा होई. दोघांकडेही उत्तम नटवर्ग होता. एकाने जे नाटक केले तेच दुसऱ्याने करून दाखवायचे, किरातार्जुनयुद्ध, कर्णपर्व, शकुंतला या सारख्या नाटकांचे प्रयोग सादर होत. प्रयोगांना प्रचंड गर्दी असे नि कृष्णशास्त्री चिपळूणकरांसारखे व्युत्पन्न विद्वान पंच (आजचे परीक्षक) असत. मग निकालात गोंधळ होण्याचा प्रश्नच नाही!



आणि एक दिवशी कचेरीत पोस्टाने एक भले मोठे जड पार्सल आले. चार माणसांना ते खोके उचलत नव्हते. शिपायाने ते खोके उचलून साहेबापुढे नेले. खोके फोडल्यावर आतून एक भला मोठा मैलाचा दगड निघाला. सोबत पत्र होते– 'मी २०५ मैल अंतर प्रवासभत्ता बिलात दाखवले होते. त्याचा आपणास संशय आला. पुरावा म्हणून सोबत मूळ मैलाचा दगड पाठवला आहे. त्यावरून मी दिलेले अंतर बरोबर आहे हे कळेल. काम झाल्यावर दगड रजिस्टर पार्सलने परत धाडावा.'

**सरकारी नोकरीतले असेच हसवणारे, अंतर्मुख करणारे अनुभव, माणसाच्या व्यक्तिमत्त्वाच्या अनेक रंगछटा खास विनोदी शैलीत सांगणारा खुसखुशीत लेख**

# कारकुनी विश्वाचं हे इंद्रधनुष्य

**लेखक : वि. ग. कानिटकर**

---

# लग्न आणि सहजीवन

आपण लग्न करतो.
संसार करतो. कधीकधी सुखी संसारही करतो; पण हे करत असताना नवरा-बायकोचं सहजीवन हाती लागतं का आपल्या ? जन्मभर तीन पायांची शर्यत खेळत खुरडत खुरडत धावत रहाणं म्हणजे सहजीवन नव्हे.
सहजीवनातही आनंद असतो आणि तो मुद्दाम मिळवायला लागतो. सहजीवन हे एक फुलणारं नातं आहे आणि ते फुलवायचं कसब फक्त आपल्याच हातात असतं.
**शोभा भागवत** यांचा सहजीवनाचा शोध घेत जाणारा विशेष लेख.

---

## गाव वाहून गेलं पण नाव मात्र राहिलं....

मराठी नाटक आणि रंगभूमीच्या क्षेत्रात 'आंधळ्यांची शाळा' आणि 'नाटचमन्वंतर' यांच्या बाबतीत असेच काहीसे घडले आहे.
अनंत काणेकर, के. नारायण काळे, केशवराव दाते, पार्श्वनाथ आळतेकर, केशवराव भोळे-ज्योत्स्ना भोळे ही नावे या मराठी रंगभूमीवर मन्वंतर घडवणाऱ्या चळवळीशी निगडित असलेली.
हे 'मन्वंतर' कसे घडून आले ? या मन्वंतराची सुरुवात कशी झाली ? अखेर का झाली ? कोणामुळे झाली ?
कै. के. नारायण काळे यांचा एक अप्रकाशित प्रदीर्घ लेख–
यंदा 'नाटचमन्वंतर' व 'आंधळ्याची शाळा' या नाटकाला पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत–त्या निमित्ताने.

# नाट्यमन्वंतर निर्मिती आणि अखेर

---

# माणूस दिवाळी अंक ८३

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage–No. 11 ) Regd. No. PNCW–28

# रंगलेल्या तीन रसरशीत मुलाखती . . .

## एक संपादक / एक कवी

गेली ३०।३५ वर्षं साहित्यातले नवनवीन प्रवाह ज्यांनी आत्मीयतेनं, डोळसपणानं निरखून–तपासून पाहिले; पडद्यामागे राहून साहित्यातल्या प्रायोगिकतेला जाणीवपूर्वक वाव दिला असे सत्यकथा–मौजचे संपादक **श्री. पु. भागवत** यांची प्रसिद्ध कवी **मंगेश पाडगावकर** यांनी घेतलेली वैशिष्ट्यपूर्ण समग्र मुलाखत

□

## एक चित्रकार / एक लेखक

व्यंगचित्र–कलाक्षेत्रात आपल्या टोकदार, उपरोधिक रेषेनं ज्यांनी स्वतःचं वेगळं स्थान निर्माण केलं, व्यंगचित्रकलेची स्वतंत्र शैली निर्माण केली ते प्रसिद्ध व्यंगचित्रकार **वसंत सरवटे** यांच्याशी बोलताहेत त्यांचे जवळचे मित्र, त्यांच्याच शैलीत लिखाण करणारे प्रसिद्ध साहित्यिक **जयवंत दळवी**.

सरवटयांबद्दल आणि अर्थातच त्यांच्या चित्रांबद्दल.

□

## एक दिग्दर्शक / एक पत्रकार

वयाच्या आठव्या वर्षी तिचं पहिलं पुस्तक ' मुलांचा मेवा ' प्रसिद्ध झालं. मग शाळा–कॉलेजच्या अनेक नाटकांत तिनं ढिगानं बक्षिसं मिळवली. आकाशवाणीवर ती सगळ्यांची लाडकी बालोद्यानची ' ताई ' होती. चिल्ड्रन थिएटर–नाट्यद्वयी . . . दूरदर्शन आणि नंतर

चष्मेबद्दूर . . . कथा . . . विच्छू

प्रत्येक माध्यमात आनंदाने बागडलेली आजची लोकप्रिय दिग्दर्शक **सई परांजपे** यांची तशीच हसरी मुलाखत . . . **मेधा राजहंस**

# श्रीकृष्ण : एक मोठे स्वप्न

श्रीकृष्ण हा ऐतिहासिक पुरुष असेल वा नसेल; पण या संकल्पनेने ( Concept ) भारतीय समाजकारण, राजकारण, तत्त्वज्ञान सारेच भारावलेले आहे. या संकल्पनेचे व उद्याच्या तरुण-तरुणींचे काही नाते आहे का ?

**श्याम ते श्रीकृष्ण**

**आनंदसागर ते पूर्णपुरुष**

**राजकारणी रणछोडदास ते गुरुमाउली**

श्रीकृष्णाच्या या अनेक रूपांतून हे नाते शोधण्याचा एक हळुवार प्रयत्न.

अमेरिकेत असलेल्या नातवांना अनेक पदव्या धारण केलेल्या आणि जग हिंडून आलेल्या ' भारतीय ' आजोबांनी लिहिलेली ही पत्रे–

# माणूस दिवाळी ८३